रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८८ । अंक १९८ । पृष्ठे ८ ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

कृषीवल

रायगड, सोमवार, दि. १६ डिसेंबर २०२४

किंमत ४ ₹

## ईव्हीएम विरोधात वंचितचे जनआंदोलन

। खोपोली । प्रतिनिधी

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुका पार पडल्या त्यात सर्वत्रच मतांच्या आकेडवारीमध्ये मोठी तफावत असल्याचे निदर्शनात येत आहे. झालेल्या मतदानपेक्षा ईव्हीएमचे मतदान काही ठिकाणी जास्तकमी प्रमाणात असल्याचे दिसते. या सर्व घटनातून ईव्हीएमवरील विश्वास संपुष्टात आला असून लोकशाही बळकट राहण्यासाठी आणि टिकण्यासाठी निवडणुका पारदर्शकपणे होणे गरजेचे असून वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब आंबेडकर तसेच महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षा रेखा ठाकूर यांच्या आदेशाने, रायगड जिल्हाध्यक्ष पान २ वर

## वरळीच्या पूनम चेंबरमध्ये आग

**मुंबई :** वरळीतील पूनम चेंबरमध्ये रविवारी सकाळी साडेअकराच्या सुमारास आग लागली. सात मजली व्यवसायिक इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर ही आग लागली होती.वरळीतील ॲनि बेझन्ट मार्गावर ॲट्रिया मॉलच्या समोर असलेल्या पूनम चेंबरमध्ये रविवारी सकाळी साडे अकराच्या सुमारास आग लागली होती. पूनम चेंबर ही सात मजली व्यावसायिक इमारत असून या इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील एका गाळ्यात ही आग लागली होती. अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेतली असून आग विझवण्याचे काम हाती घेतले.अग्निशमन दलाने ही आग दोन क्रमांकाची असल्याचे जाहीर केले आहे.






## अनधिकृत भरावासाठी
# जेएसडब्ल्यूची राख

### मिळकतखारमधील वासवानींच्या जागेत ठेकेदारांमार्फत भराव
### गुन्हा दाखल करण्याची मागणी



। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

पेण तालुक्यातील वडखळ, डोलवी येथील जेएसडब्ल्यू कंपनीचा मनमानी कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. जिल्हा प्रशासनाच्या अर्थपूर्ण हितसंबंधामुळे कंपनी प्रशासन केवळ कंपनी परिसरातीलच नाही, तर संपूर्ण अलिबाग तालुक्यातील शेत जमीन नष्ट करण्याचा प्रयत्न करीत आहे. सध्या जेएसडब्ल्यू कंपनीमधील राखेचा वापर मिळकतखारमधील वासवानी यांच्या रिसॉर्टच्या भरावासाठी केला जात असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. शेतजमिनीत राख टाकू नये, असे स्पष्ट नियम असतानाही जेएसडब्ल्यू कंपनीतील स्लॅश शेतजमिनीत टाकली जात आहे. त्यामुळे यामागचा खरा सूत्रधार कोण, असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.

> “जेएसडब्ल्यू येथील धुरामुळे होणाऱ्या प्रदुषणाबाबत असलेल्या तक्रारीची दखल प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून घेतली जाते. तरीदेखील त्याची अंमलबजावणी होत नसल्यास संबंधित विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे याबाबत तक्रारीनुसार कार्यवाही करण्याच्या सूचना केल्या जातील.” – संदेश शिर्के, निवासी उपजिल्हाधिकारी, रायगड

केंद्रीय पर्यावरण विभाग व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्याकडील मार्गदर्शक तत्त्वानुसार कंपनीमधून निघणारा स्लॅश बांधकामासाठी लागणाऱ्या विटा, रस्ते बांधणी यासाठी वापरणे बंधनकारक आहे. तसेच ती स्लॅश कोणत्याही परिस्थितीत शेती व वनस्पती असणाऱ्या उपजावू जमिनीमध्ये टाकू पान २ वर

### काम नक्की करतंय कोण?

मिळकतखारमधील भराव हा अनधिकृत असून, हा परिसर सीआरझेडमध्ये समाविष्ट असल्याचे घोषित केले आहे. तरीही या ठिकाणी खारफुटीची कत्तल करुन बेकायदेशीर भराव केला जात आहे. हे काम नक्की कोण करतंय, याबाबत प्रशासनातील कोणतेही अधिकारी बोलायला तयार नाहीत. हे सर्व संशयास्पद तर आहेच; पण, त्याहीपेक्षा ते अतिशय धोकादायक आहे.

### पावसाळ्यात गाव बुडणार?

गेली अनेक वर्षे मिळकतखारमधील शेतकरी शेतीचा व्यवसाय करीत होते. या भरावामुळे शेकडो हेक्टर जमीन नापीक होणार असून, संपूर्ण गाव पाण्याखाली जाण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. याबाबतची सर्व माहिती प्रशासनाला देऊनही प्रशासन कारवाईकडे दुर्लक्ष करीत आहे. वासवानी यांच्या जागेत सपाटीकरणासाठी पोकलेन आणि जेसीबी काम करीत आहेत. या जेसीबी, पोकलेन आणि डंपरचे संरक्षण करण्यासाठी जिल्हा प्रशासनच सज्ञ असल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे.

## फडणवीसांच्या मंत्रिमंडळात
# भाकरी फिरवली

### २५ नवीन चेहऱ्यांना दिली संधी; ज्येष्ठांना बसवले घरी

। नागपुर। प्रतिनिधी ।

विधानसभा निवडणुकीत बहुमत मिळाल्यानंतर तब्बल २२ दिवसांनी देवेंद्र फडणवीस मंत्रिमंडळाचा विस्तार झाला. या मंत्रिमंडळ विस्तारात धक्कातंत्राचा अवलंबन झाले. अनेक जुन्या चेहऱ्यांना आणि ज्येष्ठांना घरी बसवण्यात आले आहे. तसेच नवीन चेहऱ्यांना संधी दिली आहे.

रविवारी ३९ मंत्र्यांनी शपथ घेतली. त्यामुळे फडणवीस मंत्रिमंडळाची संख्या आता ४२ वर गेली आहे. मंत्रिमंडळात जास्तीत जास्त ४३ जण असून शकतात. महायुतीच्या मंत्र्यांचा शपथविधी नागपुरमध्ये आज झाला. यामध्ये ३३ कॅबिनेट मंत्री तर ६ राज्यमंत्र्यांचा समावेश आहे.

आज शपथविधी घेतलेल्यांमध्ये भाजपच्या १९, शिवसेनेच्या ११ आणि राष्ट्रवादीच्या ९ मंत्र्यांचा समावेश आहे. शपथविधीनंतर मंत्रिमंडळाची पहिली बैठक होणार आहे. या बैठकीनंतर चहापानाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले असून यावर विरोधकांनी पान २ वर

### रामदास आठवले नाराज

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) ला मंत्रिमंडळ विस्तारात स्थान मिळाले नाही. त्यामुळे केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी नाराजी व्यक्त केली आहे. ते म्हणाले, देवेंद्र फडणीस मुख्यमंत्री झाले त्याच्याबद्दल त्यांचे अभिनंदन. त्यांनी अनेक वेळा आम्हाला एमएससी आणि मंत्रीपद देण्याचे आश्वासन दिले. परंतु त्याची पुर्तता झाली नाही. आम्ही विधानसभा निवडणुकीत सांगितले होते की जागा देत नसाल तर आम्हाला मंत्रिमंडळात पहिल्यांदा सन्मान द्या. मागच्या मंत्रिमंडळ विस्तारावेळी सांगितले होते की तुम्हाला मंत्रिपद देऊ. मात्र अडीच वर्ष मंत्रिमंडळ विस्तार झाला नाही. यामुळे आमच्या कार्यकर्त्यांना संधी मिळाली नाही.

## तरुणाचा न्यायालयीन कोठडीत मृत्यू

### परभणी दगडफेक प्रकरण

**परभणी:** परभणी जिल्ह्यात झालेल्या दगडफेकी प्रकरणी न्यायालयीन कोठडीत असलेल्या ३५ वर्षीय तरुणाचा कोठडीतच मृत्यू झाल्यामुळे राज्यात एकच खळबळ उडाली आहे. परभणीच्या या घटनेनंतर जिल्ह्यात तणावाची परिस्थिती आहे. सोमनाथ सूर्यवंशीच्या कोठडीतील मृत्यू प्रकरणी संशयाचे वातावरण तयार झाले असून आंबेडकरी व संविधानवादी जनतेने महाराष्ट्र बंदची हाक दिली आहे. या महाराष्ट्र बंदला ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनीही पाठिंबा दर्शवलाय. या पान २ वर

## चायनिज दुकाने तळीरामांचे अड्डे



- संबंधित प्रशासनाचे अर्थपूर्ण दुर्लक्ष?
- नागरिकांकडून संपात व्यक्त

। पेण । प्रतिनिधी ।

तळीरामांना फक्त निमित्त हवंय. हे दुःखात पण पिणार आणि सुखात पण पिणार. गेल्या महिन्यात निवडणुकीच्या धामधूमीत हॉटेल, ढाबे, चायनिज सेंटरवर गावपुढाऱ्यांची तसेच तळीरामांची रेलचेल होती. निवडणुका संपत नाही तोच थर्टी फर्स्टचे वेध लागले असून, शहराबाहेरील हॉटेल, ढाबे, चायनिज सेंटरवर रात्री उशिरापर्यंत गर्दी दिसून येत आहे. परवाना नसणाऱ्या ढाब्यांवर व चायनिज सेंटरवर ओपन बार सुरू असल्याचे चित्र दिसत आहे. याकडे ना खादीवाल्यांचे लक्ष, ना खाकीवाल्यांचे लक्ष.

राज्य उत्पादन शुल्क विभागाविषयी बोलणेच चुकीचे आहे. एकदा का सूर्य मावळतीला गेला की, या ढाब्यांवर व चायनिज सेंटरवर दारुचा पूर, सिगारेट, चिलीमचा धूर पान २ वर

### ओपन बारवर कारवाईची मागणी

पेण शहराच्या आजूबाजूला, वडखळच्या आजूबाजूला, जिते-खारपाडाच्या आजूबाजूला तसेच पूर्व विभागामध्ये काही ठिकाणी चोरीछुपे हॉटेल, ढाबे, चायनिज सेंटरवर दारु पिणे गुन्हा असताना खुलेआम दारु पिण्यास परवानगी देण्यात येत असल्याने तरुणाई वर्दळ या ठिकाणी सुरु असते. यामुळे परिसरातील नागरिक हैराण झाले आहेत. तरी याविरूद्ध कारवाईची मागणी सध्या जोर धरू लागली आहे. उत्पादन शुल्क खाते काय करतेय, हेही पाहणे योग्य होणार आहे.

## विमानतळाची धावपट्टी सज्ज

**नवी मुंबई :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या दक्षिण धावपट्टीवर वैमानिकांना विमान उतरविण्यावेळी धावपट्टीचा अचूक अंदाज मिळण्यासाठी धावपट्टीवरील दिव्यांच्या मार्गाची अचूक सूचना देणाऱ्या यंत्रणेची चाचणी एका लहान विमानाच्या साह्याने गुरुवारी सकाळी साडेआठ वाजता घेण्यात आली. ही चाचणी यशस्वी झाल्याची माहिती नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्राधिकरणाने (एनएमआयए) गुरुवारी सायंकाळी त्यांच्या समाजमाध्यमांवरील संकेतस्थळावर प्रसिद्ध केली होती. ही चाचणी यशस्वी झाल्याने विमानतळाच्या दक्षिण धावपट्टीवर पान २ वर

## महामार्गावर भंगार व्यवसायाचे पेव

### लोकप्रतिनिधींच्या आशीर्वादाने जोरदार धंदा



। पेण । प्रतिनिधी ।

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग आणि खड्डे हे समीकरण सर्वांनाच माहीत आहे. परंतु मुंबई-गोवा महामार्ग आणि अवैध धंदे हे समीकरण नव्याने प्रस्तापित होत आहे. आज गुटख्यापासून तंबाखूपर्यंत, दारूपासून एमडीपर्यंत अनेक अवैध धंदे महामार्गावर रात्रीच्या वेळी खुलेआम चालत असल्याची चर्चा आहे. स्थानिक पोलिसांचे या अवैध धंद्यांना अभय असल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे.

खारपाडा गोविर्लेच्या दरम्यान राजरोसपणे अवैध भंगार धंदा सुरू असूनदेखील पोलीस प्रशासनाकडून कारवाई होत नाही, याबाबत आश्चर्य व्यक्त होत आहे. याबद्दल माहिती घेतल्यावर जे सत्य समोर आले ते खूपच भयानक आणि लोकप्रतिनिधी काय करू शकतात याचा जणू काय पर्दाफाशच झाला. अवैध भंगार धंद्याला पेणच्या लोकप्रतिनिधींचा विरोध असतानादेखील तो विरोध न जुमानता इतर सत्ताधारी आमदारांनी नसिमवर मेहर नजर दाखवून भंगार धंद्याला पाठबळ दिल्याचे वास्तव समोर आले. पान २ वर

## शेतीच्या कामाबरोबरच खाद्य संस्कृतीशी जोडली नाळ
# स्वीडनचे दाम्पत्य रमले शेतीमध्ये

। धम्मशील सावंत ।

। पाली ।



स्वीडनमधील दाम्पत्य चक्क सुधागड तालुक्यातील उद्धर येथील एका छोट्या गावात राहून शेतीची कामे करत आहेत. एवढेच काय तर इथले जेवणदेखील बनवायला शिकले आहेत. अवघ्या काही दिवसांत येथील ग्रामीण संस्कृतीशी व निसर्गाशी त्यांची नाळ जोडली गेली आहे.

टायबेरिअस व त्याची पत्नी आमंडा स्वीडनवरून चार दिवसांपूर्वी येथे आले आहेत. येथील तुषार केळकर यांच्या आत्मतृप्ती या निसर्ग पर्यटन केंद्रामध्ये ते वास्तव्य करत आहेत. बांबूने बनवलेल्या व शेणाने सारवलेल्या झोपडीत अतिशय कमी संसाधनाचा वापर करून हे स्विडीश दाम्पत्य राहत आहेत. शिवाय येथे फक्त सौर उर्जेवर वीज मिळते. त्यामुळे अगदी नेमके विजेचे दिवे व एक फॅन उपलब्ध आहे.

टायबेरिअस हा स्वीडन येथील एका शाळेत शिक्षक असून आमंडा ही स्वीडन येथील सुपर मार्केटमध्ये काम करते. आमंडा पहिल्यांदाच भारतामध्ये आली आहे. तर टायबेरीयस हा दुसऱ्यांदा भारतात आला आहे. या दोघांची तुषार केळकर यांच्यासोबत सोशल मीडियाद्वारे मैत्री झाली आणि ते थेट येथे येऊन पोहोचले. २२ डिसेंबरला ते येथून राजस्थान येथे जाणार आहेत. भारतातील ग्रामीण जीवन तसेच सांस्कृतिक विविधता हे सर्व त्यांना जाणून घ्यायचे आहे. सध्या ते शेती बरोबरच स्वयंपाक आणि इतर सर्व कामे देखील हे दांपत्य अगदी आनंदाने करत आहेत.

### भाजीपाला, कलिंगडाच्या शेतीची मशागत

तुषार यांनी आपल्या शेतामध्ये कलिंगड लागवड करण्यास सुरुवात केली आहे. यावेळी जमिनीची मशागत करणे, मातीचे आळे बनवणे आणि कलिंगडाच्या बिया लावणे, त्यांना पाणी देणे आदि कामे टायबेरियस व त्याची पत्नी आमंडा मन लावून करताना दिसत आहेत. याशिवाय वेगवेगळ्या प्रकारचा भाजीपाला लागवडदेखील या दांपत्यांनी केली आहे. शेतीची विविध कामे करण्यात ही दांपत्य रामतांना दिसत आहेत. त्यांच्या जोडीला तुषार केळकर यांचा छोटा मुलगा राहीदेखील मदत करतो.

### खाद्य संस्कृतीची ओळख

अवघ्या दोन ते तीन दिवसांमध्ये या दाम्पत्यांनी येथील जेवण बनवण्याची पद्धत देखील तुषार केळकर यांच्याकडून शिकून घेतली. आमटी, भात, पोळी भाजी, अंडा बुर्जी असं सर्व काही हे दाम्पत्य स्वतः करतात. त्यांना आपल्या येथील अन्नपदार्थाची चव खूप आवडू लागली आहे. येथील मसाल्यांवर त्यांचे प्रेम जडले आहे.

## बर्फाच्या वाढत्या खर्चामुळे मच्छिमार गारठले

। चिरनेर । प्रतिनिधी ।



बर्फाच्या वाढत्या खर्चामुळे करंजा येथील मच्छिमार गारठले आहेत. मच्छिमारांना खोल समुद्रात मासेमारीला जाण्यासाठी एका मच्छिमार बोटीला १० ते १५ टनांपर्यंत बर्फ लागते. तर छोट्या बोटींना ५ ते १० टनांपर्यंत बर्फ लागते. मासळी टिकवण्यासाठी मासळीची विक्री करेपर्यंत तर मासळी पकडल्यानंतर बंदरात पोहोचण्यापर्यंत मच्छिमारांना बर्फाची गरज भासते. बर्फ नसेल तर पकडलेली टनावारी मासळी सडून जाते.त्यामुळे मच्छिमारांचे अतोनात नुकसान होते.

सुमारे २५० कोटी रुपये खर्चून आधुनिक करंजा मच्छिमार बंदर अस्तित्वात आले आहे. मात्र अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उभारण्यात आलेल्या बंदरात अद्यापही मत्स्य प्रक्रिया व शीतगृहाची व्यवस्था उपलब्ध झालेली नाही.

त्यामुळे मच्छिमारांना तळोजा, कल्याण, भिवंडी, नेरळ, नवीमुंबईतील औद्योगिक क्षेत्रातुन २३०० रुपये टन दराने बर्फ आणावे लागत आहे. पान २ वर

# १,५८४ बालकांवर हृदय शस्त्रक्रिया!



**। मुंबई । प्रतिनिधी ।**

यंदा वर्षभरात राज्यात तब्बल १,५८४ बालकांवर हृदय शस्त्रक्रिया करण्यात आल्या तर १९,६१७ बालकांवर इतर वेवगेळ्या आजारांवरील शस्त्रक्रिया करण्यात आल्याचे अतिरिक्त आरोग्य संचालक व या कार्यक्रमाच्या प्रमुख डॉ. बबीता कमलापूरकर यांनी सांगितले.

राज्यातएकूण७३रुग्णालयांमध्ये या बालकांच्या हृदय शस्त्रक्रिया करण्यात येत असून यातील काही राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गतची रुग्णालये आहेत तर काही पंतप्रधान आरोग्य व महात्मा फुले येजनेतील रुग्णालये आहेत. ही सर्व रुग्णालये प्रामुख्याने मुंबई,ठाणे, पुणे, नागपूर आदी मोठ्या शहरात असतात. आदिवासी गडचिरोली, नंदुरबार तसेच ठाणे जिल्ह्यासह दुर्गम भागातील हृदयविकाराच्या मुलांवर उपचार करण्यासाठी मोठ्या शहरात घेऊन जावे लागेल हे पालकांना समजावून सांगणे हे आमच्या डॉक्टरांपुढचे मोठे आव्हान असते, असे डॉ. कमलापूरकर म्हणाल्या.

मुलांना व पालकांना तपासणीसाठी गावाहून आणणे तसेच उपचारादरम्यान पालकांच्या राहाण्याखाण्याची व्यवस्था कधी सीएसआर तसेच रुग्णालयांच्या माध्यमातून केली जाते. अनेकदा जिल्हा शल्यचिकित्सक या खर्चाचा भार उचलतात. या कार्यक्रमांतर्गत राज्यातील ० ते १८ वर्षे वयोगटातील सुमारे २ कोटी बालकांची वर्षभरात दोन वेळा आरोग्य तपासणी करण्यात येते. या कार्यक्रमांतर्गत २०२३-२४ या कालावधीत ३,३३४ बालकांवर हृदय शस्त्रक्रिया, तर ३२,८०१ बालकांवर इतर शस्त्रक्रिया करण्यात आल्या. सन २०२२-२३ या कालावधीत ३,८३९ बालकांवर हृदय शस्त्रक्रिया, तर ३०,२६९ इतर शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत.

० ते १८ वर्ष वयोगटातील मुलांची तपासणी करुन मुलांमध्ये आढळणारे जन्मत: असलेले व्यंग, लहान मुलांमधील आजार, जीवनसत्वांच्या कमतरतेमुळे होणारे आजार व अपंगत्व इत्यादी बाबींचे वेळेवर निदान करुन त्यांच्यावर योग्य ते उपचार करण्याचे तसेच बालकांची आरोग्याची तपासणी व त्यांच्यात आढळणाऱ्या आजारांना वेळीच पायबंध घालणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या कार्यक्रमाचा लाभ राज्यातील ० ते १८ वर्ष वयोगटातील जवळपास २ कोटी मुलांना दरवर्षी होत आहे. या कार्यक्रमांतर्गत अंगणवाडी स्तरावर ० ते ६ वर्ष वयोगटातील मुलांची वर्षातून दोन वेळेस आरोग्य तपासणी करण्यात येते. या व्यतिरिक्त शासकीय व निमशासकीय शाळेतील ६ ते १८ वर्ष वयोगटातील मुलांनाही या आरोग्य तपासणी कार्यक्रमाचा लाभ होत आहे. या आरोग्य तपासणी दरम्यान मुलांमध्ये आढळून आलेल्या आरोग्य विषयक समस्या, अडचणीसाठी योग्य त्या संदर्भ सेवा व सर्व प्रकारचे वैद्यकीय व शल्यचिकित्सक उपचार मोफत पुरविण्यात येतात.

३४ जिल्ह्यांमध्ये राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम १ एप्रिल २०१३ पासून लागू करण्यात आला आहे. राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमाची पथके प्रत्येक तालुक्यात नियुक्त करण्यात आलेली आहेत. प्रत्येक पथकात १ वाहन, २ वैद्यकीय अधिकारी, १ औषधी निर्माण अधिकारी, १ एएनएम, तपासणी साहित्य, इत्यादी पुरविण्यात आलेले आहे. आरोग्य तपासणी कार्यक्रमाचे गावनिहाय वेळापत्रक शिक्षण आणि महिला व बाल कल्याण विभागांच्या समन्वयाने तयार करुन प्रत्येक पथकास ठरावीक वेळापत्रकाप्रमाणे तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. जवळपास तीन हजार डॉक्टरांच्या माध्यमातून ही आरोग्य तपासणी होत असते. आढळणाऱ्या सर्व बालरुग्णांची पूर्ण काळजी जिल्हा शल्यचिकित्सक व सुपरवायझर घेतात असेही डॉ. कमलापूरकर म्हणाल्या.



# आनंदराज आंबेडकर यांचा बेणसेतून एल्गार

**। पाली-बेणसे । प्रतिनिधी ।**

रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड नागोठणे कंपनी च्या संलग्न बेणसे झोतिरपाडा ग्रामपंचायत हद्दीत नवीन प्रकल्पाची उभारणी होत आहे. रायगड जिल्हा प्रशासन, रिलायन्स व्यवस्थापन स्थानिकांच्या तक्रारींची कोणतीही दखल घेत नाही, तसेच कोणतीही न्यायिक भूमिका घेण्याऐवजी दडपशाही धोरण राबवित असल्याचा तक्रारी अर्ज प्राप्त झाल्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नातू आनंदराज आंबेडकर यांनी बेणसे सिद्धार्थनगर येथे प्रत्यक्षात भेट देऊन विभागातील ग्रामस्थ व शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेतल्या.

रिलायन्स नागोठणे कंपनीच्या बेणसे सिद्धार्थ नगर लगत सुरू असलेल्या कामकाजा विरोधात बेणसे सिद्धार्थ नगर व विभागातील ग्रामस्थ व शेतकरी चांगलेच आक्रमक झाल्याचे दिसून आले. यावेळी आंबेडकर यांनी ४० वर्ष प्रकल्पाच्या नावाखाली पडीक असलेल्या शेतजमिनी पुन्हा भूमिपुत्र, शेतकऱ्यांच्या ताब्यात द्याव्यात अशी भीमगर्जना आनंदराज आंबेडकर यांनी बेणसे सिध्दार्थ नगर गावातून केली. यावेळी रिलायन्सच्या नवप्रकल्पाची जागा, बेसुमार केलेली वृक्षतोड, शेतकऱ्यांचे पूर्वापार वहीवाटीचे मार्ग, संरक्षण भिंत बांधताना रस्त्यासाठी सोडलेली अरुंद जागा, बौद्धवाडीची पाण्याची टाकी ,स्मशानभूमीची जागा आदींची आनंदराज आंबेडकरांनी प्रत्यक्षात येऊन पाहणी केली.

आनंदराज आंबेडकर म्हणाले की, रिलायन्सने प्रकल्प उभारत असताना येथील स्थानिक, भूमिपुत्र, प्रकल्पग्रस्त आणि शेतकरी यांच्या मागण्यांची आणि तक्रारींची रिलायन्स व्यवस्थापनाकडून लेखी स्वरूपात दखल व पूर्तता होणार असल्याची विश्वासार्ह हमी आजवर दिली नसल्याचा असंतोष नागरिकांत खदखदत आहे. अशातच येथील शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी वाचविण्यासाठी तसेच शेतजमिनी कडे जाणारे मार्ग कायम ठेवण्यासाठी संविधानिक व लोकशाही मार्गाने आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. या आंदोलनाला रिपब्लिकन सेना पाठिंबा देत आहे. रिलायन्सने नव्याने प्रकल्प उभारत असताना कोणतीही जनसुनावणी घेतली नाही, स्थानिक जनतेला विश्वासात घेतले गेले नाही. प्रकल्पाचे फायदे तोटे जनतेला सांगितले नाहीत. शेतकरी जगाचा पोशिंदा आहे, मात्र येथील शेतकऱ्यांचे शेतीकडे जाणारे रस्ते अडविले जात आहेत. गुरचरण क्षेत्र अडविले जात आहेत. गावकऱ्यांचे वहिवाट तसेच पूर्वापार रहदारीचे रस्ते अडविण्यात आले आहेत. येथील स्मशानभूमीचे प्रश्न प्रलंबित आहेत. केमिकल युक्त पाणी नद्यांत सोडल्याने जल प्रदूषण होऊन कोळी बांधवांचा मासेमारी व्यवसाय संकटात आला आहे. दरम्यान एखादी दुर्घटना घडल्यास रुग्णवाहिका व अग्निशमन बंब येणार नाही असा रस्ता देखील दिला जात नाही, येत्या काळात कुणीही शेतकरी प्रकल्पाला जागा देणार नाहीत. नियमानुसार ३० वर्षाहून अधिक काळ पडीक राहिलेल्या जमिनी शेतकऱ्यांना पुन्हा परत देण्यात याव्यात, जेणेकरुन त्यांचा उदरनिर्वाह त्या शेतजमिनीतून येणाऱ्या उत्पन्नातून निर्माण होईल, आमचा पुढचा लढा शेतकऱ्यांच्या जमिनी ताब्यात घेण्यासाठीचा असेल, असे आव्हान आंबेडकर यांनी दिले.

खाजगी करणामुळे या स्वतंत्र देशात येथील नागरिकांना गुलाम गिरीच्या खाईत जावे लागत आहे. येथील जनतेवर प्रचंड अन्याय होत आहे. स्थानिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी रायगड जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, प्रांताधिकारी, तहसीलदार, रिलायन्स व्यवस्थापन यांनी सकारात्मक भूमिका घ्यावी, असे आवाहन आंबेडकर यांनी केले.

# तुकाराम गाथा पारायण सोहळा उत्साहात



**। रसायनी । वार्ताहर ।**

मोहोपाडा वेथील जनता विद्यालयाच्या भव्य मैदानात अखंड हरिनाम सप्ताह व तुकाराम गाथा पारायण सोहळा मोठ्या भक्तीभावाने संपन्न झाला.

रसायनी येथील वारकरी सांप्रदाय प्रसारक मंडळातर्फे अखंड हरिनाम सप्ताह व तुकाराम गाथा पारायण हरीनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते.

या सोहळ्याला रोज हजारोंच्या संख्येने वारकरी आणि परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहत होते. सायंकाळी ४ ते ५ स्थानिक महाराजांचे प्रवचन होत होते. तर सायंकाळी ७ ते ९ किर्तन संपन्न होत असे. माधव रसाळ (बारामती), पुंडलीक देहूकर, (देहू), नरहरी सांगळे (आळंदी), पंडीत क्षिरसागर (आळंदी), जलाल सय्यद (नाशिक), श्रीपाद जाधव (सातारा), जयवंत गोसावी (त्रंबकेश्वर) यांचे सुश्राव्य किर्तन पार पडले.दिंडी उत्सव जनता विद्यालय मैदान ते मोहोपाडा बाजारपेठेतून श्री दत्त मंदिर अशी हरिनामाचा गजरात पालखी काढण्यात आली. यानंतर दिपोत्सवाचा कार्यक्रम झाला. तर पांडुरंग घुले यांचे काल्याचे सुश्राव्य किर्तन संपन्न झाले.

यावेळी मोठ्या संख्येने वारकरी आणि रसायनी परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर अखंड हरिनाम सप्ताह व तुकाराम गाथा पारायण सोहळा यशस्वी करण्यासाठी वारकरी सांप्रदाय प्रसारक मंडळ रसायनी-पाताळगंगाचे कृष्णा आप्पा गुडेकर, नाना गायकवाड, पंढरी कुरंगळे, अनंता कर्णेकर, चंद्रकांत राउत, बिभीषण पवार, प्रकाश माळी, रमेश कोकंबे, बबन कुरंगळे तसेच सर्व वारकरी बंधू-भगिनींनी परिश्रम घेतले. या सोहळ्याला सर्व राजकीय पक्षाचे पुढारी, सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विळे येथे दत्तजयंती सोहळा उत्साहात

**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**

माणगाव तालुक्यातील विळे येथे श्री दत्तजयंती सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. श्री दत्त जन्मोत्सव उत्साहात व भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. यावेळी धार्मिक कार्यक्रम व विधी करण्यात आले. श्री दत्तजयंती निमित्त विळे पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.तर पालखी सोहळा खेळीमेळीच्या वातावरणात हरिनामाचा जयघोष करत संपन्न झाला.

मंदिर परिसरात मोठी यात्रा भरली होती. बच्चे कंपनीची मौज तर महिला वर्गाची खरेदीसाठी लगबग केली होती. यात्रेत मिठाई, खेळणी, गृहोपयोगी सामग्री व अन्य सजावटीचे साहित्य, उबदार कपड्यांची दुकाने लागली आहेत. त्यामुळे महिला वर्गांची खरेदारीची लगबग पाहायला मिळत आहे.



पान १ वरून

## ईव्हीएम विरोधात वंचितचे जनआंदोलन

दिपक गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली वंचित बहुजन आघाडी खोपोली शहर कमिटीच्या माध्यमातून ईव्हीएमविरोधात स्वाक्षरी मोहीम आंदोलन डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकासमोर आयोजित करण्यात आले होते.

जनआंदोलनाचे आयोजन खोपोली शहर कमिटी महासचिव आशिष मणेर, कोषाध्यक्ष सुमित जाधव, उपाध्यक्ष रोहित वाघमारे, अखिल शेख, संघटक संतोष मर्चंडे, प्रसिद्धी प्रमुख कुणाल पवार, सचिव रत्नदीप कांबळे यांच्या माध्यमातून आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी तालुका महासचिव उत्तम ओव्हाळ, चौक जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज गायकवाड, उत्तम पवार, विजय सताने, लिंबाना, संदीप वाघमारे, कराडे , अजेश अगवणे, रमेश गायकवाड, गणेश वाघमारे, तेजेश वाघमारे, रवींद्र खैरे, विठ्ठल पवार, दिगंबर वाघमारे, प्रकाश गायकवाड, सुनील पवार, रमेश भालेराव, नयन गायकवाड, अमोल वाघमारे, अल्पेश मणेर, अन्वर शेख, प्रमोद गायकवाड, रिखील पोल, राजेश गायकवाड, गणेश बनसोडे, अक्षय भालेराव, बंटी साळवी, राज वाघमारे, केतन साळुंखे, प्रमोद ओव्हाळ, राहुल जाधव, संतोष वाघमारे, विकास जले, कृष्णा बिऱ्हाडे, निलेश केदारी, अमोल गोरी, भाई ओव्हाळ, नरेश जाधव, प्रशाली मोरे, मिताली वाघमारे तसेच शहरातील इतर पदाधिकारी आणि सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

येणाऱ्या काळात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका बॅलेट पेपरवरती घेण्यात याव्यात आणि ईव्हीएम मशीन बंद करण्यात यावे या उद्देशाने सदर आंदोलन वंचित बहुजन आघाडीच्या वतीने सुरु करण्यात आले असून जास्तीत जास्त मतदारांनपर्यंत पोहोचून ह्या आंदोलनात समाविष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. ३ डिसेंबर ते १६ डिसेंबर पर्यंत ही स्वाक्षरी मोहीम राबावली जाणार असून सर्व स्वाक्षऱ्या निवडणूक आयोगाकडे तक्राररुपी दाखल करून पुढील आंदोलनाची दिशा ठरवली जाणार आहे. साधारण २५०० स्वाक्षऱ्या खोपोली शहरातून मोहिमेदरम्यान घेण्यात आल्या आहेत. वंचित बहुजन आघाडी ईव्हीएम रद्द करण्याकरिता शेवटपर्यंत ही लढाई लढणार असून समविचारी सर्व पक्ष संघटनानीदेखील यात सहभागी व्हावे आणि ईव्हीएम हटाव देश बचाव या आंदोलनात सहभाग घेऊन सहकार्य करावे, अशीदेखील विनंती आंदोलनकर्त्यांकडून करण्यात आली आहे.

## अनधिकृत भरावासाठी जेएसडब्ल्यूची राख

नये, असे म्हटले आहे. असे असताना जेएसडब्ल्यू कोणत्या अधिकारामध्ये कांदळवनामधील भरावासाठी स्लॅश देते, असा सवाल सामाजिक कार्यकर्ते संजय सावंत यांनी केला आहे. या अनधिकृत भरावाविरुद्ध दाखल होणाऱ्या गुन्ह्यामध्ये जेएसडब्ल्यूचाही समावेश करावा, अशी मागणीही सावंत यांनी केली आहे. तहसीलदार कार्यालयाकडून याबाबत जेएसडब्ल्यू कंपनीला पत्र दिले असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाच्या सूत्रांनी सावंत यांना दिली आहे.

## फडणवीसांच्या मंत्रिमंडळात भाकरी फिरवली

बहिष्कार टाकला आहे.

शिंदे यांच्या मंत्रिमंडळापेक्षा अनेक वेगळी नाव फडणवीस मंत्रिमंडळात आली आहे. एकूण २५ नवीन चेहऱ्यांना संधी देण्यात आली आहे. त्यात चंद्रशेखर बावनकुळे, गणेश नाईक, जयकुमार रावल, पंकजा मुंडे, अशोक उइके, आशीष शेलार, दत्तात्रेय भरणे, शिवेंद्रराजे भोसले, माणिकराव कोकाटे, जयकुमार गोरे, नरहरी झिरवाळ, संजय सावकारे, संजय शिरसाट, प्रताप सरनाईक, भरत गोगवले, मकरंद पाटील, नितेश राणे, आकाश फुंडकर, बाबासाहेब पाटील, प्रकाश आबिटकर, माधुरी मिसाळ, आशीष जैस्वाल, पंकज भोयर, मेघना बोर्डिकर, इंद्रनील नाइक यांचा समावेश आहे.

**अडीच-अडीच वर्षांचा फॉर्म्युला**

मंत्रिपदाबाबत महायुतीत अडीच-अडीच वर्षांचा फॉर्म्युला आहे, असे अजित पवार यांनी सांगितले. तिन्ही पक्षाचे नेते या फॉर्म्युलावर तयार झाले. काहींना अडीच अडीच वर्ष संधी देणार आहे. त्यामुळे तिन्ही पक्षातील जास्तीत जास्त आमदारांना मंत्रिपदाची संधी मिळणार आहे. भाजपने काही जुना चेहऱ्यांना वगळून नऊ नवीन चेहऱ्यांना संधी दिली. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने सहा नवीन चेहऱ्यांना या मंत्रिमंडळात स्थान दिले. तर अजित पवार यांनी राष्ट्रवादीमध्ये पाच नवीन चेहऱ्यांना संधी दिली. राज्यातील १९ जिल्ह्यांमध्ये मंत्रीपदे आहे. परंतु १६ जिल्ह्यांमधी मंत्री म्हणून कोणालाच संधी नाही. पुणे, जळगाव-नाशिकमधून तीन-तीन मंत्री झाले आहेत. तसेच साताऱ्यास सर्वाधिक चार मंत्रीपदे दिली.

## महामार्गावर भंगार व्यवसायाचे पेव

अवैध धंद्याना जर लोकप्रतिनिधीच पाठबळ देत असतील, तर यापेक्षा वाईट ते काय?

महत्त्वाची बाब म्हणजे, पेण तालुक्यातील लोकप्रतिनिधी अवैध धंदयाना अजिबात खतपाणी घालत नाहीत हे ही तेवढेच सत्य आहे. मग ते कोणत्याही पक्षाचे असोत. परंतु बाहेरील तालुक्यातील लोकप्रतिनिधी आपला तालुका कमी पडतोय की काय तर, ते पेण तालुक्यात भंगारसारख्या अवैध धंद्याला खतपाणी घालताना दिसतात. ज्या ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये हा अवैध धंदा सुरू आहे, त्यांनी वेळोवेळी याबाबत अनेकदा पोलिसांकडे तक्रार देऊनसुद्धा काहीच उपयोग झालेला नाही. नसिमसारखा परप्रांतीय राजरोसपणे भंगारचा अवैध धंदा चालवत असेल, तर त्याला बळ देणारे हे लोकप्रतिनिधी जबाबदार आहेत, एवढे नक्की.

येत्या हिवाळी अधिवेशनात महामार्गावरील अवैध धंद्यांचा लेखाजोखा मांडला जाईल, एवढे नक्की. त्याअगोदर या लोकप्रतिनिधींनी आपला आशीर्वाद या अवैध धंद्यावरून काढला तर ठीक अन्यथा या लोकप्रतिनिधीच्या पेण तालुक्यातील हस्तक्षेपावर बॅनरबाजी झाल्याशिवाय राहणार नाही. तसेच प्रसार माध्यमांचे प्रतिनिधी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडे अवैध धंद्यांना खतपाणी घालणाऱ्या सत्ताधारी आमदाराचे प्रगती पुस्तक पाठवणार एवढे नक्की. नुकत्याच झालेल्या निवडणुकीमध्ये रिक्षावाल्यांनी या आमदाराला असा काही पछाडलाय की निवडणुकीमध्ये झालेला खर्च काढण्याचा हा मार्ग तर या लोकप्रतिनिधींनी निवडला तर नाही ना? अशी चर्चा दबक्या आवाजात पेण तालुक्यात सुरू आहे.

## चायनिज दुकाने तळीरामांचे अड्डे

पहायला मिळतोय, असे नागरिक सांगतात. हे पुढील १५ दिवस आपल्याला हमखास पहायला मिळणार असल्याचे बोलले जाते. हे कमी आहे की काय, तर शहराच्या आजूबाजूला ग्रामीण भागात छोट्या-मोठ्या फार्म हाऊसवर रम-रमा-रमीची रेलचेल सुरू झाली आहे आणि यासाठी मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, नगर या विभागातील तरुणाईची पावले पेणकडे फिरकत आहेत, असे सांगण्यात येते. याठिकाणी तरुणाईच्या पार्ट्या रंगताना दिसून येत आहेत.

शहरात हॉटेल, ढाबे, चायनिज सेंटरवर दारू पिऊ नये म्हणून खाकीवाले कारवाईचा बडगा उचलतात. परंतु, यातीलच काही जण आपले हितसंबंध जपून लक्ष्मीदर्शनाची अभिलाषा ठेवतात. वरिष्ठ अधिकाऱ्यांना कानोकान पत्ता लागून देत नाहीत, अशी जोरदार चर्चा आहे. त्यातच अमली पदार्थ विकणारे या खाकीवाल्यांना जवळचे वाटतात. त्यांना घेऊन ही मंडळी फिरताना दिसते, असा आरोपही नागरिकांकडून केला जात आहे.

शहराबाहेर जाणाऱ्या रस्त्यांवर चायनिज सेंटरवर खास थर्टी फर्स्टच्या निमित्त काही ऑफर ठेवलेल्या पहायला मिळतात आणि या ऑफरच्या जाहिरातींचा विचार करून तळीरामदेखील बेकायदेशीर दारू पिण्यास परवानगी देणाऱ्या चायनिज सेंटरला पसंती देतात आणि मग सुरू होतो तो तळीरामांचा जागरण गोंधळ. ओपन बारला कधी डान्स बारचे स्वरूप प्राप्त होते हे ना तळीरामांना समजते, ना चायनिज सेंटरवाल्यांना समजते. रात्री १-२ वाजेपर्यंत हा धिंगाणा सुरू असतो. जस जसा थर्टी फर्स्ट जवळ येईल, तसा हा धिंगाणा वाढणार हे नक्की.

## बर्फाच्या वाढत्या खर्चामुळे मच्छिमार गारठले

मच्छिमारांना ७०० ते ८०० अतिरिक्त जादा पैसे मोजावे लागत आहेत. उरण परिसरातच बर्फाची व्यवस्था असती तर बर्फासाठी अतिरिक्त जादा पैसे मोजावे लागले नसल्याची खंत पर्ससीन नेट फिशिंग असोसिएशनचे अध्यक्ष गणेश नाखवा यांनी व्यक्त केली.

## विमानतळाची धावपट्टी सज्ज

लवकरच मोठे विमान उतरण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.भारतीय विमानतळ प्राधिकरणाच्या सहकार्याने गुरुवारी सकाळी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या दक्षिण धावपट्टीवरील ०८/२६ येथे चाचणी घेण्यात आली. गुरुवारी सकाळी तब्बल दोन तास धावपट्टीवर लहान विमान चाचणीसाठी घिरट्या घालत होते. विमान उतरविण्यासाठी वैमानिकांना धावपट्टीवरील मार्गाचा अचूक संदेश सूचकता दर्शविणाऱ्या दिव्यांचा आधार घ्यावा लागतो. धावपट्टीवरील दिवे मार्गातील अचूक सूचनेमुळे वैमानिकांना धावपट्टीवरील दृष्यमानता कमी असताना याच दिव्यांच्या आधारे विमान उतरवावे लागते. त्यामुळे या चाचणीला विशेष महत्त्व आहे. गुरुवारी ही चाचणी पूर्ण झाल्याने पुढील चार महिन्यात नवी मुंबई विमानतळावरुन विमानाचे उड्डाण होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

तत्कालिन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीमध्ये ११ ऑक्टोबरला नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर पहिले लढाऊ विमान सी- २९५ हे उतरविण्यात आले होते. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर दोन धावपट्टी आहेत. त्यातील दक्षिण धावपट्टी पहिल्या टप्यात सुरू होणार आहे. या धावपट्टीची ३७०० मीटर लांबीची आणि ६० मीटर रुंदीची आहे. पहिल्या टप्यात मालवाहू विमानतळ या विमानतळावरुन सुरू होणार आहे.

चाचणीचे महत्त्व विमान उतरविण्यासाठी वैमानिकांना धावपट्टीवरील मार्गाचा अचूक संदेश सूचकता दर्शविणाऱ्या विज दिव्यांचा आधार घ्यावा लागतो. धावपट्टीवरील दिवे मार्गातील अचूक सूचनेमुळे वैमानिकांना धावपट्टीवरील दृष्यमानता कमी असताना याच दिव्यांच्या आधारे विमान उतरवावे लागते. त्यामुळे या चाचणीला विशेष महत्त्व आहे.

## तरुणाचा न्यायालयीन कोठडीत मृत्यू

प्रकरणात एसपी आणि जिल्हाधिकारी यांना निलंबित केलं पाहिजे अशी मागणी दानवे यांनी केलीये. या प्रकरणामुळे परभणीत वातावरण तापण्याची शक्यता पुन्हा एकदा निर्माण झाली आहे. याबाबत अंबादास दानवे म्हणाले, दलित संघटना उद्या बंद पुकारात आहेत. त्याला आम्ही पाठिंबा देत आहोत. यासंदर्भात एसपी आणि जिल्हाधिकारी यांना निलंबित केलं पाहिजे. अशी मागणीही त्यांनी केली. परभणीत झालेल्या घटनेनंतर १६ डिसेंबर २०२४ रोजी रिपब्लिकन सेनेच्या वतीने महाराष्ट्र बंदची हाक देण्यात आली आहे. परभणीत आंदोलकांवर दाखल केलेले सर्व गुन्हे मागे व्हावेत, अटकेतील सर्व आंदोलकांची सुटका करावी, अमानुष अत्याचार करणाऱ्या पोलिसांवर कारवाई करावी, शाहिद सोम नाथ व्यंकट सूर्यवंशी यांच्या कुटुंबाचे पुनर्वसन करावे, या मागण्या सरकारसमोर केल्या जाणार आहेत.

सोमनाथ सुर्यवंशी यांचा मृत्यू न्यायालयीन कोठडीत झाला असल्याने, आमचे वकील न्यायालयाला विनंती करतील की पोस्टमॉर्टम फॉरेन्सिक विभाग असलेल्या सरकारी रुग्णालयामध्ये केले जावे आणि फॉरेन्सिक आणि पॅथॉलॉजी या दोन्ही विभागांकडून पोस्टमॉर्टमचे चित्रीकरण केले जावे. याबरोबरच आम्ही न्यायासाठी लढू! असे प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे.

# फणसाड अभयारण्य विभागाकडून जळीत रेषा काढण्याचे काम सुरू



**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

सुमारे ५४ चौरस क्षेत्र किलोमिटर क्षेत्रात फणसाड अभयारण्य क्षेत्र व्यापित आहे. या अभयारण्य क्षेत्रातून रोहा, मुरुड व अलिबाग या तीन तालुक्याचे क्षेत्र लागून आहे. बहुतेक वेळा या तीन तालुक्याच्या क्षेत्र अगदी रस्त्याच्या नजिक आहे. त्यामुळे असंख्य लोक ज्यावेळी वाहतूक करीत असताना एखाद्या व्यक्ती सिगारेट किंवा विडी ओढताना माचिसची काडी किंवा ओढलेले सिगारेट पूर्ण न विझवता तसेच टाकून जातो.त्यामुळे रस्त्यालगत सुकलेले गवत पेट घेऊन संपूर्ण अरण्यात आग लागू शकते.त्यामुळे जंगल वनसंपदेचे ऱ्हास होऊ शकतो.असे प्रसंग उद्भवू नये म्हणून दरवर्षी प्रमाणे यंदा फणसाड अभयारण्य विभागाकडून जळीत रेषा काढण्याचे काम सुरू केले आहे.

फणसाड अभयारण्य क्षेत्राचे जे रस्त्यालगत क्षेत्र आहे.त्यामधील काही निवडक क्षेत्राची निवड करण्यात येते. म्हणजे जे रस्त्यालगत व जिथे प्रवासी प्रवास करतात तेथे सर्व वन कर्मचारी जातात. रस्त्यालगत असलेले झाडी झुडपे तसेच सुके गवत एकत्र करून जाळतात. रस्त्यालगत असणारे सुके गवत ठराविक भागातून जाळले जाते. त्यामुळे संपूर्ण जंगल आगीपासून वाचते. फणसाड दरवर्षी जळीत रेषा काढत असते. जानेवारीपासून उन्हाची तीव्रता वाढत असते. अशावेळी सुके गवत जळण्याची प्रक्रिया टाळता येते. फणसाड अभयारण्यामधील वनपरिक्षेत्र अधिकारी नारायण राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल आदेश पोकळ. वनरक्षक अरुण पाटील. राजेश खांडेकर. प्रदीप शेळके, वनजूर पतेने व धनावडे यांनी जळीत रेषा काढण्याचे काम चोखपणे बजावले आहे.

# लॉजवर वेश्याव्यवसाय; तिघांवर गुन्हा दाखल

**। पनवेल वार्ताहर ।**

धानसर टोल नाक्या जवळील हॉटेल, लॉजमध्ये सुरू असलेल्या वेश्या व्यवसायावर पोलिसांनी कारवाई करत तिघांवर गुन्हा दाखल केला. तम न्ना श्रीखंडे गौडा, कुमार कृष्णा गौडा, रणजीत रमेश सांसाकेत अशी तिघांची नावे आहेत.

हॉटेल विशाल व रोमी लॉजिंग अँड बोर्डिंग धानसर टोलनाक्याजवळ तळोजा एमआयडीसी येथे मॅनेजर हे लॉजमध्ये ग्राहकांना वेश्या गमनासाठी लहान मुली आणि महिला दाखवून वेश्याव्यवसाय करत असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष गुन्हे शाखा, नवी मुंबई यांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी बनावट गिऱ्हाईक पाठवले. यावेळी वेश्या गमनाचा मोबदला म्हणून ३७०० मॅनेजर यांनी घेतले आणि मालकाने ७०० रुपये रूमचे भाडे स्वीकारले. यावेळी एका रूममध्ये चार महिला सापडून आल्या. पोलिसांनी त्या ठिकाणाहून एक डीव्हीआर आणि पाच हजार रुपये जप्त केले. या प्रकरणी तिघां विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# संघर्षातून आर्यनची क्रिकेटमध्ये भरारी

| प्रमोद जाधव

वेगवेगळ्या क्षेत्रात आपला ठसा उमटविण्यासाठी प्रचंड इच्छाशक्ती, जिद्द आणि मेहनत लागले. अलिबाग तालुक्यातील थळ येथील आर्यन खारकर या तरुणाने जिद्दीच्या जोरावर, मोठ्या संघर्षातून क्रिकेटमध्ये गगन भरारी घेतली आहे. शेकापच्या चित्रलेखा पाटील यांच्याकडून मिळालेले प्रोत्साहन, आई, वडीलांच्या पाठबळातून इंडियन स्ट्रीट प्रिमिअर लीग (आयएसपीएल)मध्ये निवड झाली आहे. तो फाल्कन रायझर्स हैदराबाद संघातून खेळणार आहे.

इंडियन स्ट्रीट प्रिमिअर लिगमध्ये तालुक्यातून वेगवान क्रिकेटपट्टूचे अर्ज भरण्याचे काम शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा नृपाल पाटील उर्फ चिऊताई यांनी केले आहे. याचे प्रवेश शुल्क १ हजार १६९ इतके होते. मात्र, सर्व खेळाडूंचे प्रवेश शुल्क चित्रलेखा पाटील यांनी भरले. त्यामध्ये आर्यन संतोष साखरकर या १९ वर्षाखालील क्रिकेट पट्टूने अर्ज भरला होता. या लिगची पहिली चाचणी अलिबागमध्ये झाली. दुसरी चाचणी मुंबई येथील धारावी आणि तिसरी चाचणी मुंबईमधील मालाड येथे झाली होती. या चाचण्या देताना अनेक अडचणी निर्माण झाल्या होत्या. यावेळी शेकापच्या चित्रलेखा पाटील यांचा पाठींबा आणि साई पाटील यांच्या सहकार्यामुळे आर्यन खारकरची आयएसपीएलमध्ये निवड झाली.




निवडीअगोदर झालेल्या लिलाव प्रक्रियेत आर्यनवर तीन लाखांची बोली लावण्यात आली. त्याची फाल्कन रायझर्स हैदराबाद संघात गोलंदाज म्हणून निवड करण्यात आली आहे. या निवडीनंतर चित्रलेखा पाटील यांनी आर्यनचे अभिनंदन करीत त्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

आर्यन खारकर हा तरुण अलिबाग तालुक्यातील थळ येथील रहिवासी आहे. समुद्रकिनारी अन्य ठिकाणी होत असलेल्या क्रिकेट स्पर्धा बघून त्याला क्रिकेट खेळण्याची आवड निर्माण झाली. गावांमधील मुलांचे क्रिकेट खेळ बघून त्यालादेखील क्रिकेट खेळण्यास सुरुवात केली. गावासह समुद्रात तो क्रिकेट खेळत होता. त्याला गोलंदाजी करण्याची आवड निर्माण झाली. चांगली गोलंदाजी करू लागल्याने गावातील थळेश्वर संघातून खेळण्याची संधी त्याला मिळाली. गेली दोन वर्षे या संघातून खेळत राहिला. क्रिकेटमध्ये चांगली कामगिरी करीत असल्याचे लक्षात आल्यावर नावाजलेल्या एकविरा संघाने क्रिकेटच्या संघात सहभागी करून घेतले.

वयाच्या १४ वर्षापासून क्रिकेट खेळण्यास सुरुवात केली. दोन वर्षे थळेश्वर थळ संघातून खेळल्यानंतर आता एकविरा थळ संघातून खेळत आहे. आर्यनचे शिक्षण तेरावीपर्यंत झाले आहे. गेली पाच वर्षापासून क्रिकेट क्षेत्रात कार्यरत आहे. रायगड प्रिमिअर लिगमधून एक वेगळी ओळख निर्माण झाली. वेगवान गोलंदाज म्हणून नावारूपाला आला. अलिबागसह संपुर्ण जिल्ह्यात आर्यनचे नाव पोहचले. पनवेलमधील शिरढोण येथे झालेल्या रायगड प्रिमिअर लिगमध्ये संघातून चांगली कामगिरी बजावली. उत्कृष्ट गोलंदाज म्हणून दखल घेत त्यावेळी दुचाकी बक्षीस मिळाली. कमी वयात सर्वात मोठे बक्षीस मिळविणारा खेळाडू म्हणून आर्यन ठरला आहे. आतापर्यंत त्याने अनेक बक्षीसे मिळविली आहे.

शेकापच्या जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा नृपाल पाटील यांच्या पुढाकाराने कुरुळ येथे पीएनपी चषक भरविण्यात आले. या स्पर्धेतून अनेक खेळाडूंना व्यासपिठ मिळवून देण्याचे काम चित्रलेखा पाटील यांनी केले. त्यांच्या पुढाकाराने राबविलेल्या या उपक्रमामुळे अलिबाग व इतर तालुक्यातील खेळाडूंना आयपीएलच्या धर्तीवर खेळण्याची संधी मिळाली. पीएनपी चषक क्रिकेट स्पर्धेत आर्यन साखरकरला खेळण्याची संधी मिळाली. आर्यनला गोलंदाजीमध्ये आवड असून वेगवान गोलंदाज म्हणून त्याची एक वेगळी ख्याती आहे. आतापर्यंत त्याने क्रिकेट स्पर्धेतून दोन हजारहून अधिक गोलंदाजांना आऊट करण्याचा मान मिळविला आहे.

आतापर्यंत गावातील क्रिकेट स्पर्धांबरोबरच पीएनपी चषक व रायगड प्रिमिअर लीग क्रिकेट स्पर्धांमध्ये सहभाग घेतला आहे. या संधीचे सोने करण्याचा कायमच प्रयत्न केला आहे. परंतु, चित्रलेखा पाटील यांच्या सहकार्यातून (आयएसपीएल) इंडियन स्ट्रीट प्रिमिअर लीग स्पर्धेतून खेळण्याची संधी मिळाली आहे. आर्यनला त्याच्या आई, वडीलांकडून चांगले सहकार्य मिळाले आहे. पालकांकडून मिळालेल्या प्रोत्साहनामुळे आर्यनने क्रिकेट खेळातून अलिबागसह थळ गावाचे नाव लौकीक केले आहे. आता तो आयएसपीएलमध्ये फाल्कन रायझर्स हैदराबाद संघातून खेळणार आहे.

***

### चित्रलेखा पाटील यांच्याकडून कौतूक

**आयएसपीएल क्रिकेट स्पर्धेतून खेळाडूंना व्यासपिठ मिळावे यासाठी चित्रलेखा पाटील यांच्या पुढाकाराने खेळाडूंना मोफत प्रवेश देण्याचा प्रयत्न चित्रलेखा पाटील यांनी केला. त्यांच्यामुळे आर्यनसह अनेक खेळाडू आज या स्पर्धेत सहभागी झाले आहेत. आर्यन साखरकरची आयएसपीएलमध्ये निवड झाल्याबद्दल आर्यन साखरकर या खेळाडूचे शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांच्याकडून अभिनंदन करण्यात आले. तसेच, त्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी रायगड जिल्हा परिषद माजी अध्यक्षा सुप्रिया पाटील व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.**

### आई, वडीलांची साथ कायमच

**आर्यन साखरकर हा थळ मधील खेळाडू आहे. आर्यनची खेळातील आवड बघून त्यांनी त्याला त्या क्षेत्रात करिअर करण्यासाठी प्रोत्साहित केले. आई, वडीलांकडून मिळालेल्या पाठींब्यामुळे आर्यन आज एक वेगळ्या उंचीवर पोहचला आहे. आर्यनला आई, वडीलांची साथ कायमच राहिली आहे.**

# बाजारपेठेला वाहतूक कोंडीचे ग्रहण

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरुड तालुका पर्यटन क्षेत्र असल्याने रोज शेकडो पर्यटक राजपुरी येथील जंजिरा किल्ला पाहण्यासाठी येत असतात. पर्यटक आपली खासगी वाहने मुरुड शहरातील मच्छी बाजारातील रस्त्यावरून नेत असल्यामुळे याठिकाणी वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस वाढतच आहे. यामुळे वाहन चालकांना तसेच स्थानिकांना या वाहतुक कोंडीचा रोजच सामना करावा लागत आहे. या वाहतूक कोंडीपासुन दिलासा कधी मिळणार, असा प्रश्न स्थानिकांकडून उपस्थित होत आहे.



मुरूड शहरातील लोकसंख्ये बरोबर गाड्यांची संख्या देखील झपाट्याने वाढत आहे. यातच शहरातील रस्ते अरूंद असल्यामुळे गाडी पार्किंगसाठी देखील जागा अपूरी पडत आहे. यामुळे देखील स्थानिकांना वाहतूक कोंडीलो सामोरे जावे लागत आहे. या संदर्भात सागर कन्या मच्छीमार सोसायटीचे व्हाईस चेअरमन मनोहर मकु हे कृषीवल प्रतिनिधीनीशी बोलताना म्हणाले की, शुक्रवार ते रविवार पर्यटकांसह शेकडो वाहने या रस्त्यावर ऐतिहासिक जंजिरा किल्ला पाहण्यासाठी ये-जा करित असतात. त्यामुळे या तीन दिवशी बाजारपेठेतील रस्तावर एकेरी मार्ग करावे, जेणेकरून पर्यटकांना व स्थानिकांची या वाहतूक कोंडीपासुन सुटका होईल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली आहे.

# गतिरोधक दिसत नसल्यामुळे अपघात

**। कोलाड । वार्ताहर ।**

मुंबई-गोवा महामार्गावरील कोलाड पोलिस ठाण्यासमोर तसेच कोलाड रेल्वे पुलाखाली रस्त्यावर गतिरोधक बसविण्यात आलेले आहेत. परंतु, या गतिरोधकांना पांढरे पट्टे नसल्यामुळे या महामार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाश्यांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे.



मुंबई-गोवा महामार्गावरील कुंडलिका नदीपासुन कोलाड रेल्वे पुलापर्यंत एका बाजूचा सिमेंट कॉंक्रेटच्या रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे. यामुळे येणारी-जाणारी वाहतूक या महामार्गाने वळविण्यात आली आहे. या मार्गालगत राजिप केंद्र शाळा, हायस्कूल, पोलिस ठाणे, बाजारपेठ, प्राथमिक आरोग्य केंद्र असल्यामुळे या मार्गाने असंख्य नागरिक, रुग्ण व विद्यार्थी ये-जा करीत असतात. शिवाय हा मार्ग मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर असल्यामुळे या महामार्गाने वाहनांची सतत वर्दळ सुरु असते. यामुळे वाहनांचा वेग कमी करण्यासाठी कोलाड पोलिस ठाण्यासमोर तसेच कोलाड रेल्वे पुलाखालील रस्त्यावर गतिरोधक बसविण्यात आले आहेत. परंतु, गतिरोधकावर पांढरे पट्टे नसल्यामुळे या महामार्गावरून ये-जा करणाऱ्या वाहन चालकांना हे गतिरोधक दिसत नसल्याने वाहनचालकांचे वेगावर नियंत्रण राहत नाही.

यामुळे येथे अपघाताच्या घटना घडत असुन दोन दिवसांपूर्वी एक महिला दुचाकीवरून पडून जखमी झाली होती. तसेच, रात्रीच्या वेळी रस्त्याला पथदिवे नसल्यामुळे हे गतिरोधक वाहनचालकांच्या लक्षात येत नाही. यामुळे संबंधित विभागाने याकडे लक्ष देऊन हा प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी प्रवासी वर्गातून केली जात आहे.

# कुलाबा गुणगौरव सोहळ्याचे आयोजन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त रायगड काँग्रेस सेवा फाऊंडेशन, मा. आमदार मधुशेठ ठाकूर चॅरिटेबल ट्रस्ट, भाई जगताप मित्र मंडळ आणि अ‍ॅड. उमेशदादा ठाकूर मित्रमंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने ३ जानेवारी रोजी युवक मार्गदर्शन तथा गुणगौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कला, क्रीडा, पत्रकारिता तसेच वैद्यकीय क्षेत्रातील बहुसंख्य गुणीजनांना 'कुलाबा जीवन गौरव' या राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. या वर्षीही राज्यभरातील बहुसंख्य गुणीजनांना या राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

यानिमित्ताने कुलाबा जीवन गौरव पुरस्कार समितीच्यावतीने राज्यातील सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कला, क्रीडा, पत्रकारिता तसेच, वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या गुणीजनांनी माहितीच्या स्वयंघोषित सत्यतेसह अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. याचबरोबर स्वतःची वैयक्तिक माहिती, सद्यःस्थिती, कारकीर्द आदींचा उल्लेख तसेच कामाचा सविस्तर आढावा, संक्षिप्त माहितीसह संबंधित छायाचित्रे, प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती, वृत्तपत्र किंवा बातम्या कात्रणांच्या छायांकित प्रती, शिफारसपत्रे या स्वरूपात माहिती पाठवायची आहे. अधिक माहितीसाठी आकाश घरत (७२०८५४९३१७) व रुचिता शिंदे (८२३७११८९८३) यांच्याशी संपर्क साधावा.

### उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना आवाहन

# कर्जतमध्ये पालिकेविरोधात उपोषण

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत शहरातील नागरी समस्यांच्या बाबतीत कर्जत शहर बचाव समिती गेली सहा महिने सातत्याने आवाज उठवत आहे. या समितीच्या माध्यमातून कर्जत नगरपरिषदेकडे देण्यात आलेल्या निवेदनावर सकारात्मक प्रतिसाद पालिका प्रशासन देत नसल्याचे दिसून येत आहे. शहरातील नागरी सुविधांचा पूर्णपणे बोजवारा उडाला असून या समस्यांवर पालिकेने लक्ष वेधून नागरी समस्यांवर मार्ग काढावा, यासाठी पालिकेला अर्ज केले होते. मात्र, पालिका प्रशासनाने या अर्जांना केराची टोपली दाखवली आहे. त्यामुळे अ‍ॅड. कैलाश मोरे यांच्या संयोजनाखाली कर्जत शहर बचाव समितीच्या माध्यमातून पालिकेच्या विरोधात साखळी उपोषणाचा मार्ग हाती घेण्यात आला आहे. रविवारपासून लोकमान्य टिळक चौकात साखळी उपोषणाला सुरुवात झाली आहे.

# चांगभलं मंदिराचा भंडारा उत्साहात

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ माथेरान घाट रस्त्यात माथेरान शहराची वेस असलेल्या ठिकाणी चांगभलं मंदिर आहे. या मंदिरातील चांगभल देवाला माथेरानवर येणारे संकट वेशीवर रोखणारा देव समजले जाते. तसेच, नेरळ-माथेरान असा अवघड घाटातील प्रवास टॅक्सी सेवेच्या माध्यमातून देणाऱ्या टॅक्सी चालकांवर कोणतेही संकट आणू देत नाही. अशी श्रद्धा असल्याने नेरळ माथेरान टॅक्सी संघटनेच्यावतीने डिसेंबर महिन्यात चांगभलं मंदिरात वार्षिक भंडारा आयोजित केला जातो. या वार्षिक भंडाऱ्यासाठी दस्तुरी येथील कुली संघटना, मुलवासी अश्वपाल संघटना आणि लॉजिंग संघटना यांचे सहकार्य मिळाले.



माथेरान घाटरस्त्यात असलेल्या श्री चांगभलं मंदिर येथे नेरळ माथेरान टॅक्सी चालक-मालक सेवाभावी संस्था तसेच दसुरी नाक्यावरील कुली संघटना, अश्व पाल संघटना व लॉजिग संघटना यांच्या माध्यमातून भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. गेल्या २० वर्षांपासून नेरळ-माथेरान टॅक्सी संघटना हा भंडारा सोहळा साजरा करीत आहे. यावेळी श्री पिसनाथ महाराज चांगभलं मंदिर फुलांनी सजवून मंदिराला विद्युत रोषणाई करण्यात आली होती.

# समाजसेवा शिबीर संपन्न

**। तळा । वार्ताहर ।**

तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाच्या कनिष्ठ महाविद्यालयाचे समाजसेवा शिबीर मुरुड तालुक्यातील खामदे या गावामध्ये पार पडले. या शिबिराचे उद्घाटन कमलाकर थोटे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ग्रामस्थ, शिबिरार्थी विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते. उद्घाटनानंतर विद्यार्थ्यांनी मंदिर परिसर व मुख्य रस्त्यांची स्वच्छता केली. सायंकाळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा म हापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्राध्यापक डॉ भगवान लोखंडे यांचे अभ्यासपूर्ण व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. लोखंडे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विद्यार्थ्यांबद्दलचे विचार सम जावून सांगितले. यानंतर रात्री विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. शिबिराच्या दुसऱ्या दिवशी सकाळी गावामध्ये साफसफाई करण्यात आली. तद्नंतर दुपारी इंदापूर कॉलेजचे प्राध्यापक हज्जू सर यांनी श्रम संस्काराचे महत्त्व या विषयावर व्याख्यान दिले.



### खैरेखुर्द येथे केंद्रस्तरीय विज्ञान प्रदर्शन संपन्न

# विद्यार्थ्यांमधून शास्त्रज्ञ तयार करण्याचा उद्देश

**। चणेरा । प्रतिनिधी ।**

रोहा तालुक्यातील खैरेखुर्द येथील जिल्हा परिषद शाळेत केंद्रस्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. विज्ञानाच्या प्रगतीमुळे विद्यार्थ्यांमधून भविष्यातील शास्त्रज्ञ तयार व्हावेत, हाच उद्देश लक्षात घेऊन या विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. केंद्रप्रमुख दिपक पाबरेकर यांच्या अध्यक्षते खाली केंद्रातील १७ शाळांनी या विज्ञान प्रदर्शनासाठी सहभाग घेतला होता.

यावेळी विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी ७० पेक्षा जास्त प्रतिकृतींची मांडणी केली होती. त्यामध्ये पाणी, जमीन, भौगोलिक बदल, हवा व तिचा वापर असे एक ना अनेक विषय घेऊन विद्यार्थ्यांनी प्रतिकृत्या मांडल्या होत्या. या विज्ञान प्रदर्शनातून सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे परीक्षण करून प्रथम तीन विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व चषक देण्यात आले. तसेच, सर्व सहभागी विद्यार्थ्यांना देखील सहभाग प्रमाण पत्र देण्यात आले. दरम्यान, कार्यक्रमाच्या उद्घाटन समारंभाला सरपंच मुजम्मील गिते, सरपंच अतिश मोरे, अब्बास मुकादम, इर्शाद पेडेकर, शिक्षक जाधव, मुंगसे, कांबळे, सर्व शाळांमधील मुख्याध्यापक, शिक्षक वर्ग आणि खैरेखुर्द राजिप शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अब्दुल हमीद गिते, उपाध्यक्षा नाजिया मुकादम व सर्व सदस्य उपस्थित होते.



**मोठ्या गटात प्रथम क्रमांक जुहा नागोठकर (खैरे खुर्द उर्दू शाळा), द्वितीय क्रमांक सृष्टी कासकर व सलोनी सातामकर (न्हावे शाळा), तर तृतीय क्रमांक उमेरा धनसे (खैरे उर्दू शाळा). लहान गटात प्रथम क्रमांक श्लोक गोणे व शिवाणी विचारे (चणेरा शाळा), द्वितीय क्रमांक सॉलेहा फकीर (चणेरा हायस्कूल), तर तृतीय क्रमांक नवखार शाळेला मिळाला आहे. तसेच, टाकाऊ पासून टिकाऊत प्रथम क्रमांक अस्मा गिते, द्वितीय क्रमांक उमर मुकादम तर, तृतीय क्रमांक मोहम्मद गिते यांना मिळाला आहे.**

# तांबाटी गाव ठरले 'मॉडेल व्हिलेज'

**। वावोशी । वार्ताहर ।**

जलशक्ती मंत्रालयाच्या स्वच्छ भारत मिशन अंतर्गत केंद्रीय समितीने शनिवारी (दि.१४) तांबाटी ग्रामपंचायतीला भेट देऊन स्वच्छता उपक्रमांची तपशीलवार पाहणी केली असून तांबाटी गावाला 'व्हीलेज मॉडेल'चा दर्जा प्राप्त झाला आहे. समितीच्या या 'मॉडेल व्हिलेज' पाहणी दौऱ्यात तांबाटी ग्राम पंचायतीने राबवलेल्या घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन प्रणाली, सार्वजनिक शोष खड्डे, लिच पिट, कंपोस्ट पिट, कचरा वर्गीकरण शेड, गांडूळ खत प्रकल्प यांची पाहणी करून तांबाटी ग्राम पंचायतीच्या या स्वच्छता उपक्रमांचे जलशक्ती मंत्रालयाच्या केंद्रीय समितीकडून कौतूक करण्यात आले आहे. तसेच, त्याअंतर्गत येणाऱ्या चार महसुली गावे आणि वडवळ ग्रामपंचायतीत राबवण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचा देखील आढावा घेण्यात आला.

या समितीचे नेतृत्व जलशक्ती मंत्रालयाच्या संयुक्त सचिव व संचालक जितेंद्र श्रीवास्तव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. समितीच्या या दौऱ्यात संजय कुमार सिन्हा (संचालक, स्वच्छ भारत मिशन ग्रामीण विभाग), प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार बलदेव भारती व अरम तौहीड, रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे, ठाणे जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रमोद काळे, पंचायत समिती खालापूरचे गटविकास अधिकारी संदीप कराड, आशिष थोरात आणि सुजाता सामंत (राज्य समन्वयक, स्वच्छ भारत मिशन) यांचा समावेश होता.

केंद्रीय समितीने ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन प्रणालींचे बारकाईने निरीक्षण केले. स्वच्छ भारत मिशन २.० ॲपमधील डाटाची पडताळणी केली. यासोबतच सार्वजनिक शोष खड्डे, लिच पिट, कंपोस्ट पिट, कचरा वर्गीकरण शेड, गांडूळ खत प्रकल्प यांची पाहणी करून महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. तसेच गावातील शाळा, अंगणवाडी आणि घराघरातील स्वच्छता उपक्रमांसाठी स्थानिक नागरिकांशी संवाद साधला.

तांबाटी ग्रामपंचायतीचे अधिकारी प्रशांत कदम यांनी समितीसमोर स्वच्छता विषयक विविध उपक्रमांचा सविस्तर आढावा सादर केला. समितीने या उपक्रमांचे मनापासून कौतुक केले आणि भविष्यातही अशाच प्रकारे यशस्वी अंमलबजावणी करण्याचे आवाहन केले.

# ज्ञानयोग्याचा गौरव

माधव धनंजय गाडगीळ यांना चॅम्पियन ऑफ द अर्थ हा पुरस्कार मिळणे हा एका जनतेशी नाळ जोडून पर्यावरणाचा अभ्यास करणाऱ्या एका अभ्यासकाचा सार्थ गौरव आहे. हा आंतरराष्ट्रीय पातळीवरचा जीवनगौरव नव्हे तर नोबेलच्या तोडीचा पुरस्कार आहे. पश्चिम घाटाचे रक्षण करण्यासाठी त्यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने केलेल्या शिफारशींमुळे कोकणाला त्यांचे नाव विशेष परिचित आहे. कोकणात कोणतेही घातक रासायनिक वा औद्योगिक प्रकल्प येऊ नयेत किंवा अंदाधुंद खाणकामाला वा खोदकामाला परवानगी दिली जाऊ नये अशी स्पष्ट शिफारस त्यांनी केली होती. दुर्दैवाने आपल्या राजकारण्यांनी ती धुडकावून लावली आणि कोकणाची दिवसेंदिवस अधिकाधिक वाट लागत आहे. आता निदान या पुरस्काराच्या निमित्ताने तरी त्यांचे म्हणणे कोकणी जनतेने मनावर घ्यायला हवे. प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ डॉ. धनंजयराव गाडगीळ हे माधवरावांचे वडील. त्यामुळे बुद्धीवादी प्रागतिक विचाराची परंपरा त्यांना घरातूनच लाभली. माधव गाडगीळांचे शालेय आणि बी.एस्सी.पर्यंतचे शिक्षण पुण्यात झाले. त्यानंतर ते एम.एस्सी. करण्यासाठी मुंबईच्या इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समध्ये गेले आणि त्यांनी मरीन बायोलॉजीमध्येएम. एस्सी. केली. विवाहानंतर ते पत्नीसह अमेरिकेत हार्वर्ड विद्यापीठात पीएच.डी. करायला गेले. वस्तुत: दोघांनाही हार्वर्डमध्येप्राध्यापकपद मिळत होते; पण भारतातच येऊन काम करायची दोघांचीही प्रबळ इच्छा होती. त्यानुसार ते परतले व कितीतरी विषयात त्यांनी संशोधन केले. आरंभी त्यांनी आणि त्यांचे महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ.वा.द. वर्तक या दोघांनी मिळून खूप पायपीट करून महाराष्ट्रातल्या देवरायांचा अभ्यास केला. नंतर कर्नाटकातील बंदिपूरच्या जंगलातील हत्तींच्या सामाजिक जीवनाचा अभ्यास केला. त्यांच्या पुढाकाराने प्रथमच भारतातील हत्तींची मोजदाद झाली. माहुतांबरोबर बोलण्याच्या गरजेतून ते कानडी भाषा शिकले. त्यामुळे ते कानडीतून अस्खलित लिहू-बोलू शकतात.मेंढपाळ आणि धनगरांच्या जीवनाचा पारिस्थितीवर काय परिणाम होतो, याचा त्यांनी अभ्यास केला. त्यांच्या सामाजिक जातिव्यवस्थेबद्दलही त्यांनी अभ्यास केला.

## लोकसहभागाचा आग्रह

पुढे त्यांनी केरळ-कर्नाटक-महाराष्ट्रात असणारा पश्चिम घाट, राजस्थानचे वाळवंट, हिमालय, मध्य भारतातील वने आणि दख्खनच्या पठारावरील शेती यांचा स्वत: फिरून अभ्यास केला. हा त्यांचा अहवाल आधुनिक भारतामधील विविध प्रकारच्या पर्यावरणीयऱ्हासाचा सांगोपांग विचार करणारा अभ्यास म्हणून ओळखला जातो. त्यासाठी त्यांनी नैसर्गिक संपत्तीचे व्यापारीकरण न करता, लोकशाहीकरण करण्याचा आणि त्यात लोकसहभाग मिळवण्याचा आग्रह धरला.एखादा प्रकल्प सुरू करण्यापूर्वी त्याचा पर्यावरण, तांत्रिक, सामाजिक, आर्थिक अंगांच्या दृष्टिकोनातून अभ्यास व्हावा म्हणून तसा कायदा येण्यापूर्वी अंतराळ संशोधन केंद्राच्या एका प्रकल्पाचा अभ्यास माधवरावांनीप्रा. सतीशधवन यांच्या सांगण्यावरून केला. तो भारतातील तसा पहिला अभ्यास. त्यानंतर केंद्र सरकारने तसा कायदाच आणला. माधवरावांनी अशा अनेक समित्यांवर काम केले. अशाच सामाजिक भावनेतून त्यांनी चंडिप्रसाद भट्ट यांच्याबरोबर चिपको आंदोलनात, सायलेंट व्हॅली आंदोलनात आणि पश्चिम घाट बचाव मोहिमेत सक्रिय सहभाग दिला. गरिबांच्यापर्यावरणवादास त्यांनी बळ पुरविले. केवळ शिकविणे हा उद्देश न ठेवता, इतर संशोधक, शिक्षक, धोरणकर्ते, स्वयंसेवी संस्था, शेतकरी आणि सामान्य नागरिकांबरोबर त्यांनी अनेक प्रकल्प राबविले.१९७०च्या दशकात त्यांचे काम पर्यावरण संवर्धनाशी संबंधित होते. १९८०च्या दशकात ते वननीतीशी संबंधित होते. १९९०च्या दशकात त्यांनी जैववैविध्य संवर्धन, आंतरराष्ट्रीय प्रयत्न आणि धोरणांविषयी काम केले, तर एकविसाव्या शतकात त्यांनी पर्यावरण शिक्षणाकडे लक्ष वळवून त्यात लहान मुलांना सहभागी करून घेण्याचे प्रयत्न केले. विविध समाजामध्ये कित्येक पिढ्यांपासून टिकून असलेले परंपरागत ज्ञान आणि पद्धती यांची नोंद ठेवण्याचे कार्य त्यांनी केले. त्यातूनच देवरायांचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी त्यांनी दबावगट निर्माण केले. बांबूची परंपरागत पद्धतीने केली जाणारी छाटणी ही अधिक शाश्वत असल्याचे आणि कागद उद्योगाकडून होणारी बांबूंची तोड पर्यावरणाला मारक आहे हे त्यांनी दाखवून दिले. गाडगीळ यांच्या अभ्यासामुळे वनउद्योगासाठी दिले जाणारे अनुदान वनांसाठीच कसे मारक आहे, हे स्पष्ट झाले.

## सरकारसोबत काम

विपुल जैवविविधतेच्या जगातील २५ प्रमुख देशांपैकी एक असलेल्या पश्चिम घाटातील जैवविविधतेची नोंद ठेवण्याचे काम त्यांनी हाती घेतले. त्यांनी तरंतुला प्रकारच्या कोळ्याची जात आणि टोरंट प्रकारच्या बेडकाची जात शोधली. त्यांच्या अभ्यासातून देशातील पहिला नीलगिरी बायोरिझर्व्हस्थापन झाला.देशातील सर्व विज्ञान अकादम्यांवर त्यांनी काम केलेले आहे. थर्ड वर्ल्ड अकॅडमीज ऑफ सायन्सेस, यूएस नॅशनल अकॅडेमी ऑफ सायन्सेसवर त्यांनी काम केलेले आहे. पंतप्रधानांच्या विज्ञान सल्लागार समितीवरही त्यांनी काम केलेले आहे. अब्जावधी रुपयांच्या जागतिक पर्यावरण निधीचे विविध राष्ट्रांतील प्रकल्पांना कसे वाटप करावे याची शास्त्रीय बैठक आणि छाननी करण्यासाठीच्या समितीचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले होते. त्यांच्या एकूण कार्यासाठी त्यांना १९८१ साली 'पद्मश्री', तर २००५ साली 'पद्मभूषण' पुरस्कार मिळाला. २००२ साली त्यांना हार्वर्ड विद्यापीठाचा शतकवीर माजी विद्यार्थी पुरस्कार मिळाला. याशिवाय त्यांना शांतिस्वरूप भटनागर पुरस्कार, ईश्वरचंद्रविद्यासागरगोल्डप्लेक, वसुंधरा पुरस्कार, व्होल्व्हो पर्यावरण पुरस्कार, कर्नाटक सरकारचा राज्योत्सव पुरस्कार असे सन्मान मिळालेले आहेत. वेळोवेळी अतिथी प्राध्यापक म्हणून अनेक परदेशी विद्यापीठांना भेटी देणारे प्रा. गाडगीळ विज्ञान आणि पर्यावरणासारखे विषय साध्या आणि सोप्या भाषेत सामान्यांपर्यंत पोहोचवण्यात वाकबगार आहेत. त्यांनी कन्नड, मराठी, इंग्रजी अशा विविध भाषांतून लेख लिहून जनजागृतीचे काम केले आहे. त्यांच्या पुस्तकांची भाषांतरे मराठी, कन्नड, हिंदी, गुजराती, मल्याळम, इंग्रजी अशा विविध भाषांतून झाली आहेत. 'दी हिंदू' या प्रसिद्ध वर्तमानपत्रातून मुलांसाठी त्यांनी लिहिलेला स्तंभ वाचकप्रिय झाला होता. मराठी विज्ञान परिषदेच्या १९८३ सालच्याउदगीर येथे भरलेल्या संमेलनाचे ते अध्यक्ष होते. मात्र दुर्दैवाने त्यांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा महाराष्ट्राने म्हणावा तसा उपयोग करून घेतलेला नाही. गाडगीळ अजूनही सक्रीयपणे लेखन वाचन करीत असतात. महाराष्ट्रातील येणाऱ्या पिढ्यांसाठी या ज्ञानयोगी व कर्मयोग्याचेजीवन नक्कीच प्रेरणा देणारे ठरेल. त्यांचे हार्दिक अभिनंदन.

विचार

# ऑस्ट्रेलियाचे लक्षवेधी पाऊल

***ऑस्ट्रेलियामध्ये १६ वर्षांच्या आतील मुले-मुली इंस्टाग्राम, स्नॅपचॅट आणि तत्सम इतर सोशल मीडिया व्यासपिठांचा वापर करू शकणार नाहीत. अलिकडेच यासंदर्भातील विधेयक तेथिल संसदेत प्रचंड बहुमताने मंजूर झाले. विधेयकाच्या बाजूने १०३ तर विरोधात १३ मते पडली. आता या विधेयकाचे कायद्यात रुपांतर होणार आहे. त्यांच्या पावलावर पाऊल टाकत अनेक देश असा विचार करु शकतात. एक मागोवा...***

**उर्मिला राजोपाध्ये**

ऑस्ट्रेलियामध्ये १६ वर्षांपर्यंतच्या मुलांवर सोशल मीडियाच्या वापरावर बंदी घालणारे विधेयक मंजूर करण्यात आले आहे. या लक्षवेधी घटनेचे पडसाद जगभर उमटू लागले आहेत. तिथे सिनेटच्या मंजुरीनंतर या विधेयकाचे कायद्यात रुपांतर होणार आहे. हे जगात प्रथमच घडत असून या कायद्यामुळे ऑस्ट्रेलियामध्ये १६ वर्षांच्या आतील मुले-मुली इंस्टाग्राम, स्नॅपचॅट आणि तत्सम सर्व प्रकारच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सचा वापर करू शकणार नाहीत. मुख्य म्हणजे हे विधेयक सोशल मीडिया कंपन्यांनादेखील वयोमर्यादा लागू करण्यासाठी जबाबदार धरणार आहे. वर उल्लेख केलेला वयोगट आपल्या माध्यमांचा वापर करत नसल्याची खातरजमा करण्याची जबाबदारी या कंपन्यांवर असेल. हा एक क्रांतिकारी निर्णय ठरल्यास आश्चर्य वाटणार नाही.

आजच्या डिजिटल जगात मुले लहान वयातच इंटरनेट वापरायला लागली आहेत. युनायटेड नेशन्सच्या आकडेवारीनुसार, जगातील प्रत्येक अर्ध्या सेकंदाला एक मूल पहिल्यांदा ऑनलाइन जगात प्रवेश करते. स्वाभाविकच दिवसागणिक सोशल मीडिया वापरकर्त्या मुलांचे प्रमाण किती मोठे आहे, हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. ही एक प्रकारची क्रांतीच आहे, पण या ऑनलाइन क्रांतीने अनेक गंभीर आव्हानेही समोर आणली आहेत. न कळत्या वयापासूनच सोशल मीडियाच्या गर्तेत अडकल्यामुळे त्याच्या वापराने व्यसनाधीनतेपर्यंत पोहोचल्यावर केवळ मानसिक आरोग्यच नाही तर शारीरिक समस्याही उद्भवू शकतात, असा इशारा जगभरातील तज्ज्ञ देत आहेत. यामुळेच



जगभरात सोशल मीडिया कंपन्यांच्या जबाबदाऱ्या वाढवण्याची मागणी जोर धरू लागली आहे. अनेक देश विशेषत: मुलांच्या ऑनलाइन सुरक्षिततेवर लक्ष केंद्रित करून नवीन कायदे करत आहेत. आता ऑस्ट्रेलियाने या दिशेने पाऊल टाकले असले तरी यामुळे त्यांच्यावर एकीकडे कौतुक तर दुसरीकडे टीकाही होत आहे.

सदर विधेयक संसदेत प्रचंड बहुमताने मंजूर झाले. विधेयकाच्या बाजूने १०३ तर विरोधात केवळ १३ मते पडली. आता ते सिनेटमध्ये पास होण्याच्या मार्गावर आहे. सिनेटच्या मंजुरीनंतर या विधेयकाचे कायद्यात रुपांतर होणार आहे. विशेष म्हणजे याला सत्ताधारी मजूर पक्ष आणि विरोधी लिबरल पक्षाचा पाठिंबा मिळाला आहे. त्यामुळे सिनेटमध्येही ते कोणत्याही अडथळ्याविना मंजूर होईल, असे मानले जात आहे. या विधेयकानुसार, पालकांची संमती किंवा आधीपासून अस्तित्वात असणाऱ्या सोशल मीडिया खात्यांसाठी कोणतीही सूट दिली जाणार नाही. यातील मोठी बाब म्हणजे या प्लॅटफॉर्मपासून मुलांना दूर ठेवण्यासाठी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मलाच व्यवस्था करावी लागणार आहे. कायदा लागू झाल्यानंतर, बंदी कशी लागू करायची हे ठरवण्यासाठी प्लॅटफॉर्मकडे एक वर्ष असेल. या कालावधीमध्ये ते तसे करू न शकल्यास मोठा दंड भरावा लागेल. तो साधारणपणे ३२.५ दशलक्ष डॉलर्स म्हणजेच २७० कोटी रुपयांचा असेल.

सरकारने युक्तिवाद करताना काही महत्त्वपूर्ण मुद्दे मांडले असून त्यांच्यानुसार ऑस्ट्रेलियन तरुणांसाठी सोशल मीडिया हानीकारक ठरू शकतो. आजमितीला १४ ते १७ वयोगटातील सुमारे ६६ टक्के ऑस्ट्रेलियन मुलांनी अतिशय हानिकारक ऑनलाइन सामग्री पाहिली असून यामध्ये औषधांचा चुकीचा वापर, आत्महत्या किंवा स्वत:ला हानी पोहोचवून घेणाऱ्या घातक मजकुराचा समावेश आहे. हे लक्षात घेऊन ऑस्ट्रेलियन सरकारने या वर्षी सोशल मीडियाचा वापर करण्यास योग्य अशी वयोमर्यादा निश्चित करण्यासाठी तंत्रज्ञानाची चाचणी सुरू केली. आपल्या मुलांवर होणाऱ्या सोशल मीडियाच्या परिणामाची काळजी असणाऱ्या पालकांसाठी हे करणे गरजेचे असल्याचे सरकारने आपल्या निर्णयाचे समर्थन करताना म्हटले आहे. यावेळी ऑस्ट्रेलियन पंतप्रधान अँथनी अल्बानीज यांनी आपण अनेक पालकांशी बोललो असल्याचे स्पष्ट केले. या चर्चेतून अनेक पालक मुलांच्या ऑनलाइन सुरक्षिततेबद्दल चिंतित असल्याचे दिसून आल्याचे मत त्यांनी माध्यमांपुढे मांडले.

अर्थातच टेक कंपन्यांनी या विधेयकाला विरोध केला आहे. खरे पाहता विधेयक मंजूर होण्यापूर्वीच त्याला तीव्र विरोध सुरू झाला होता. शंभरहून अधिक ऑस्ट्रेलियन आणि आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांनी एक खुले पत्र लिहून आपली नाराजी आणि नापसंती सरकारपुढे मांडली होती. या पत्राद्वारे सरकारने ठरवलेली वयोमर्यादा खूप कठोर असल्याचे नमूद केले होते. या महत्त्वपूर्ण विधेयकासंदर्भात टेक कंपन्यांचे म्हणणे आहे की, वयोमर्यादा निश्चित करण्याबाबतच्या संशोधनाचे निकाल समोर येईपर्यंत सरकारने हे विधेयक मंजूर करू नये. त्यांचा असा युक्तिवाद आहे की, निकाल समोर आला नसताना उद्योग किंवा ऑस्ट्रेलियन लोक या विधेयकासाठी आवश्यक असलेले वय किंवा अशा उपाययोजनांचा परिणाम समजू शकणार नाहीत.

तरुणांच्या मानसिक आरोग्यासाठी काम करणाऱ्या 'रीचआउट' या संस्थेनेही या कायद्याला आक्षेप घेतला आहे. संस्थेच्या म्हणण्याप्रमाणे ७३ टक्के तरुण मानसिक आरोग्याचे जतन करण्यासाठी सोशल मीडियाची मदत घेतात. असे असताना घालण्यात येणाऱ्या बंदीमुळे या सुविधेमध्ये बाधा येऊ शकते. एवढेच नाही, तर अम्नेस्टी इंटरनॅशनल आणि ऑस्ट्रेलियाच्या मानवाधिकार आयुक्त लॉरेन फिनले यांनीही या विधेयकावर टीका केली आहे. एकीकडे असे असताना जगातील इतर देश यासंदर्भात काय करत आहेत, याचीही माहिती घ्यायला हवी. अमेरिकेने २६ वर्षांपूर्वीच मुलांच्या ऑनलाइन सुरक्षेसाठी कायदा केला आहे. या कायद्याचे नाव 'चिल्ड्रन ऑनलाइन प्रायव्हसी प्रोटेक्शन ॲक्ट' असे असून याअंतर्गत १३ वर्षांखालील मुलांची माहिती गोळा करण्यापूर्वी वेबसाइट्सना पालकांची परवानगी घ्यावी लागेल, असा नियम आहे.

२००० मध्ये चिल्ड्रन्स इंटरनेट प्रोटेक्शन ॲक्ट अंतर्गत अनावश्यक सामग्रीपासून मुलांचे संरक्षण करण्यासाठी शाळा आणि ग्रंथालयांना इंटरनेट फिल्टर स्थापित करणे अनिवार्य करण्यात आले. तथापि, मुलांच्या वयाबाबत फसवणुकीची शक्यता तसेच या प्रकारच्या कृत्याला प्रोत्साहन देणारा ठरवून या कायद्यांवर टीका केली जाते. ऑस्ट्रेलियाच्या पावलावर पाऊल ठेवत ब्रिटीश सरकारही १६ वर्षाखालील मुलांसाठी सोशल मीडियावर बंदी घालण्याचा विचार करत आहे. ब्रिटनचे टेक्नॉलॉजी सेक्रेटरी पीटर काइल यांनी सांगितल्याप्रमाणे ऑनलाइन सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी, विशेषत: मुलांसाठी जे काही लागेल ते ते केले जाण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. त्यामुळे लवकरच या देशातही अशा प्रकारचा कायदा लागू होण्याची शक्यता नाकारता येत नाही. फ्रान्सने १५ वर्षांपर्यंतच्या मुलांसाठी शाळांमध्ये मोबाइल फोनवर बंदी घालण्याची चाचणी सुरू केली आहे. ही चाचणी यशस्वी झाल्यास संपूर्ण देशात लागू केली जाऊ शकते. इतकेच नाही, तर फ्रान्समध्ये १५ वर्षांपेक्षा कमी वयाची मुले पालकांच्या परवानगीशिवाय सोशल मीडिया वापरू शकत नाहीत, असाही कायदा आहे. त्याच वेळी नॉर्वेसारख्या युरोपीय देशानेही सोशल मीडिया वापरण्याची वयोमर्यादा १३ वरून १५ वर्षे करण्याची घोषणा नुकतीच केली आहे. हे सगळे बघता भारतासारखा सोशल मीडियाचा प्रचंड वापर करणारा देश नेमकी कोणती भूमिका घेतो, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

भारत हा जगातील सर्वात जास्त लोकसंख्येचा देश आहेच, खेरीज तरुणांची सर्वाधिक संख्या असणाराही देश आहे. आपल्याकडेही अगदी लहान वयापासून मुलांच्या हातात फोन दिला जातो आणि ते सोशल मीडियावर सक्रिय होतात. महत्त्वाचे म्हणजे जगभरातील सर्वात स्वस्त इंटरनेट सेवा मिळत असल्यामुळे प्रत्येक वर्गातील मुले-याचा बिनधोक वापर करताना दिसतात. स्वाभाविकच नकळत्या, कोवळ्या आणि अजाण वयात सोशल मीडियाच्या जंजाळात अडकून, चुकीची माहिती मिळवून गैरवापर करणाऱ्यांची मोठी संख्या आणि यायोगे घडलेले भीषण गुन्हे दररोज चर्चेत असतात. मुलांना ज्ञानाची गरज असते, यात शंका नाही. मात्र सोशल मीडियावरुन ही गरज भागवणारे ज्ञान मिळते की मुले चुकीच्या आणि अनावश्यक माहितीच्या महापुरात वहावली जातात, हा खरा प्रश्न आहे. त्यामुळे भारत सरकारही या प्रश्नाचा साकल्याने अभ्यास करुन आवश्यक ती पावले उचलेल, अशी आशा वाटते.

आजकाल

# बाबा आढाव यांचे उपोषण कशासाठी?

**विश्वंभर चौधरी**

तब्बल ८०००००००० आठशे कोटींपेक्षा जास्त रक्कम म्हणजे आठ अब्ज रुपये निवडणूक आयोगानं महाराष्ट्र विधानसभा निवडणुकी दरम्यान पकडले आहेत. हे अर्थातच हिमनगाचं एक टोक आहे. न पकडली गेलेली रक्कम याच्या कितीतरी पटीत असणार हे उघड आहे.

हा आकडा निवडणूक आयोगानं अधिकृतरित्या दिलेला आहे. कोणतंही न्यायालय याची स्वत: होऊन दखल घेऊन देशातल्या निवडणुका एवढ्या भ्रष्ट झाल्या असतील तर उपाययोजना करा हे सांगायला तयार नाही.

एवढा पैसा कुठून आला?

'सगळेच पक्ष पैसा वाटतात' असं जनरलायझेशन करून भ्रजपाचं संरक्षण करणाऱ्या मतलबी समर्थकांनी एक काम करायला पाहिजे. पुण्यात किंवा मुंबईत तुमच्याकडे कामाला येणारी बाई, ड्रायव्हर, भाजीवाला कोणी ना कोणी उर्वरित महाराष्ट्रातून आलेला आहे. त्यांच्याशी बोला. ते ही नसेल तर ओला किंवा उबरच्या ड्रायव्हरशी बोला. बहुतेक सगळे हेच सांगतात की मतामागे पाच हजार आणि जाण्यायेण्याचा खर्च त्यांना दिला गेला. नंतर कोणत्या पक्षानं दिला विचारा, उत्तर मिळेल. फसवता कोणाला जनरलायझेशन करून?

बाबा आढाव यांनी यावर उपोषण केलं. श्रीकांत उमरीकर या आमच्या मित्र असलेल्या संघ भाजप समर्थक महोदयांनी लगेच त्यांची खिल्ली उडवणारी ती काय ती त्यांची उसंतवाणी लिहीली.

प्रश्न बाबा आढाव यांचा नाही. वयाच्या ९५ व्या वर्षी एक माणूस निवडणुकीत एवढा काळा पैसा का येतो म्हणून तीन दिवस उपोषण करतो आणि श्रीकांतला काळा पैसा हा मोठा प्रश्न न वाटता बाबांचं उपोषण हाच महत्वाचा खिल्ली उडवण्यायोग्य प्रश्न वाटतो, ही मानसिकता कुठून येते हा प्रश्न आहे.

श्रीकांत आणि इतर संघवाले अथवा भाजप समर्थक हे तेच लोक आहेत जे काळा पैश्याविरूद्ध नकली आंदोलन करणाऱ्या बाबा रामदेव नावाच्या व्यापाऱ्याचं जोरदार समर्थन करत होते. ही तीच माणसं आहेत जी आपल्याला घसे खरवडून सांगत होती की मोदी काळा पैसा भारतात आणणार आणि देशातला भ्रष्टाचार थांबवणार. आणि काळ्या पैश्यांविरूद्ध लढणाऱ्या माणसाची आज तेच थट्टा उडवत आहेत.

संघाच्या कोणत्या स्वयंसेवकानं हा विषय कोर्टात नेऊन मागणी केली की निवडणूक नियमात सुधारणा करा? कोण संघवाला निघाला ज्यानं स्वतःच्या सरकारला पत्र लिहून सांगितलं की निवडणुकीतला पैसा थांबवण्यासाठी उपाययोजना करा?

श्रीकांत हे फक्त उदाहरण आहे. अनेक लोक आहेत. संघ दहा तोंडांनी बोलतो. खरं कधीच बोलत नाही. खोटं हेच खरं कसं हे सिद्ध करण्यासाठी बोलतो. भ्रष्टाचारावर संघाची भूमिका अत्यंत मतलबी आणि संधीसाधू आहे. मोदींचा भ्रष्टाचार ही संघाला राजकीय अपरिहार्यता वाटते तर काँग्रेसचा भ्रष्टाचार म्हणजे महापाप. काश्मिरात भाजपानं मेहबुबा सोबत जाणं ही देशभक्ती आहे असं संघ सांगणार आणि काँग्रेसनं तेच केलं तर तो देशद्रोह. सत्तर हजार कोटींचा आरोप करून अजितदादांना मुख्यमंत्री केलं की संघ ती चाणक्यगिरी आहे असं सांगणार, काँग्रेस सोबत असले की दादा त्यांच्यासाठी भ्रष्टाचाराचं प्रतिक असणार. महाराष्ट्रात संघाचे गोरक्षक गोमांसावर गजहब माजवणार आणि गोव्यात यांचं सरकार गोमांसाचा व्यापार करणार. ही विचारसरणी नकली आहे हे आम्ही म्हणतो ते याचसाठी. संविधानावर बेगडी प्रेम दाखवतांना हे लोक संविधानिक पदांना हायजॅक करून टाकतात. मंदीर-मस्जिदीवर आंदोलनं करणार पण व्यवस्था सुधरावी यासाठी त्यांनी आंदोलन केल्याचा इतिहास नाही. देशाच्या स्वातंत्र्यलढ्यातही नव्हते. रिफॉर्म्सच्या कोणत्याही लढ्यात नव्हते. मुस्लीम स्त्रीयांच्या बुरखा हटावसाठी लढले म्हणून हे हमीदभाईंचं कौतुक करणार पण गुजरात-राजस्थानच्या बायकांच्या घुंघटमुक्तीसाठी आंदोलन करणार नाहीत. उलट एखाद्या बाईनं घुंघट नाकारला तर संस्कृती बुडवली म्हणून तिला टार्गेट करणार. बिंदी लावणं अथवा न लावणं एखाद्या बाईचं व्यक्तीस्वातंत्र्य आहे हेही मान्य नसलेली ही विचारधारा. एखाद्या आंदोलनाचा वापर स्वतःच्या राजकीय फायद्यासाठी कसा करायचा याचं कसब मात्र त्यांच्यात ओतप्रोत भरलेलं आहे.

श्रीकांतला कदाचित बाबा आढाव हा माणूसच माहित नसेल. एक गाव एक पाणवठा ही त्यांची चळवळ माहीत नसेल. संघवाल्या कोणालाच हा माणूस कळणार नाही कारण काच आणि पत्रा वेचणार्या कष्टकरी बायका ही बाबांच्या दृष्टीनं माणसं आहेत तर संघवाल्यांच्या दृष्टीनं मतदार. आदिवासी बाबांच्या दृष्टीनं माणूस असतो तर संघवाल्यांच्या दृष्टीनं वनवासी मतदार. हमाल हा बाबांच्या दृष्टीनं माणूस असतो तर संघवाल्यांच्या दृष्टीनं मतदार. वंचित महिला बाबांच्या दृष्टीनं माणूस असतात तर संघवाल्यांच्या दृष्टीनं 'लाडकी' मतदार.

निवडणुकीत झालेला पैश्यांचा मुक्त वापर आणि हा पैसा आला कुठून हा गंभीर विषय आहे. संघ समर्थक बाबा आढाव यांची खिल्ली उडवणारच कारण निवडणुकीतून पैसा वजा झाला तर भाजप शून्य राहील हे त्यांना माहीत आहे. पैसा आणि धार्मिक द्वेष हे त्यांच्यासाठी सत्तेचे पासवर्ड आहेत. भारताला हिंदू राष्ट्र करायचं असेल तर भाजपाचे सगळे राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक व्यभिचार हाच आपला पवित्र राष्ट्रीय कुलाचार आहे हे मतदारांवर ठसवणं हीच जबाबदारी अनेकांनी अंगावर घेतली आहे. एकदा विवेकाला दीर्घ सुट्टीवर पाठवलं की कोणताही विकार हाच विचार वाटतो आणि आपण कोणावर बोलत आहोत याचं भान रहात नाही. भविष्यात विवेक कधी जागा झालाच तर आपण काय भीषण करून बसलो हे अफगाणिस्तानच्या लोकांसारखं लक्षात येऊन पश्चात्तापही होईल पण वेळ निघून गेलेली असेल.

लोकसंसद

## सौंदाळा गावच्या ग्रामस्थांचे स्वागतार्ह निर्णय

आई-बहिणीवरुन शिवी देणाऱ्यांना ५०० रुपयांचा दंड, संध्याकाळी ७ ते रात्री ९ यावेळेत गावातील शालेय विद्यार्थ्यांने मोबाईल वापरल्यास त्याच्या पालकांना ५०० रुपये दंड तसेच बालकामगारमुक्त गाव करण्यासाठी 'बालकामगार दाखवा एक हजार रुपये मिळवा' अशा प्रकारचे ऐतिहासिक निर्णय घेऊन अहिल्यानगर जिल्ह्यातील नेवासा तालुक्यातल्या सौंदाळा ग्रामपंचायतीने महाराष्ट्रापुढे एक नवा आदर्श उभा केला आहे. ग्रामपंचायतीच्या वतीने यासंदर्भातील निर्णयाचे फलक गावात अनेक ठिकाणी लावण्यात आले आहेत. सौंदाळा ग्रामपंचायतीचे हे निर्णय स्वागतार्ह असून सामाजिक भान जपल्याबद्धल त्यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. गेल्यावर्षी नांदेड जिल्ह्याच्या देगलूर तालुक्यातील येरगीच्या ग्रामस्थांनी आई-वडिलांचा सांभाळ न करणाऱ्या मुलांचा स्थावर मालमत्तेमध्ये वारसा न लावण्याचा घेतलेला निर्णय, कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ तालुक्यातील हेरवाडच्या ग्रामस्थांनी विधवा महिलांना त्यांच्या पतीच्या निधनानंतर दिल्या जाणाऱ्या अपमानास्पद वागणुकीच्या विरोधात 'विधवा प्रथा बंद' करण्यासंबंधीचा केलेला निर्णय तसेच हातकणंगले तालुक्याच्या माणगावच्या ग्रामस्थांनी आई-वडिलांचा सांभाळ न करणाऱ्या मुलांची ग्रामपंचायतीच्या दफ्तरी असलेली वारसा नोंद रद्द करण्याचा निर्णय घेतला घेतलेला निर्णय असो, राज्यातील गावपातळीवर होणाऱ्या अशा आदर्शवत निर्णयांमुळे देशभरात महाराष्ट्र राज्याची प्रतिमा अधिक उजळून निघाली आहे.

**- प्रदीप शंकर मोरे, अंधेरी**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**१६ डिसेंबर**

**१७६३ :-** कवी नाटककार, तंजावरचे राजे प्रतापसिंह भोसले यांचे निधन. संस्कृत साहित्य, संगीतशास्त्र, धर्मशास्त्र आणि वेदांत यात पारंगत असणाऱ्या प्रतापसिंहांनी 'सीताकल्याण', 'पार्वतीकल्याण', 'उषाकल्याण', 'कृष्ण जनन' लिहून १७ नृत्यनाटके मराठी व तेलगू भाषेत लिहिली. याशिवाय 'मुद्राराक्षस नाट्यकथा' हा ओवीबद्ध ग्रंथ आणि 'उमा सहिता', 'चंद्रहासकथा', 'रासक्रीडा', 'गोपीवस्त्रहरण' मिळून ११ काव्ये त्यांनी लिहिली. त्यापैकी भागवताच्या आधारे लिहिलेले 'श्रीकृष्ण मंजिरी' वेगवेगळ्या वृत्तात आहे. या व्यतिरिक्त त्यांनी कामशास्त्रावर 'मदनसंजीवन' हा ग्रंथ लिहिला असल्याची नोंद आहे. **१८६९ :-** 'शिल्पशास्त्र', 'धर्मशास्त्र' या विषयावरचे लेखक कृष्णाजी विनायक वझे यांचा जन्म. 'शिल्पशास्त्रसार' ह्या महत्त्वपूर्ण ग्रंथासह 'नगररचना' भारतीयशास्त्र', 'वास्तुशास्त्र', 'शिल्पविद्या', 'शिल्पशास्त्राचे महत्त्व' अशी पुस्तके लिहिलीत. ह्याखेरीज 'प्राचीन भारतीय शिल्पशास्त्राची दहा उपशास्त्रे', 'बत्तीस विद्या व चौसष्ठ कलांची भृगुसंहितेनुसार मांडणी करुन शिल्पशास्त्राच्या विविध अंगावर लेख लिहिले. याशिवाय 'धर्मशिक्षणाचा ओनामा', 'हिंदूधर्म' हे सहा खंडात्मक पुस्तक', 'विद्यार्थ्यांचा धर्म' तसेच भावी हिंदी स्वराज्य व आजच्या स्वराज्य संस्था आदी ग्रंथ प्रसिध्द आहेत. **१८९९ :** नाट्यविषयक लेखक सुमंत यशवंत जोशी यांचा जन्म. यांनी 'अत्रे उवाच' आणि 'रामसुधा' मधून आचार्य अत्रे आणि गडकऱ्यांच्या नाटकातील सुभाषिते संपादन केली. याशिवाय मराठी नाटयसृष्टीतील 'मुशाफिरी' हा लेखसंग्रह आणि 'नमन नटवरा' मधून दिवंगत नाटयसेवकांचा अल्पपरिचय अशी साहित्य संपदा. **१९२१ : -** साहित्य, संगीत, नाटक, राजकारण अशा विविध क्षेत्रात आपला ठसा उमटवणारे कॉ. दत्तात्रय यशवंत केळकर उर्फ दत्ता केळकर यांचा जन्म. मातीच्या चुली हे नाटक तसेच आत्मशोध हे पुस्तक त्यांचे प्रकाशित झाले आहे. **१९२६ :-** प्रहसनकार बबन प्रभू यांचा जन्म. 'झोपी गेलेला जागा झाला', 'दिनूच्या सासूबाई राधाबाई' ही त्यांची गाजलेली प्रहसने. **१९२७ :-** लेखक विठ्ठल प्रल्हाद तथा हेमंत कानिटकर यांचा जन्म. ह्यांच्या लेखन संपदेत 'अनुरुपता' हे विवाह पध्दतीवर बेतलेले नाटक, तसेच 'आता भिस्त माधवावर', 'हे नाटक पहावे बसवून' आणि 'फॉरिन रिटर्न्स' हे सामाजिक विषमतेवर बेतलेले नाटक आणि 'रामा, शिवा, गोविंदा' ही एकांकिका अशी नाट्यसंपदा. **१९३३ :-** लेखक, समीक्षक आणि लोकसाहित्याचे अभ्यासक डॉ. प्रभाकर भानुदास मांडे यांचा जन्म. लोककथा व लोकगीते यांचा विपूल संग्रह असणाऱ्या मांडे यांनी 'लोकसाहित्याचे अंतः प्रवाह', 'गावगाड्या बाहेर', 'सांकेतिक आणि गुप्त भाषा', 'परंपरा व स्वरुप', 'दलित साहित्याचे निराळेपण' या पुस्तकांसह 'महानुभावीय पद्यपुराण', 'लोकरंगकला आणि नागर रंगभूमी' अशी संपादने केली. **१९३७ :** संत साहित्य आणि भाषा विज्ञानाचे अभ्यासक डॉ. कल्याण वासुदेव काळे यांचा जन्म. वर्णनात्मक भाषाविज्ञान स्वरुप आणि पध्दती', 'व्यावहारिक मराठी', 'संतसाहित्य : अभ्यासाची काही दिशा' आदी ग्रंथ प्रसिध्द. **१९५६ : -** लेखक पद्माकर आनंदराव पाठकजी यांचा जन्म. 'बिनाका' या गाजलेल्या गीतमालेच्या कार्यक्रमावर 'बिनाका गीतमाला एक आठवण', 'संस्कारदीप' हे प्रार्थनांचे संकलन -हास, 'कहानी' पुरस्काराची' ही पुस्तके याशिवाय 'मोहम्मद रफी', 'मुले घडवण्यासाठी', 'सूत्रसंचालन आणि निवेदन', 'बॉलिवूड डायरी' हे प्रकाशनाच्या मार्गावर आहे तसेच वृत्तपत्र, दिवाळी अंक यातून सातत्याने लेखन. **१९५९:** लेखक, पेशाने चार्टर्ड अकौउटंट प्रा. हेमंत पंढरीनाथ जुन्नरकर यांचा जन्म. यांनी शेक्सपिअरची ओळख यात आठ ग्रंथ 'दोन भाऊ आणि दोनच भाऊ', 'शाब्बास जावईबापू', 'शेरास सव्वाशेर' अशी साहित्य संपदा.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१६ डिसेंबर

१) श्री. प्रेमजी बालन डेडीया
अलिबाग १६-१२-१९५०

२) श्री. काशिनाथ सखाराम वरसोलकर
कोळीवाडा, अलिबाग
१६-१२-१९५२

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते



स्व. प्रसन्नाकुमार वासुदेव कामत, स्मरणार्थ अलिबाग

# चौघा अधिकाऱ्यांचे निलंबन

## जिंदाल कंपनी वायू गळती प्रकरण

**। रत्नागिरी । प्रतिनिधी**

जयगड येथील जिंदाल कंपनीच्या परिसरात गुरूवारी (दि.१२) दुपरच्या सुमारास एलपीजी वायू गळतीची घटना घडली होती. या वायुगळतीमुळे नजीकच्या नांदीवडे माध्यमिक विद्यामंदिर आणि कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना त्रास जाणवू लागला आणि मुले बेशुद्ध पडू लागली होती. तसेच, श्वसनाचा त्रास सुरु झाल्याने मळमळ होऊन मुले उलट्या देखील करु लागली होती. अशा बाधित मुलांना मिळेल त्या खाजगी गाडीने रत्नागिरी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तर, काहींना तेथील उर्जा आरोग्य केंद्रात भरती करण्यात आली होती. या प्रकाराने जयगड भागात भीतीचे वातावरण पसरले असताना कंपनीने या प्रकाराबाबत हात झटकले होते. मात्र, स्थानिकांनी राजकीय पक्षांच्या मदतीने आवाज उठवल्याने कंपनीने चार अधिकाऱ्यांचे निलंबन केले असून या प्रकाराची चौकशी सुरु केली आहे.




या घटनेतील ६० विद्यार्थी व एका महिलेवर उपचार करण्यात आले आहेत. जेएसडब्ल्यू कंपनीच्या पोर्ट विभागातील एलपीजी प्रकल्पाच्या देखभालीचे काम सुरु होते. या एलपीजी कामावर नियंत्रण असणारे अधिकारी गंगाधर बंडोपाध्याय, भाविन पटेल व अभियंते सिध्दार्थ कोरे व दीप विटलानी यांनी योग्य ती काळजी न घेतल्याने व त्यांच्या निष्काळजीपणामुळे वायु हवेत पसरल्याने या घटनेला हेच जबाबदार असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. यामुळे त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### कंपनीच्या मनमानीमुळे मच्छीमारांना फटका

*जयगड येथील जिंदाल कंपनीच्या मनमानी कारभारामुळे मच्छीमारांना मोठा फटका बसला आहे. ज्या ठिकाणी जिंदाल कंपनीचे बॉयलरचे पाणी सोडले जाते त्या ठिकाणीची मासेमारी पूर्णतः नष्ट झाली आहे. या भागात मच्छीमारांना महाकूळ यासारखे मासे टनावर मिळत होते. मात्र, आता या समुद्र भागामध्ये माशांचे नामोनिशाण मिटले आहे. कंपनीने याकडे दुर्लक्ष करून मच्छीमारांचे मोठे नुकसान केले आहे. जिल्ह्यातील प्रशासकीय यंत्रणा ही कंपनीच्या बाजूने असल्याने कोणतीच उपाययोजना केली जात नाही.*

> नुकत्याच झालेल्या वायू गळतीमुळे विद्यार्थ्यांच्या जीवाशी प्रसंग बेतला होता. यातील काही विद्यार्थ्यांना कंपनीच्या ऊर्जा या आरोग्य केंद्रामध्ये भरती करण्यात आले होते. मात्र, या आरोग्य केंद्रात ऑक्सिजन व्यवस्थेबरोबर इतर कोणतेही सोयी सुविधा नसल्याने या विद्यार्थ्यांना रत्नागिरी येथील शासकीय रुग्णालयात हलवण्यात आले होते. जर, ऊर्जा केंद्रामध्ये आरोग्य विषयीच्या सोयी सुविधा उपलब्ध असती तर विद्यार्थ्यांवर तात्काळ उपचार झाले असते. या सगळ्याकडे कंपनीचे अधिकारी डोळेझाक करत आहेत.
>
> – शराफत गडबडे, मच्छिमार, जयगड

> जेएसडब्लू कंपनीतील वायुगतीच्या प्रकाराने नांदिवडे विद्यालयातील विद्यार्थ्यांना झालेला त्रासानंतर या प्रकारची चौकशी कंपनीच्या संबंधित यंत्रणेने केली आहे. या प्रकारात दोषी आढळणाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल. या प्रकारच्या चौकशीचा अहवाल आल्यावरच वायु गळतीमध्ये कोणता प्रकार घडला हे समजू शकेल.
>
> – सुदेश मोरे, जेएसडब्लुचे संपर्क अधिकारी

## वाडा-भिवंडी रस्त्यातच प्रसुती

**। पालघर । प्रतिनिधी ।**

भिवंडी येथील गरोदर महिला वाडा तालुक्यात प्रसूती दरम्यान थांबली होती. मात्र, त्रास जाणवत असल्याने तिच्या नातेवाईकांनी वाडा ग्रामीण रुग्णालयात तपासासाठी नेली असता तेथील रुग्णालयाच्या कर्मचाऱ्यांनी आणि अधिकाऱ्यांनी इतर ठिकाणी जाण्यास सांगितले होते. यामुळे तिला इतर ठिकाणी नेत असताना रस्त्यातच या महिलेची प्रसुती झाली. यामुळे पुन्हा त्यांना वाडा ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले असून सध्या महिला व नवजात मुलाची प्रकृती स्थिर असल्याची माहिती मिळत आहे. परंतु, वाडा ग्रामीण रुग्णालयांमधून रुग्णाला अनेकदा उपचारासाठी दुसरीकडे जाण्यास सांगण्यात येते. यामुळे रुग्णांच्या नातेवाईकांमध्ये प्रचंड संताप व्यक्त करण्यात येत आहे.

# सीसीटीव्ही कॅमेरे दुरूस्तीअभावी बंद

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला असलेल्या ठाणे शहरातील एक धक्कादायक बाब समोर आली आहे. सुरक्षेच्या माध्यमातून ठाणे महानगरपालिकेने शहरात १ हजार ७३० हून अधिक सीसीटीव्ही कॅमेरे बसवले आहेत. परंतु, या कॅमेऱ्यांची देखभाल करणे पालिकेला शक्य नसल्याचे समोर आले आहे. मार्च महिन्यामध्ये ३०० कॅमेरे बंद पडले होते. त्यानंतर आणखी ११३ कॅमेरे बंद पडल्याचे समोर आले आहे. कॅमेऱ्यांची दुरुस्ती तसेच, नवे कॅमेरे बसवण्यासाठी पालिकेकडे निधीच नसल्याचे सांगण्यात येत आहे.

ठाणे महानगरपालिका दुरुस्तीसाठी लागणारा २५ लाखांचा निधी खर्च करायला तयार नाही. त्यामुळे ठाणे पोलिसांकडून नव्याने लावण्यात येणाऱ्या ६ हजार कॅमेऱ्यांमध्ये हे बंद पडलेले कॅमेरे बदलून मिळावे, अशी अपेक्षा पालिकेने व्यक्त केली आहे. पालिकेच्या हद्दीत सोनसाखळी चोरीच्या घटनांना आळा बसावा, या उद्देशाने ठाणे, कळवा आणि मुंब्रा विभागात १ हजार ७३० सीसीटीव्ही कॅमेरे बसवले होते. परंतु, योग्य वेळेस दुरुस्ती न झाल्याने अनेक बंद पडले आहेत.

# चिपळूण पालिका ॲक्शन मोडवर

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

शहरातील तब्बल १८ हजारांपेक्षा अधिक मालमत्ता धारकांची नोंदणी करण्यात आली नसल्याने पालिकेचे दरवर्षी कोट्यवधीचे उत्पन्न बुडत होते. पालिकेकडून नुकत्याच झालेल्या सर्वेक्षणात या मालमत्ता रडारवर आल्या असून, त्यांना कर लावण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

पालिकेच्या सर्वेक्षणात चुकीच्या नोंदी आणि वाढीव बांधकामे आढळली आहेत. त्यांच्यावरही आता कर लावला जाणार आहे. चिपळूण पालिकेने आपल्या हद्दीमधील सर्व मिळकतीची पाहणी करून सुधारित वार्षिक कर योग्य मूल्याची यादी तयार केलेली आहे. २०२४-२५ मधील चतुर्थ सुधारित कर योग्य मूल्यांकनाची यादी पालिकेने नगर रचनाकार रत्नागिरी यांच्या प्राधिकृत मूल्यांकन अधिकारी यांच्याकडून तपासून घेतलेली आहे. ती नागरिकांना पाहण्यासाठी ठेवली आहे.

# विरार-वसईत रक्ताचा तुटवडा

**। पालघर । प्रतिनिधी ।**

वसई-विरारमध्ये गेल्या काही अनेक महिन्यांपासून रक्ताचा तुटवडा जाणत आहे. यामुळे अपघातग्रस्त, गर्भवती महिला, आजारी रुग्ण यांच्या नातेवाईकांना मुंबईच्या दिशेने रक्ताच्या खरेदीसाठी पायपीट करावी लागत असल्याचे रुग्णांच्या नातेवाइकांकडून सांगण्यात येत आहे.वसई-विरारमध्ये केवळ तीनच रक्तपेढ्या आहेत. यातही केवळ एकाच रक्तपेढीचा पालिकेशी करार आहे. वसई-विरारमध्ये असलेल्या रक्तपेढीची क्षमता केवळ १ हजार युनिट रक्त साठवण्याची आहे. यात सध्या केवळ ३५० ते ४०० युनिट रक्त जमा होत आहे. यामुळे मागणीच्या प्रमाणात रक्तपुरवठा नगण्य असल्याने गरजूंना रक्त मिळवण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागत आहे.

# मुंबई-गोवा महामार्गाचे काम कासवगतीने

## डेडलाईन हुकण्याची दाट शक्यता

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

राज्यातील लोकसभा निवडणुकीपूर्वी मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे काम डिसेंबरपर्यंत २०२४ पर्यंत पूर्ण होईल व महामार्गाचे काम हे युद्धपातळीवर सुरू असल्याचे आश्वासने कोकणातील सर्व पक्षाच्या नेत्यांनी दिली होती. मात्र, सध्या सुरू असेले महामार्गाचे काम कासवगतीने सुरू असून या संदर्भमार्गावरील अनेक पुलांची कामे अद्याप अपूर्णच आहेत. या महामार्गवरील कामे पूर्ण होण्यास आणखी कालावधी लागणार आहे. त्यामुळे डिसेंबर २०२४ ही डेडलाईन हुकण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

मुंबई-गोवा महामार्गावरील वडखळपर्यंतचे काम पूर्ण झाले आहे; मात्र नागोठणे, कोलाड, माणगाव येथील प्रमुख पुलांचे काम अपूर्ण अवस्थेत आहे. पळस्पे ते इंदापूर हा तब्बल ८४ किलोमीटरचा रस्ता सर्वात तापदायक होता. याचे दोन टप्प्यात विभाजन केल्यानंतर पळस्पे ते कासूपर्यंत काम होत आले आहे; मात्र त्यानंतर काम पूर्ण ठप्प झाले आहे. माणगाव बायपासचे काम झालेले नाही. त्याच्या पुढच्या रस्त्याचे काम एलएनटीकडे असून



बहुतांश काम पूर्ण झाले आहे.

मुंबई-गोवा महामार्गाचे काम हे २०१० पासून संथगतीने सुरू आहे. ठेकेदारांच्या निष्काळजीमुळे महामार्गाचे काम रखडले आहे. महामार्गाचे काम होण्यासाठी जनआक्रोश समितीने माणगाव येथे उपोषण केले होते. याची दखल प्रशासनाने घेतली होती. तसेच, माणगाव येथे प्रशासकीय कार्यालयाला पत्र देऊन दिंडीही काढण्यात आली होती. विशेष बाब म्हणजे स्वतः बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांनी तब्बल ५ वेळा पाहणी दौराही केला होता. त्याचबरोबर निवडणुकीपूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही माणगावपर्यंत पाहणी केली होती. परंतु, शासनाकडून मिळणाऱ्या खोट्या डेडलाईनने त्रस्त कोकणवासीयांना पुन्हा आंदोलनाच्या बाबतील जनआक्रोश समितीची चर्चा सुरू आहे.

# ईव्हीएम विरोधात स्वाक्षरी मोहिम



**। लोहारा । प्रतिनिधी ।**

आगामी निवडणुका ईव्हीएम यंत्राद्वारे न घेता मतपत्रिकेवर घेण्यात याव्यात, यासाठी काँग्रेस पक्षाच्यावतीने लोहारा शहरात शुक्रवारी (दि.१३) स्वाक्षरी मोहीम राबविण्यात आली होती. या मोहिमेला नागरिकांचा प्रतिसाद मिळाला होता.

लोहारा शहरातील स्वाक्षरी मोहिमेत्रला छत्रपती शिवाजी महाराज चौकात सुरवात करण्यात आली होती. यावेळी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष धीरज पाटील, मुख्य संघटक राजाभाऊ शेरखाने, विजयकुमार सोनवणे, तालुकाध्यक्ष श्यामसुंदर तोरकडे, केशव सरवदे, चंद्रकांत साखरे, दत्तात्रय गाडेकर, मुकेश सोनकांबळे, संग्राम जगताप, बसवराज पाटील, रौफ बागवान, इस्माईल मुल्ला, प्रकाश होंडराव, शिवानंद तोरकडे, माणिक कुसळकर, साहेबलाल शेख, ॲड. संगमेश्वर माशाळकर, मल्लिकार्जुन बनशेट्टी, कमलाकर बिराजदार, प्रवीण बोंदाडे, बाबूराव डोंबे, लायक पठाण उपस्थित होते.

# मोदी हे असत्य बोलणारे प्रधानमंत्री

## खा. संजय राऊत यांचा घणाघात

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

संविधानावरून सध्या संसदेच्या दोन्ही सभागृहात सत्ताधारी व विरोधकांमध्ये खडाजंगी सुरू आहे. त्यावरून शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे नेते, खासदार संजय राऊत यांनी भाजप व नरेंद्र मोदींवर जोरदार घणाघात केला आहे. मोदी हे देशाला लाभलेले असत्य बोलणारे महान प्रधानमंत्री आहेत, असा टोलाही त्यांनी यावेळी लगावला आहे.



यावेळी बोलताना संजय राऊत म्हणाले की, या देशातील न्यायालय, निवडणूक आयोग यांना संविधानाने दिलेले हक्क आणि अधिकार मोदींच्या राज्यात उद्ध्वस्त झाले आहेत. न्यायव्यवस्था दबावाखाली आहे. निवडणूक आयोग ज्याने या देशात निष्प:क्षपणे निवडणूका घ्यायच्या असतात तो निवडणूक आयोग हा राज्यकर्त्यांच्या दबावाखाली काम करत आहे. पण संविधानाला धरून काम करत नाही. नरेंद्र मोदी आणि त्यांच्या लोकांनी संविधानावर बोलणे हा संविधानाचा अपमान ठरेल. भाजपने सांगावे की, त्यांनी संविधान मजबूतीसाठी काय केले आहे? विरोधी पक्ष राहू नये म्हणून ते प्रयत्न करत आहेत. विद्यमान मुख्यमंत्र्यांना तुरुंगात टाकणे हे कोणत्या संविधानाच्या कलमात लिहले आहे. भाजपची सगळी लोकं दुधाने धुतलेली आहेत का? ईडी ज्यांच्याकडे गेली होती त्यांना आता नरेंद्र मोदी मांडीवर बसवून आईच्या ममतेने दूध पाजत आहेत.

तसेच, ७० हजार कोटींचा आरोप ज्यांच्यावर केला ते उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेत आहेत. शिवसेनेतून फूटलेले आमदार दहाव्या शेड्यूलनुसार अपात्र ठरायला हवे होते. पण मोदींच्या दबावाखाली सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायधीश चंद्रचूड यांनी तो निर्णय दिला नाही. हे काय संविधानात बसत आहे का? ज्या पद्धतीने मोदी राज्य चालवत आहेत ते संविधानविरोधात आहे. संविधान हा देशाचा आधार आहे, तो आधारच मोदींनी उद्ध्वस्त केला आहे, असा घणाघात संजय राऊत यांनी केला आहे.

# सोने चोरणाऱ्या आरोपींना अटक

**। पालघर । प्रतिनिधी ।**

भाईंदर पश्चिमेला एका ज्येष्ठ नागरिकाला बोलण्यात गुंतवून त्यांच्याकडून सोने हिसकावून रिक्षाने पळून गेलेल्या दोन्ही आरोपींना भाईंदर पोलिसांनी अटक केली आहे. याप्रकरणी एकाला जळगाव येथून व दुसऱ्याला ठाणे येथून अटक करत चोरी केलेल्या सोन्यापैकी ३०१ ग्राम मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सुनिल पाटील आणि त्याचा साथीदार रामानंद छोटेलाल यादव अशी आरोपींची नावे आहेत.



नालासोपारा येथे राहणारे बाळकृष्ण अबगुल (६१)हे त्यांच्या बॅगेमधून अंदाजे २५ लाख रुपये किंमतीचे ३७५ ग्रॅम सोन्याची लगड, सोन्याचे तुकडे आणि बिस्किट घेऊन जात असताना दोन अनोळखी व्यक्ती तेथे आले होते. दोघांनी काका काल तर जास्त चॉकलेट देत होते. आज नाही आहे का चॉकलेट? असे बोलून त्यांनी जबरदस्तीने बॅग हिसकावून घेत तेथून पळ काढला होता. त्यानंतर याबाबत भाईंदर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानुसार गुन्हे प्रकटीकरण शाखेचे आणि तपास अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिकराव कतुरे व कर्मचारी यांनी परिसरातील अधिक सीसीटीव्ही तपासणी केली. तसेच, आरोपींचे मोबाईल नंबर मिळवले. त्यानंतर आरोपींना ताब्यात घेण्यात आले.

# भाजपचे हिंदुत्व केवळ निवडणुकीपुरतेच

## आदित्य ठाकरे यांचा टोला

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

भाजपचे हिंदुत्व केवळ निवडणुकीपुरतेच मर्यादित असते. त्यामुळेच ते मतदारांचा वापर 'यूज अँड थ्रो' असा करतात. त्यामुळे ईव्हीएमच्या जोरावर सत्तेत आल्यानंतर लगेचच मंदिरांवर बुलडोझर चालवण्यास सुरुवात केल्याचे सांगत मंदिरांना खरा धोका भाजपपासूनच असल्याचा टोला शिवसेना (उद्धव ठाकरे) नेते, युवासेना प्रमुख आ. आदित्य ठाकरे यांनी लगावला आहे. मात्र, लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या मंदिरांवर याल तर याद राखा, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला आहे.



आदित्य ठाकरे म्हणाले की, आपल्या मंदिरांचे रक्षण करताना दुसऱ्या कोणत्याही धर्माबद्दल द्वेष पसरवण्याची गरज नसल्याते. हिंदुहृदयसम्राट, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्यामुळे अनेक मंदिरे वाचल्याचे त्या त्या ठिकाणचे पुजारी, विश्वस्त अजूनही अभिमानाने सांगतात. आता दादरचे हनुमान मंदिर वाचल्यामुळे शिवसेनेची ताकद, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची ताकद पुन्हा एकदा दिसून आला आहे.

पुढे बोलताना ते म्हणाले की, मी वाराणसी दौऱ्यावर गेलो तेव्हा भाजपने कॉरिडोरच्या नावाखाली मंदिरे, प्राचीन मूर्ती तोडल्याची माहिती तेथील पुरोहिताने दिल्या आहेत. शिवसेनेमुळे दादरचे मंदिर वाचले असताना भाजपने दिवसभर केवळ नाटकं केली, असा टोलाही त्यांनी लगावला आहे. तसेच, हनुमानाने ठरवले तर निवडणुका बॅलेटवर होतील आणि देशाचा खरा आवाज काय आहे हे दिसून येईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे.

## प्रत्येकी पाचवेळा औषध फवारणी

# फुलकीड नियंत्रणासाठी आंबा बागांत प्रयोग

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

कृषी विभाग व कृषी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आंबा पिकावरील फूलकीड नियंत्रण पथदर्शी कार्यक्रमांतर्गत रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील प्रत्येकी चार गावांमधील आंबा बागांमध्ये फुलकीड नियंत्रणासाठी प्रयोग केला जाणार आहे. मागील वर्षी रत्नागिरी जिल्ह्यातील दोन बागांमधील थ्रिप्सवर काही प्रमाणात नियंत्रण ठेवण्यात यश आले होते, अशी माहिती जिल्हा कृषी अधीक्षक अधिकारी शिवकुमार सदाफुले यांनी दिली आहे.

कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय भावे यांच्या अध्यक्षतेखाली मागील वर्षी जिल्ह्यातील आंबा बागायतदारांबरोबर झालेल्या बैठकीत फूलकिडीवरील नियंत्रणाविषयी प्रत्यक्ष बागेत जाऊन संशोधन करण्याचा निर्णय घेतला होता. त्यामध्ये रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील प्रत्येकी दोन गावे निवडण्यात आली होती. गतवर्षी काही प्रमाणात यश मिळाल्यामुळे यंदा बागांची संख्या वाढवण्याचा



निर्णय घेण्यात आला आहे. कोकण कृषी विद्यापीठात नुकत्याच झालेल्या आंबा टास्कफोर्सच्या बैठकीत यावर चर्चा देखील झाली आहे.

त्यामध्ये दोन्ही जिल्ह्यांतील आठ गावांमधील बागांमध्ये थ्रिप्स नियंत्रणावर प्रयोग केला जाणार आहे. त्यात रत्नागिरी जिल्ह्यातील कळंबट (दापोली), गोळप, नागलेवाडी (रत्नागिरी) आणि पालशेत (गुहागर) येथील शेतकऱ्यांच्या बागा आहेत. तसेच, सिंधुदुर्ग जिल्ह्यात आचरा, देवली (मालवण), फणसे, खुडी (देवगड) या चार बागा घेण्यात आल्या आहेत. यामध्ये कृषी विभागाकडून आवश्यक औषधे, खते किंवा लागणारे अन्य साहित्य उपलब्ध करून दिले जाणार आहेत. तर, कृषी विद्यापिठाचे संशोधक औषध फवारणीच्या वेळापत्रकासह त्यामध्ये होणारे बदल यावर लक्ष ठेवणार आहेत. पुढील आठ दिवसांमध्ये हा प्रकल्प प्रत्यक्षात कार्यान्वित होईल, असे सांगण्यात आले आहे.

# आचरावासीयांची तीन दिवस गावपळण

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

परंपरा असलेल्या व प्राचीन शिवस्थान असलेल्या आचरा येथील इनामदार श्री देव रामेश्वर संस्थानच्या दर तीन किंवा पाच वर्षांनी होणाऱ्या गावपळणीला रविवार दि.१५ डिसेंबर सुरुवात झाली आहे. ही गावपळण बुधवार दि.१८ डिसेंबरपर्यंत तीन दिवस, तीन रात्री अशी होणार आहे. इनामदार श्री देव रामेश्वराचा १८ डिसेंबरला कौल न झाल्यास गुरुवारी १९ डिसेंबर रोजी गाव भरणार आहे.

दर तीन वर्षांनी देवदीपावली दिवशी गावपळणीचे वर्ष असल्यास श्री देव रामेश्वराला गावपळण करण्याविषयी कौल लावण्यात येतो. यावर्षी रामेश्वराने क्षणाचा विलंब न लावता लगेच कौल दिल्याने यावर्षी आचरा गावची गावपळण होत आहे. मागील वेळी गावपळण डिसेंबर २०१९ साली झाली होती. तसेच, ही गावपळण का केली जाते, याविषयी अनेक कथा, दंतकथा असल्या



तरी आजच्या आधुनिक काळातसुद्धा रामेश्वरावर श्रद्धा ठेवून आचरा गावातील लोक गावाच्या सीमेबाहेरझोपड्यांमध्ये वास्तव्य करून राहणार आहेत. दरम्यान, सुमारे ८ हजार लोकवस्तीचा बारा वाड्यांचा गाव रविवारी (दि.१५) इनामदार श्री देव रामेश्वराचा महादरवाजा, दिंडी दरवाजा व मुख्य प्रवेशद्वार रामेश्वर संस्थानच्या बारापाच मानकऱ्यांनी बंद केल्यानंतर दुपारी २ वाजताच्या सुमारास संपुर्ण गाव रिकामा झाला आहे.

**निवडक**

## रोख रक्कम नेणाऱ्यांची लूट

**पनवेल** : खारघर उपनगरातील बँकेतून रोख रक्कम घेऊन घरी जाणाऱ्या ग्राहकांना लुटण्याच्या दोन घटना महिन्याभरात घडल्या. यामुळे चोरट्यांनी बँक ग्राहकांना लक्ष्य केल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. पहिली घटना १३ नोव्हेंबरला घडली. यामध्ये सेक्टर १२ येथील कॅनरा बँकेतून ६९ वर्षीय वृद्ध दोन लाख रुपये घेऊन पायी जात असताना दुचाकीवरून आलेल्या चोरट्यांनी रकमेची पिशवी हिसकावून तेथून पोबारा केला होता. दुसरी घटना मंगळवारी दुपारी बारा वाजता घडली.

## स्वरा मोरेला दोन सुवर्ण

**पनवेल** : अखिल भारतीय कलादर्पण तर्फे पुणे येथे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेमध्ये २ डी रेखाचित्र रंग भरणे स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेमध्ये पोद्दार इंटरनॅशनल स्कूलच्या पाचवीमध्ये शिकणाऱ्या स्वरा मोरे हिने अखिल भारतीय कलादर्पण स्पर्धेत २ डी रेखाचित्र आणि रंग ह्या दोन्ही स्पर्धेमध्ये २ सुवर्णपदक मिळविले. या घवघवीत यश संपादनाबद्दल कौतुक होत आहे. भविष्यामध्ये आंतरराष्ट्रीय स्पर्धेत उतरून सुवर्णपदकावर नाव कोरणार असे मत स्वरा मोरेने सांगितले.

## सुरक्षा बैठक संपन्न

**पनवेल** : खांदेश्वर पोलीस ठाणे हद्दीत असलेल्या सुकापूर येथील बालाजी सिम्फोनी सोसायटीमध्ये सुरक्षा बैठक वपोनि स्मिता ढाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाली. यावेळी सपोनि बळवंत पोलीस पाटील यांनी उपस्थित सोसायटीमधील रहिवाशांना व पदाधिकाऱ्यांना सुरक्षितता जनजागृती बाबत मार्गदर्शन केले. यामध्ये प्रामुख्याने सायबर सुरक्षा, डायल १९३०, ११२, नवी मुंबई वॉट्सअ‍ॅप चायनल, सायबर सेफ नवी मुंबई, ऑफिशियल युट्युबबाबत माहिती दिली.

## सोन्याची चेन खेचून पसार

**पनवेल** : शतपावली करण्यासाठी पतीसह बाहेर पडलेल्या महिलेच्या गळ्यातील दिड लाख रुपये किंमतीची सोन्याची चेन खेचून मोटार सायकलीवरुन आलेले दोघेजण पसार झाल्याची घटना खांदा वसाहतीमध्ये घडली आहे. विश्वास खैरनार हे पत्नीसह शतपावली करण्यासाठी घराबाहेर पडले होते. सिडको गार्डन जवळून जात असताना मोटार सायकलवरुन आलेल्या दोघा अज्ञात इसमापैकी एकाने त्यांच्या पत्नीच्या गळ्यातील दिड लाखाची चेन खेचून ते पसार झाले आहेत.

## बसची वृद्ध महिलेला धडक

**पनवेल** : एनएमएमटी बसची एका ७० वर्षीय महिलेला धडक बसल्याने झालेल्या अपघातात सदर महिलेचा मृत्यू झाल्याची घटना पनवेल तालुक्यातील बारवई गावाजवळ घडली आहे. यमुना पवार (७०) या किर्तन आटोपून घरी येत असताना बारवई गावालगतचा रस्ता ओलांडत असताना भरधाव एनएमएमटी बसने त्यांना धडक दिली. या धडकेत त्या गंभीररित्या जखमी होवून त्यात त्यांचा मृत्यू झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# सैनिक विश्रामगृह बनले भूत बंगला

## सैनिकांची अवहेलना, झाडाझुडपांचा विळखा; शासनाच्या दुर्लक्षामुळे अखेरची घरघर

**। माणगाव । वार्ताहर ।**

**ज्यांनी देशाच्या रक्षणासाठी बलिदान दिले, छातीवर बंदूकीच्या गोळ्या झेलल्या, ऊन, वारा, पाऊस आणि थंडी यांची तमा न बाळगता शहीद झाले, देशासाठी हुतात्मा झाले त्या आजी आणि माजी सैनिकांच्या माणगाव येथील सैनिक विश्रामगृहाची अत्यंत दयनीय आणि दुर्दशा झाली असून आधार देणारे विश्रामगृह भूत बंगला बनला आहे. या डाक बंगल्याला अखेरची घरघर लागली आहे. शासनाने याकडे संपूर्ण दुर्लक्ष करून सैनिकांची अवहेलना सुरू ठेवली आहे.**

जसे युद्ध प्रसंगी दुसऱ्या देशाचे सैनिक घेरतात तसेच या विश्रामगृहाला झाडा झुडपांनी घेरुन विळखा घातला आहे. त्यामुळे पडझड झाली आहे. सर्वत्र दाट गवत आणि वेलींचे साम्राज्य पसरले आहे. दरवाजे, खिडक्या, तावदाने तुटलेल्या अवस्थेत आहेत. छप्पर उडालेले आहे. कौले उडून फुटलेली आहेत. संपूर्ण इमारत मोडकळीस आलेली आहे. लोखंडी प्रवेशद्वार गंजून मोडकळीस आले आहे. संरक्षक भिंतींचीही नासधूस झाली आहे.

पाच वर्षांपूर्वी विश्रामगृहाची तात्पुरती डागडूजी करण्यात आली होती. तत्कालीन मंत्र्यांनी अनेकवेळा विश्रामगृह बांधण्यासाठी प्रयत्न केला आणि निधीही उपलब्ध



करून दिला होता. परंतु अद्यापही या विश्रामगृहाला विळखा घालणारे एकही पान हललेले नाही. नाही चिरा, नाही पणती अशी भयंकर आणि भयाण दुरवस्था झाली आहे. शासनाने हे विश्रामगृह बांधण्यासाठी कोणत्याही प्रकारची हालचाल केलेली दिसत नाही. त्यामुळे सैनिकांची भीक नको पण कुत्रं आवर अशी अवस्था झाली आहे. कुणी घर देता का घर याप्रमाणे सैनिक निराधार आणि ना घर का ना घाट का अशी अवस्था झाली आहे.

शासकीय सैनिक विश्रामगृह, पोलीस ठाणे, व्हिक्टोरिया क्रॉस पदक विजेते वीर यशवंतराव घाडगे स्मारक आणि काळ नदीवरील पूल या वास्तू ऐतिहासिक ठेवा म्हणून सुरक्षित राहण्यासाठी युद्ध पातळीवर प्रयत्न करणे आवश्यक आहे. या सर्व वास्तू १८७१ ते १८९१ च्या काळात इंग्रजांनी बांधलेल्या आहेत. या चार वास्तूंपैकी केवळ याच सैनिक विश्रामगृहाची दुरवस्था झाली असून ते कालांतराने नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत.

२५ वर्षांपूर्वी याच विश्रामगृहात सैनिक आणि पोलीस भरती होत असे. कॅन्टीन सुरू होती. त्यामध्ये स्वस्त वस्तू मिळत असत. स्वातंत्र्य मिळवण्यासाठी आंदोलने, मोर्चे, सभा, बैठका होत असत. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९४७ पासून संयुक्त महाराष्ट्र चळवळीला या ऐतिहासिक विश्राम गृहात बळ देण्याचे काम सुरू झाले होते. आता या ऐतिहासिक वारशाचे भूत बंगल्यात रुपांतर झाल्याने सैनिकांनी दिलेले बलिदान आणि पत्करलेले हुतात्म्य व्यर्थ गेले आहे असे माजी सैनिकाने सांगितले.

दरवर्षी ९ जानेवारी रोजी आजी आणि माजी सैनिकांचा मेळावा वीर यशवंतराव घाडगे जयंती निमित्त निमित्ताने होत असतो. त्यावेळी मोठमोठे पुढारी, मंत्री, खासदार, आमदार, उच्च पदस्थ मिलीट्री अधिकारी आश्वासने आणि वचने देऊन जातात. प्रत्यक्षात काहीच होत नाही हे वास्तव आहे. जसे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचा मायभूमीसाठी प्राण तळमळला होता तसेच प्राण हे विश्रामगृह नव्याने बांधण्यासाठी तळमळत आहे. या सर्व सुविधा होण्यासाठी सैनिक संघटनेने निवेदने दिली मात्र आतापर्यंत काहीच झालेले नाही. बाजूला सरकारी अधिकारी यांचे शासकीय बंगले आणि इमले उभारण्यात येत आहेत. मात्र सरकारच्या तिजोरीत सैनिकांच्या कल्याणकारी वास्तूसाठी एक छदाम नसावा यांचे आश्चर्य आणि नवल आहे.

# गुरू दत्तात्रेयांचा महिमा अगाध आहे

**। खांब । वार्ताहर ।**

गुरू दत्तात्रेयांचा महिमा अगाध असल्याचे भक्तीमय उद्गारदिनेश मकडव यांनी रोहा तालुक्यातील पिंपळवाडी -देवकान्हे येथे श्री.दत्त जयंती उत्सव सोहळ्यात आपल्या किर्तनरूपी सेवेप्रसंगी काढले.



गेल्या अनेक वर्षांची यशस्वी परंपरा राखत याही वर्षी पिंपळवाडी - देवकान्हे येथे श्री.दत्त जयंती उत्सव सोहळा मोठ्या भक्तिभावाने साजरा करण्यात आला.

यावेळी पहाटे अभिषेक व पूजाविधी, सकाळी ११ वा. श्री.सत्यनारायणाची महापूजा, महाआरती, तद्नंतर सायं.६ वा.कोकण दिंडी वारकरी संप्रदाय रोहा यांची हरिपाठ सेवा,रात्रौ.८ ते ९ महाप्रसाद, तद्नंतर दिनेश कडव, वांदोळी यांची सुश्राव्य हरि किर्तनरूपी व जागर भजन आदी धार्मिक तथा अध्यात्मिक कार्यक्रम संपन्न करण्यात आले.

**■ दिनेश कडव यांचे पिंपळवाडी येथे प्रतिपादन**

या सर्व कार्यक्रमांच्या यशस्वितेसाठी ग्रामस्थ व महिला मंडळ पिंपळवाडी-देवकान्हे, तसेच तरूण मंडळ यांनी मोलाचे सहकार्य केले. दरम्यान या उत्सव सोहळ्यानिमित्त विभागासह संपूर्ण तालुक्यातून मोठ्या संख्येने भाविक भक्तांनी उपस्थिती नोंदवून विविध कार्यक्रमांचा आस्वाद घेतला.

# श्रीसेवाशक्ती पतसंस्थेस ‘बँको’ पुरस्कार जाहीर

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील चोरोंडे येथील श्री सेवाशक्ती ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेस बँको पुरस्कार जाहीर झाला आहे. त ६ वेळा श्री सेवाशक्ती ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेचा बँको ब्लू रिबन पुरस्काराने सन्मान झाला आहे. हा या पतसंस्थेचा बँको पुरस्काराने ७ वा सन्मान असणार आहे.तज्ज्ञ निवड समितीने केलेल्या मूल्यांकनानुसार श्रीसेवाशक्ती पतसंस्थेची बँको पतसंस्था ब्ल्यू रिबनसाठी निवड करण्यात आली आहे.

या पतसंस्थेची प्रगतीची घोडदौड सुरु आहे. या पतसंस्थेत ठेवी ३६ कोटी १६ लाख रुपयांच्या ठेवी आहेत. २८ कोटी ३८ लाख रुपयांचे कर्ज वाटप झालेले असून, १३ कोटी २५ लाखांची गुंतवणूक केलेली आहे. भाग भांडवल २ कोटी ०६ लाख रुपयांचे आहे. सी.डी. रेश्यो ७१.७९ टक्के, रोखता निधी १.१० टक्के, तरलता निधी ३५.६५ टक्के, सीआरएआर २२.५३ टक्के आहे.

ही पतसंस्था ९००१-२०१५ मानांकन प्रमाणित असून सतत ६ वर्ष बँको पुरस्कार, महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशनचा सतत ३ वर्ष दीपस्तंभ पुरस्कार मिळाला आहे. स्थापनेपासून सतत ऑडिट वर्ग अ या पतसंस्थेने मिळवला आहे.

# कृषी प्रदर्शनाला पंकज तांबे यांची भेट

**। माणगांव । प्रतिनिधी ।**

पुणे येथे मोशी याठिकाणी देशातील शेतकऱ्यांसाठी किसान कृषी प्रदर्शन शासनाच्या वतीने आयोजित केले जाते. दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुद्धा ११ ते १५ डिसेंबर या कालावधीत कृषी प्रदर्शन आयोजित केले आहे.



भात शेती लागवड यंत्राची पाहणी करीत असताना पंकज तांबे यांच्या सोबत स्वप्निल शिर्के, संभाजी गायकवाड उपस्थित होते. संपूर्ण देशातून कृषी प्रदर्शन मेळाव्याला भेट देण्यासाठी शेतकरी येत असतात. पंकज तांबे हे शेतकरी मित्र म्हणून तालुक्यात त्यांचा परिचय आहे. शेतकऱ्यांना नेहमी त्यांचा मदतीचा हात असतो. या कृषी प्रदर्शनात आधुनिक पद्धतीने शेती कशी करायची यासाठी विविध अवजारे उपलब्ध होती. या अवजारांची संपूर्ण माहिती पंकज तांबे घेत होते जेणेकरून माणगांव विभागातील शेतकरी यांच्या करिता उपयोगी येऊ शकते हा त्यांचा महत्वाचा मुद्दा असतो. त्यामुळे ते दरवर्षी कृषी प्रदर्शन मेळाव्याला भेट देत असतात.

कोकणातील शेतकरी यांचा प्रमुख व्यवसाय हा शेती असून त्याच्या सोबत विविध प्रकारच्या भाजीपाला हा सुद्धा व्यवसाय शेतीला जोड धंदा म्हणून येथील शेतकरी करीत आहेत. या कृषी प्रदर्शनात आधुनिक पद्धतीने शेती कशी करायची यासाठी नवीन यंत्र उपलब्ध असतात. देशातील शेतकरी कृषी प्रदर्शन पाहण्यासाठी पाच दिवसात येत असतात व नवीन तंत्रज्ञान, अवजारांची माहिती घेत असतात अशी माहिती पंकज तांबे यांनी दिली.



# नवभारत साक्षरतेअंतर्गत शिक्षण उपसंचालकांची मुरूडला भेट

**। मुरुड । वार्ताहर ।**

नवभारत साक्षरता या बहुचर्चित उपक्रमांतर्गत राज्य शिक्षण संचालनालयाचे शिक्षण उपसंचालक भाऊसाहेब सरस आणि महेंद्र बागडे यांनी मुरुड तालुक्यातील अनेक शाळांना भेटी देऊन समाधान व्यक्त केले.

यामध्ये चोरढे मराठी शाळेला भेट दिली असता उल्लास ॲप इंस्टॉल करणे, शिक्षकांना टॅग करणे, स्वयंसेवक नेमणे, प्रत्यक्ष असाक्षरांना शिकवणे, त्यांच्यानोंदी, फोटोग्राफ्स, उपस्थिती पत्रक आणि अनुषंगिक सर्व रेकॉर्डची तपासणी केली. मुरुड-जंजिरा तालुक्याचे नैसर्गिक वैभव, येथील शैक्षणिक वातावरण, असाक्षरांसाठी शिक्षक घेत असलेली एकंदर मेहनत पाहून समाधान व्यक्त करत कौतुकाची थाप दिली. यावेळी शिक्षण ही निरंतर प्रक्रिया असल्याचे सांगून यात सातत्य ठेवण्याचे आवाहनही केले. यावेळी गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी, महेश कवळे, संदीप पाटील, चेतन पाटील, दत्ता सातामकर, संतोष पुकळे, संगीता भगत, राजेंद्र नाईक, विजय जाधव, प्रतिभा वर्तक, इर्षाद बैरागदार आदी उपस्थित होते.

# वाशी हवेली गावाला स्मार्ट ग्रामपंचायत समितीची भेट

**। तळा । वार्ताहर ।**

वाशी हवेली ग्रामपंचायतीला तालुका स्तरीय स्मार्ट ग्रामपंचायत समितीने भेट दिली.



वाशी हवेली येथे तालुका स्तरीय स्मार्ट ग्रामपंचायतीसाठी पेण येथील गटविकास अधिकारी स्मार्ट ग्रामसमितीच्या अध्यक्षा सविता कांबळे, सहाय्यक लेखाधिकारी गणपत पवार, कृषी विस्तार अधिकारी तेजस्विनी वर्तक, विस्तार अधिकारी पंचायत समिती प्रसाद म्हात्रे यांनी भेट देऊन ग्रामपंचायतीमध्ये केलेल्या ओला सुका कचरा विलगीकरण, गावात सीसीटीव्ही कॅमेरा, मुख्य नाक्यावर पाण्याची टाकी, बेसीन, घंटागाडी, गावात पाणी पिण्यासाठी सायरन असणाऱ्या सोईसुविधा यांची पाहणी केली.


त्यांच्या समवेत तळा पंचायत समिती विस्तार अधिकारी व ग्राम पंचायतच्या प्रशासक पुष्पा नेरकर, वाशी हवेली ग्रामसेवक अश्विनी धुत्रे, सरपंच जगन्नाथ तांडेल, माजी सरपंच ज्ञानदेव तांडेल हे उपस्थित होते.

तसेच या कार्यक्रमासाठी वाशी हवेली कोळीवाडा, कुणबी वाडी आणि बौद्धवाडी येथील गांव अध्यक्ष महिला अध्यक्ष व ग्रामस्थ यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. सरपंच जगन्नाथ तांडेल यांनी वाशी हवेली येथील माजी उपसरपंच सदस्य व ग्रामस्थांनी केलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे आभार मानले. वाशी हवेली गाव सरपंच व ग्रामस्थ यांचे प्रयत्नांनी नेहमी विविध योजना व उपक्रम राबवून अग्रेसर राहत असल्याचे पाहावयास मिळत आहे.

# महादेव पाटील यांचे निधन

**। भाकरवड । वार्ताहर ।**

श्रीगाव ग्रामपंचायत हद्दीतील भाकरवड गावचे महादेव शिवराम पाटील यांचे वयाच्या ६८ व्या वर्षी बुधवारी (दि. ११) निधन झाले. अत्यंत शांत, मितभाषी आणि सर्वांशी मिळूनमिसळून राहणे हा त्यांचा स्वभाव होता.



महादेव पाटील यांनी आरडीसी बँकेत ३५ वर्ष सेवा केली आणि निवृत्त झाले. पाटील यांच्यावर भाकरवड गावाच्या स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यावेळी विविध सामाजिक, शैक्षणिक, आध्यात्मिक क्षेत्रातील मान्यवर ,ग्रामस्थ, मित्रपरिवार उपस्थित होते. यांच्या पश्चात पत्नी, मुलगा उदय पाटील, मुलगी आस्मिता, रुपाली नातू, सूना, असा मोठा परिवार आहे त्यांचे दशक्रिया विधी शुक्रवारी (दि.२०) तर उत्तरकार्य सोमवारी (दि.२३) राहत्या घरी होणार आहेत.

**क्लासिफाईड**
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **सहारा ट्रॅव्हल्स अलिबाग मध्ये ऑफिस कामासाठी स्थानिक मुलगी पाहिजे १०/१२ वी ९२७०५६०४५६**
- **आम्ही ऑनलाईन, ऑफलाईन आणि Gem पोर्टल वर AMC (वार्षिक देखभाल) सरकारी निम-सरकारी, खाजगी निविदा भरावयाचे कामे घेतो. Gem नोंदणी (Regn), सर्विस कॅटलॉग, विक्रेता नोंदणी इ. अधिक माहिती करीता संपर्क: 9987101960**
- **अलिबागमध्ये समुद्राजवळ 1BHK; 641 चौ.फुट विकणे आहे. संपर्क : ८४५९८९९६०३/९२८४०८४२९१**
- **एजनन्सीमधध्ये कामासाठी मुले पाहिजे- सेल्समन/डिलिवरीसाठी अरिहंत एजन्सी, पिंपळभाट, ८१४९३२२४४९**

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

**तमाशाचा फड बोलवण्याची रसिक प्रेक्षकांची मागणी**

# चौल यात्रेतून हरवलाय तमाशाचा फड

**। रेवदंडा । वार्ताहर ।**

जत्रेंच्या निमित्ताने महाराष्ट्राचा सांस्कृतिक ठेवा तमाशा व लावणीची जपवणूक झाली आहे. रसिक प्रेक्षक या जत्रेच्या माध्यमातून लोककलेचा आनंद लुटूत असतात. कोणी एकेकाळी तमाशा व लावणीचा फड चौल दत्तयात्रेच्या निमित्ताने रसिक प्रेक्षकांची खरी आवड होती. जत्रा म्हटली की, ढोलकीचा ताल, ढोलकीचा ठेका, लावणीचा ताल अस्सल मराठी ढोलकी व लावणीचा तोडा...मात्र चौलच्या श्री दत्त यात्रेतील तमाशा व लावणीचा फडाचा नाद हरवला असून तमाशा व लावणीच्या फडाच्या गैरहजेरीने प्रेमी रसिक प्रेक्षकांची खुप नाराजी आहे.

चौल भोवाळे पर्वतवासी श्री दत्त यात्रा संपुर्ण महाराष्ट्रात प्रसिध्दीस आहे, प्रतिवर्षी पाच दिवस दत्त जयंती निमित्त या भव्य यात्रेचे नियोजन पारंपारिक पध्दतीने होत असते. सर्वात मोठी व आर्थिक उलाढालीची यात्रा म्हणून चौल श्री दत्त यात्रेची ओळख आहे. कोरोना कालावधी सोडला तर प्रतिवर्षी चौल श्री दत्तयात्रेस रायगडसह महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून चौल श्री दत्त यात्रा भाविक,पर्यटक व यात्रेकरू यांच्या प्रचंड गर्दीने भरते. महाराष्ट्रातील यात्राची परंपरेची जपवणूक चौल श्री दत्त यात्रेने खऱ्या अर्थाने ठेवली गेली आहे.

सुगीचे दिवस संपल्यानंतर शेतकरीवर्गास यात्राचे वेध लागतात, पावसाळी व हिवाळी हंगाम आटोक्यात आल्याने शेतकरीवर्ग आर्थिकदृष्ट्या तेजीत असतो. ठिकठिकाणी गावागावातून भरत असलेल्या यात्रेला भाविकतेने शेतकरीवर्ग भेटी देत आनंद व्दिगणीत करतो. चौल भोवाळे येथे पर्वतवासी श्री दत्त जयंती उत्सवाचे निमित्ताने पारंपरीक पध्दतीने श्री दत्त यात्रा भरते. या यात्रेस परिसरातील शेतकरी बंधू निश्चित येतात. चौल यात्रेच्या निमित्ताने विविध वस्तूचे स्टॉल, मिठाई, आकाश पाळणे आदी अनेक दुकाने थाटलेली असतात.



परंतू चौल श्री दत्त यात्रेत मुख्य आकर्षण होते ते तमाशा व लावणीचा फड, काही वर्षापूर्वी तमाशा व लावणी प्रेमी रसिक प्रेक्षकांच्या मागणी व आवडीने येथे तमाश्याचे दोन फड येत असत. सांस्कृतिक कार्यक्रमाचे निमित्ताने या तमाशा फडाला मोठी गर्दी रसिक प्रेक्षकांची होत असे. तमाशाच्या ढोलकीच्या ठेकावर व लावणीच्या तालावर येथील रसिक प्रेक्षक ठेका धरत असत. महाराष्ट्रातील अनेक प्रसिध्द तमाशा फडानी चौल श्री दत्त यात्रेच्या निमित्ताने तमाशा व लावणी कलावंतानी लोककलेची अदाकारी येथे रसिक प्रेक्षकांना सादर केली आहे.

मात्र कुठे काय बिनसले, चौल श्री दत्त यात्रेतील तमाशा व लावणीचा फड हद्दपार झाला. चौल यात्रेत प्रतिवर्षी येत असलेला तमाश्याचा फडाची उपस्थिती गेले काही वर्ष होत नाही. अनेकदा रसिक प्रेक्षकांनी चौल श्री दत्त यात्रेस तमाशाचा फड पुनश्च सुरू व्हावा म्हणून मागणी केली, प्रयत्न केले. परंतु काहीच्या गैर मागण्याने तमाशा फडांनी चौल श्री दत्त यात्रेस तोंड फिरविल्याचा आरोप स्थानिकस्तरावर केला जातोय. व त्यामुळे आर्थिक उत्पन्नात होत असलेली घट, काहीच्या नाहक त्रासाने व सुरक्षीत भावना नसल्याने येथे तमाशा फड मंडळी येथ नसल्याचे म्हटले जातेय.

येथील रसिक प्रेक्षक मात्र तमाशा व लावणीच्या लोककलेल्या आनंदास मुकला असून सर्व स्तरातून चौल यात्रेत तमाशा फड येत नसल्याने नाराजीचा सूर येत आहे. कोणीतरी पुढाकार घेवून चौल श्री दत्त यात्रेतील तमाशा व लावणीचा फड सुरू करावा. चौल श्री दत्त यात्रेतील ढोलकीचा ताल, ढोलकीचा ठेका, लावणीचा ताल पुन्हा घुमावा व लोककलेच्या परंपरेचा आस्वाद रसिक प्रेक्षकांना मिळावा अशी जोरदार मागणी होत आहे.

# हेटवणेचा शिलकी साठा वापराविना

**। रायगड । प्रतिनिधी ।**

सिडको अखत्यारित खारघर, उलवे, तळोजा, द्रोणागिरी आदी परिसराला पेण तालुक्यातील हेटवणे धरणातून पाणीपुरवठा करूनही हेटवणे धरणात ४४ टक्के उपयुक्त साठा वर्षअखेरीस शिल्लक राहतो; या साठ्याच्या वितरणासाठी कोणतीही व्यवस्था नसल्याने शिल्लक राहणारा २९.३० दशलक्ष घनमीटर पाणी भोगेश्वर नदीतून दादरच्या खाडीत सोडले जाते. दहा वर्षांपासून वाया जाणाऱ्या या पाण्यासाठ्याने पेण तालुका सुजलाम-सुफलाम झाला असता; परंतु पुरवठ्याबाबत नियोजनाअभावी पाणीटंचाईला सामोरे जावे लागते आहे.



रायगड जिल्ह्यात सर्वात जास्त पाणीटंचाई पेण तालुक्यात जाणवत असून नागरिक सातत्याने आंदोलने करीत आवाज उठवत आहेत; परंतु ही पाणीटंचाई अद्याप कमी झालेली नाही. नवी मुंबईसारख्या मोठ्या शहराला पाणीपुरवठा करणारे धरण याच तालुक्यात असतानाही हा तालुका कायम टंचाईग्रस्त राहिला आहे. सिडकोने नवी मुंबईला पाणीपुरवठा करण्यासाठी हेटवणे धरणातील ५५.९० दशलक्ष घनमीटर साठा आरक्षित केला आहे. नव्या धोरणानुसार हा साठा वाढवूनही देण्यात आला; परंतु पेण तालुक्यातील नागरिकांना पाणी मिळावे, यासाठी कोणत्याही उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत.पेण हेटवणे मध्यम प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातून निघणाऱ्या २३ किलोमीटरच्या डाव्या कालव्यावर १३ ते २३ किलोमीटर अंतरावर २३ गावे येतात. या गावांमध्ये ३,१०९ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार असल्याचे सांगितले जात होते. त्याचबरोबर डाव्या तीर कालव्यादरम्यान वडखळ ते खारपाले, खारमाचेला अशा १९ गावांचा समावेश आहे. या सर्व क्षेत्रातील किमान ३,५१६.०० हेक्टर जमीन ओलिताखाली येऊ शकते; परंतु पाणी आणण्यासाठी केवळ बंदिस्त पाइपलाइन आणि कालव्याचे काम झाले नसल्यामुळे हे पाणी पेण भोगेश्वरी नदीतून दादरच्या खाडीत सोडले जाते.

हेटवणे धरणाचे पाणी शेतकऱ्यांना मिळावे, यासाठी १० वर्षांपूर्वी कालवे बांधण्यासाठी सिंचन योजनेतून ५० कोटींचा निधी तातडीने मिळण्यासाठी प्रस्ताव केंद्राकडे पाठवण्यात आला होता; परंतु त्यासंदर्भात अद्याप काहीही प्रगती झालेली नाही.

सुधारित जलनियोजनानुसार, हेटवणे मध्यम प्रकल्पातील ४,२६८ दशलक्ष घनमीटर पाणीसाठा शेतीसाठी वापरण्याचे नियोजन आहे. यातील ६० टक्के पाणीसाठ्याचा वापर केल्यानंतरही तालुक्यातील ३,५१६.०० हेक्टर सहज ओलिताखाली येऊ शकतो. त्यामुळे शेतकरी बारमाही शेती करू शकतात. संपूर्ण तालुक्याचे हेटवणे धरणामुळे चित्र पालटणार असतानाही राजकीय इच्छाशक्तीच्या अभावामुळे हा तालुका कायम टंचाईग्रस्त राहिला आहे..लाभधारकांच्या विरोधामुळे रखडले कामपेण शहरालगतचे नागरीकरण वाढल्यामुळे लाभधारकांचा सिंचनासाठीचा प्रतिसाद अत्यल्प आहे. तसेच, कोप्रोली, शिर्की व वाशी वितरिका एकूण ३,१०९ हेक्टर क्षेत्र २००७ पासून बंदिस्त नलिका वितरणप्रणाली प्रस्तावित होती; परंतु लाभधारकांच्या तीव्र विरोधामुळे कालव्याची कामे हाती घेता आली नाहीत, अशी माहिती पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांचे आहे.

> ज्या लाभक्षेत्रास पाणी मंजूर केले होते, त्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना न विचारता परस्पर बिगर सिंचनासाठी पाण्याचा वापर हेटवणे मध्यम प्रकल्पात झाला आहे. ज्यामुळे एकट्या पेण तालुक्याचे ७,३११.१९ कोटी रुपये इतके नुकसान झाले. पाणी असतानाही पुरेशा सुविधा उपलब्ध होत नसल्याने हा तालुका भकास होत आहे.
> – राजन भगत, श्रमिक मुक्त दल.

> पावसाळ्यात पाण्याची पातळी स्थिर राखण्यासाठी काही प्रमाणात विसर्ग करावा लागतो; परंतु इतर वेळेला तसे करावे लागत नाही. धरणातील पाणी सिंचनासाठी उपयोगात यावे, यासाठी कालवे खोदावे लागणार आहेत, त्यासाठी निविदा प्रक्रिया सुरू आहे.
> – दिनेश्री राजभोज, कार्यकारी अभियंता, हेटवणे मध्यम प्रकल्प.

नियोजित लाभक्षेत्रास विशेष करून मत्स्यतलावांना व रब्बी पिकांना पाणी न मिळाल्याने भाताचे उत्पादन कमी होऊन जवळपास ४९८.५४ कोटी रुपये नुकसान झाले आहे. तलावातील पाणी एप्रिलमध्ये आटत असल्याने माशांची पूर्ण वाढ न होता कमी किमतीत विकावे लागतात व ५,३१७.९३ कोटी रुपये नुकसान झाले आहे. त्याचबरोबर बांधावरचे नारळ व इतर भाजीपाला न होऊ शकल्याने ९३६.६६ कोटींचे नुकसान व दूध उत्पादन होऊ न शकल्याने १,५३१.७८ कोटींचे नुकसान झाल्याचा दावा श्रमिक मुक्ती दलाच्या कार्यकर्त्यांनी केला आहे.

# दत्तजयंती उत्सवात विविध कार्यक्रमाची रेलचेल

**। रसायनी । वार्ताहर ।**

श्री गुरुदत्त जन्मोत्सव ग्रामस्थ मंडळ मोहोपाडा व शिवनगर यांच्यावतीने मोहोपाडा बाजारपेठेतील श्री दत्त मंदिरात श्री गुरुदत्त जन्मोत्सवानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.यानिमित्ताने सकाळी ६ ते ७ वाजता अभिषेक, सकाळी ९ ते ११ वाजता श्री ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी २ ते ३ वाजता श्री दत्त प्रासादिक महिला भजन मंडळाचा संगीत भजनाचा कार्यक्रम, दुपारी ३ ते ४ वाजता किशोर लोहार यांचे तबलावादक भजन, दुपारी ४ ते ६ वाजता श्री दत्त जन्माचे वामन महाराज भोईर यांचे सुश्राव्य किर्तन, सायंकाळी ६ ते ७ वाजता हरिपाठ, सायंकाळी ७ ते ९ वाजता महाप्रसादाचा कार्यक्रम झाला. मंदिर मोहोपाडा बाजारपेठेत असल्याने दिवसभर भक्तांची लांबलचक रांग लागल्याचे दिसून आली.

रात्री ९:३० ते १०;३० वाजता श्री दत्तगुरुंची पालखी मिरवणुक मोहोपाडा गावातून पुन्हा श्री दत्त मंदिरात अशी काढण्यात आली. यावेळी मोहोपाडा ग्रामस्थांसह परिसरातील भाविक भक्तांनी दर्शनाचा लाभ घेतला.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोहोपाडा ग्रामस्थांनी अथक परिश्रम घेतले.


## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी– सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


# पळसाच्या पानावरील जेवणाची चव दुर्मिळ

**। रायगड । प्रतिनिधी ।**

यांत्रिकी युगामुळे अनेक पारंपरिक व्यवसायांवर कुऱ्हाड कोसळली आहे. अनेक परंपरागत व्यवसाय करणारे मजूर हे उपासमारीच्या वाटेवर आहेत. त्यामध्ये पळसाच्या पानांपासून पत्रावळी तयार करणारा व्यवसायसुद्धा इतिहासजमा होत चालला आहे. त्यामुळे पर्यावरणपूरक असणाऱ्या पळसाची पाने दुर्मिळ झाली आहेत.

लग्न असो वा कुठल्याही धार्मिक कार्यक्रमांत पंगतीला पत्रावळी असणे आवश्यक होते. पूर्वी केळीची पाने, पळसाच्या पानांच्या पत्रावळी, द्रोणाशिवाय पंगती होत नसे; मात्र आता सर्वत्र आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून यंत्राच्या साह्याने प्लॅस्टिक व थर्माकोल पत्रावळी, द्रोण, ग्लास, चहा-कप तयार केले जात आहेत. या पत्रावळी माफक भावात उपलब्ध असल्याने पानांपासून तयार केलेल्या पत्रावळी, द्रोण कालबाह्य होत असल्याचे चित्र ग्रामीण भागासह शहरातही दिसून येत आहे.

काही वर्षांपूर्वी पळसाच्या पानांपासून बनवल्या जाणाऱ्या पत्रावळी एक महत्त्वाचा व्यवसाय म्हणून याकडे पाहिले जायचे. यासाठी मोह, पळस, वड या झाडांच्या पानांच्या पत्रावळी तयार करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर उपयोग केला जात असे. या पत्रावळीवर केलेले जेवण नागरिकांना स्वादिष्ट व चवदार वाटायचे. ग्रामीण भागातील पत्रावळी तयार करणारे मजूर सकाळी लवकर उठून जंगलात जायचे व या झाडांची पाने खुडून आणायचे. कुटुंबातील प्रत्येक जण पानांपासून पत्रावळी तयार करण्यात गुंतलेला असायचा. या पानांच्या पत्रावळी तयार करून व विक्री करून असंख्य कुटुंबांचा उदरनिर्वाह व उपजीविका होत असे. तयार झालेल्या पत्रावळी शहरातील बाजारपेठेत विकल्या जायच्या; मात्र आता सर्वत्र प्लॅस्टिकचे युग आल्याने पत्रावळी बनविणाऱ्या हातांना कामच राहिले नाही.

> **औषधी गुणधर्म**
> पळसाच्या पानांचा पारंपरिक आणि वैद्यकीय दोन्ही प्रकारे विविध उपयोग होतो. पळसाच्या पानांचा उपयोग प्राचीन काळापासून पत्रावळी आणि द्रोण बनवण्यासाठी केला जात आहे. यावर गरम अन्न वाढल्याने त्या अन्नाबरोबर पळसाचे औषधी गुणधर्म शरीरात जातात. हे औषधी गुणधर्म अन्नाचे पचन सुधारतात आणि आरोग्याला फायदेशीर ठरतात. पडसे, खोकला, मधुमेह, पचन, त्वचाविकार आणि किडनी विकारांवर औषध पळस उपयोगी आहे.

# विजेचा शॉक लागून तरुणाचा मृत्यू

**। रोहा । वार्ताहर ।**

सुतारवाडी येथे विजेचा शॉक लागून कंत्राटी पद्धतीने काम करणाऱ्या तरुणाचा मृत्यू झाला. योगेश मारुती फराडे असे तरुणाचे नाव आहे.

मंगळवारी योगेश रोहा-धगडवाडी येथे विद्युत खांबावर नवीन तार टाकण्याचे काम करीत होता. यावेळी अचानक विजेचा शॉक लागून तो जखमी झाला. त्याला उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. या घटनेची माहिती मिळताच, रोहा उपनिरीक्षक सलमान खतीब यांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

\- मुख्य संपादक

# झुगरेवाडी शाळेला दिली पुस्तकांची भेट

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

झुगरेवाडी गावामधील जिल्हा परिषद शाळा येथे सामाजिक बांधिलकी संस्थेने विद्यार्थ्यांसाठी विविध साहित्याचे वाटप केले.या संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना स्पोर्ट्स ड्रेसेस भेट देण्यात आले.



सामाजिक बांधिलकी संस्थेकडून आदिवासी आणि दुर्गम भागात रायगड जिल्ह्यात उपक्रमशील शाळा म्हणून आदर्श शाळा झुगरे वाडीची ओळख आहे.कर्जत तालुक्यात सामाजिक बांधिलकी संस्था अनेक ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारचे सामाजिक उपक्रम राबविण्यात अग्रेसर आहे.राजेंद्र कामेरकर यांच्या सामाजिक बांधिलकी संस्थेच्या माध्यमातून स्पोर्ट्स ड्रेस यांची भेट देण्याचा कार्यक्रम शाळेच्या आवारात आयोजित करण्यात आला होता.इंग्रजी विषयाची विविध प्रकारची१०० पुस्तके ग्रंथालयासाठी देण्यात आली असून.त्यामुळे शाळेच्या वाचनालयात अखंड वाचन चळवळीसाठी या पुस्तकाचा विद्यार्थी आणि शिक्षकांना खूप फायदा होणार आहे.

शाळेच्या आवारात झालेल्या कार्यक्रमात शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष वसंत पारधी,संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र कामेरकर तसेच ज्ञानेश्वर वाडीले, शिक्षक सतीश घावट, नंदादीप चोपडे, मुख्याध्यापक रवी काजळे, आणि पालक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात विज्ञान प्रदर्शनात प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या अंजली वाघ,शिक्षिका राजश्री पाटील, स्वाती चव्हाण यांचा सन्मान करण्यात आला.

कर्जत तालुक्यातील २०० जिल्हा परिषदेच्या शाळांना वड आणि पिंपळ यांची रोपे देवून वृक्ष संवर्धन कार्यक्रम राबविला होता. तालुका गट शिक्षण अधिकारी संतोष दौंड यांच्या मार्गदर्शनाखाली या वृक्षाची जोपासना सर्व शाळांमध्ये केली असून हे वृक्ष बहरले आहेत. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, दिव्यांग बांधवांना जयपूर फूट देण्याबरोबरच, निराधार महिलांना स्वतः च्या पायावर उभे राहण्यासाठी प्रशिक्षित करणे यासारखे समाजाभिमुख उपक्रम राबविले जात आहेत अशी माहिती रवी काजळे यांनी दिली आहे.

## रानडुकराच्या हल्ल्यात जखमी तरुणावर शस्त्रक्रिया

**। रोहा । प्रतिनिधी ।**

जंगलात रानडुकराच्या हल्ल्यात एक आदिवासी तरुण जखमी झाला होता. त्याच्या आतड्यांना गंभीर दुखापत झाली होती. रोह्यातील खासगी रुग्णालयात तब्बल १५ तास शस्त्रक्रिया केल्यावर त्याला जीवनदान मिळाले. २१ सप्टेंबर रोजी तळा गावाजवळ राहणाऱ्या एका ३२ वर्षीय तरुणावर रानडुकराने हल्ला केला होता. गंभीर जखमी झालेल्या त्याला रोह्यातील डॉ. भट नर्सिंग होममध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले. उपचारासाठी उशीर झाल्यामुळे आतड्यास संसर्ग झाला होता. अखेर दोन वेळा शस्त्रक्रिया केल्यावर आता त्याची प्रकृती सुधारत असल्याची माहिती डॉ. अपूर्व भट यांनी दिली.

# खारघर पेठगाव येथे दत्तजयंती उत्साहात

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

खारघर मधील पेठगाव येथे शेतकरी कामगार पक्षाचे ओवे गावचे माजी ग्रामपंचायत सदस त्रिमूर्ती चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष जयेंद्र बबन शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली मुक्काम पेठगाव सेक्टर ३३ खारघर या ठिकाणी श्री दत्त जयंती चे उत्साहात आयोजन करण्यात आले होते.



यामध्ये प्रामुख्याने सकाळी काकड आरती अभिषेक व श्री चे पूजनत्यानंतर दत्त प्रासादिक मंडळ ओवेपेठ यांचे भजन, श्री गणेश प्रासादिक मंडळ धानसर यांचे भजन , श्री कृपा प्रासादिक मंडळ पेठ,जय हनुमान प्रासादिक भजन मंडळ, जय हनुमान महिला हरिपाठ मंडळ मुर्बी, लक्ष्मीनारायण प्रासादिक भजन मंडळ पेठाली आणि आणि संध्याकाळी चार ते सहा या वेळेत 'दत्त जन्म किर्तन' रायगड भूषण द्वारकानाथ महाराज देशमुख कर्जत यांचे मुख्य भजन झाले.

ग्रामपंचायत ओवेचे माजी सदस्य जयेंद्र शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या दत्त जयंती सोहळ्यासाठी कोकण शिक्षक मतदार संघाचे माजी आमदार बाळाराम पाटील, पनवेलचे माजी नगरसेवक गोपाळ भगत, रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य विलास फडके, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सदस्य देवेंद्र मढवी, शेकाप पनवेल तालुका चिटणीस राजेश केणी आदी मान्यवरांनी या दत्त जयंती उत्सवाला भेट दिली. संपूर्ण दिवस चाललेल्या भव्य दिव्य अशा दत्तजयंती जयंती उत्सवात पेठगाव मधील ग्रामस्थ गावातील महिला आणि बालगोपाल यांनी मनमुराद आनंद घेतला.

# लोकलमध्ये तांत्रिक बिघाडामुळे खोपोलीकरांची तारांबळ

**खोपोली :** कर्जतकडून खोपोलीला सकाळी ६.१६ वाजता येणारी लोकल लौजी व खोपोलीदरम्यान तांत्रिक बिघाडामुळे बंद पडली.

ही लोकल सात वाजले तरी खोपोली स्थानकात न आल्याने मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या खोपोलीतील शेकडो प्रवाशांचा खोळंबा झाला. लोकल न आल्याने अनेकांनी पनवेल किंवा कर्जतला जाऊन पुढील मार्ग पत्करला तर अनेकांनी घरी जाणेच पसंत केले. तांत्रिक बिघाड नेमका कोणता व का झाला, हे जाणून घेत असल्याची माहिती रेल्वे प्रशासनाकडून देण्यात आली.

# हद्दपारीचे उल्लंघन केल्याप्रकरणी गुन्हा

**रोहा :** अनेक गुन्हे नावावर असलेल्या तरुणाला पोलिस प्रशासन अहवालानुसार व उपविभागीय दंडाधिकारी कार्यालयातून जिल्हा हद्दपारचे आदेश देण्यात आले आहेत; मात्र आदेशाचे उल्लंघन करून आरोपी व्यक्ती स्वतःच्या गावात आढळल्याने गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

राकेश येलकर असे तरुणाचे नाव असून त्याच्याविरोधात रोहा पोलीस ठाण्यात विविध प्रकारचे गुन्हे दाखल आहेत. या अनुषंगाने उपविभागीय दंडाधिकारी यांच्या आदेशानुसार राकेशला रायगड जिल्ह्यातून तीन महिन्यांसाठी हद्दपारचे निर्देश देण्यात आला आहेत. कोणतीही परवानगी न घेता तो देवकान्हे येथे वास्तव्य करीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे - चौल, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील क्षेत्राचे वर्णनाची बागायत जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. सुशील गोविंद मेन यांचे कडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु. पै) |
|---|---|---|---|
| चौल, ता. अलिबाग | २१९२/१ | बागायत ००.८२.७० पो.ख. ००.०३.०० एकूण ००-८५-७० | ४९.०८/- |

वरील बागायत जमिन मिळकती पैकी श्री. सुशील गोविंद मेन यांचे नावे असणारे क्षेत्र ००.०५.९० हे.आर. आकार ०३.५०रु. पैसे. व त्या मध्ये असणारे ग्रुप ग्रामपंचायत चौल यांचे हद्दीतील घर क्र १६७४ हे या नोटीसीचा विषय आहे.

वर वर्णन केल्याप्रमाणे क्षेत्राची जमिन मिळकती ह्या त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबे कब्जा वहिवाटीतील असून, त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचाकरार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत आल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा ) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखीस्वरूपात आणून द्यावीत, मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदर मिळकती विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काच्या आहेत व त्यावर अन्य कुणाचा ही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : १५/१२/२०२४

**ॲड. राहुल रमेश नाईक**
मु. नागांव, ता. अलिबाग
मोबा. क्र. ९९२२७९८५२८

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे - पाली खुर्द, पनवेल, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत आहे. सदरहू मिळकत आमचे अशिलांनी सदरहू मिळकतीचे मालक सुलोचना मोहन कल्याणकर व इतर २ यांचेकडुन सदर मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - पाली खुर्द, ता. पनवेल, जि. रायगड**

| गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार |
|---|---|---|---|
| ८ | २ | १-२९-८० पो. ख. ०-०४-८० एकुण १-३४-६० | १२.३१ |

तरी सदर मिळकती संबंधी कोणाही व्यक्तीचा अथवा कोणत्याही संस्थेचा गहाण दान, बक्षीस, खरेदीखत, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्युपत्र बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क- हितसंबंध असल्यास त्यांच्या लेखी हरकती अशा हरकतीमध्ये नमुद केलेल्या हक्कांबाबत प्रथम दर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन २१ दिवसांचे मुदतीत प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व वरील मुदती नंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

पनवेल
दिनांक : १६/१२/२०२४

**प्रसाद वामन कोंडे देशमुख**
ॲडव्होकेट पनवेल
पत्ता : अ/४, जय नगर सोसायटी,
किनारा सोसायटी समोर, ५२ बंगलो, कोर्ट रोड,
जुने पनवेल, ता. पनवेल, जिल्हा रायगड- ४१०२०६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, आमचे आशिलांनी श्री. मोहन तीर्थ थडानी, सौ. रश्मी मोहन थडानी, दोघे राहणार ७२ ए, बेले व्यू, ८५, भुलाभाई देसाई रोड, मुंबई ४०००३६ (''प्लॉट मालक'') यांचे कडुन त्यांचे खालील परिशिष्टात वर्णन केलेले रहिवासी प्लॉट (ज्यास यापुढे ''सदर प्लॉट''असे संबोधले आहे) स्पष्ट कायदेशीर आणि विक्रीयोग्य स्वामित्व आणि खुल्या व शांत ताबेकब्जा सहीत प्लॉट मालकांकडून कायम खरेदी व संपादन करण्याचे ठरविलेले आहे.

तरी सदर प्लॉट मिळकत किंवा त्यांच्या कोणत्याही भागाच्या बाबतीत अगर त्याच्या हिश्श्याच्या बाबत कोणत्याही व्यक्तींचा अथवा इसम/इसमांचा कोणताही कोणत्याही प्रकारचा क्लेम, हक्क, स्वामित्व, मालमत्ता, हिस्सा किंवा स्वारस्य व/किंवा कोणत्याही कराराद्वारे मागणी, विक्री, हस्तांतरण, अदलाबदल, कुळ, पोटकुळ, लिज, सबलिज, गहाण (इक्विटेबल किंवा कोणत्याही प्रकारचे), बक्षिस, लिन, चार्ज, न्यास, वारसा हक्क, पोटगीचा हक्क, दान, ताबा, कब्जा, इजमेंट, असाईनमेंट, लायसन्स, निशाणी (डीवाईस), डिमाइस, वाटप, प्लेज, गॅरेंटी कौटुंबिक व्यवस्थापन विकसन हक्क, सह उद्योग, भागिदारी, कुलमुखत्यारपत्र, सहयोग, कर्ज, आगावू देणे, भुसंपादन, लेखी मागणी, बोजा, एफ. एस.आय/टि.डी. आर वापर हक्क, मनाई किंवा इतर अॅटॅचमेंट अथवा कोणत्याही कोर्टाचा अधिकाऱ्यांचा, न्यायाधिकरणाचा, महसुली वा सविधी मान्य (स्टॅट्यूटरी) अधिकारी किंवा लवादाचा, हुकूमनामा, आदेश, ॲवार्ड अथवा न्याय निर्णय जप्ती, चालू वहिवाट अगर लागू केलेल्या कायद्याप्रमाणे निर्माण झालेला हक्क, अग्रक्रयाधिकार, इतर कोणताही कोणत्याही प्रकारचा क्लेम, हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्या अधोरिखीत पत्त्यावर संबंधीत कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकती प्रत्यक्ष अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर नोटीसीत नमुद प्लॉट संबंधी दावा/दावे, क्लेम, हरकती, जे कोणते असतील, ते अशा व्यक्तीने/व्यक्तींनी सोडले व/किंवा त्यागले आहेत असे समजणेत येईल व परिणामी आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील.

**वर संदर्भित परिशिष्ट ('सदर प्लॉट')**

मौजे - ताडवाडी, तालुका कर्जत, जि रायगड, दुय्यम निबंधक कर्जत व महाराष्ट्र राज्य यांचे अधिकार क्षेत्रातील मूळ गट क्रमांक १०२ (जुने सर्व्हे क्रमांक ४८/१ अ, ४८/१ ब, ४८/१ क , ४८/१ ड ४८/१, इ ४८/१ फ, ५४/३, ५४/५ अ (१), ५४ /५ अ (२) व ५४/५ब) त्यासी एकूण क्षेत्र हे १७=८५ आर वर स्थित असलेल्या भीमाशंकर हिल्स या प्रकल्पातील मधील रिक्त एन. ए. रहिवासी जमिन मिळकत त्यासी प्लॉट क्र. १६४ व १६५ (श्री. मोहन तीर्थ थडानी यांच्या मालकीचे), १८२ व १८३ (सौ. रश्मी मोहन थडानी यांच्या मालकीचे) त्यासी अनुक्रमे गट क्रमांक १०२/१६४, १०२/ १६५, १०२/१८२ व १०२/१८३ त्यासी क्षेत्र हे ००=२.६४ आर म्हणजेच २६४ चौ. मीटर प्रत्येकी म्हणजेच एकूण क्षेत्र हे ००=१०.५६ आर म्हणजेच १०५६ चौ. मीटर.

तारीख :१६/१२/२०२४

मे. लॉ पॉईंट
ॲडव्होकेटस ॲन्ड सॉलिसिटर्स
वैभव चेंबर्स, तिसरा मजला, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स,
आयकर कार्यालयासमोर,वांद्रे पूर्व, मुंबई ४०००५१
ई.मेल - response@lawpointindia.com

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद केलेली शेत जमिन मिळकत ही खरेदी करण्याबाबत आमचे अशिल यांच्यासोबत सदर जागेचा व्यवहार ठरविण्यात आलेला आहे. सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यास शेत जमिन मिळकतीचे विद्यमान मालक श्री.तुलशीदास हरी पाटील, मु. पो. तरणखोप, ता. पेण, जि. रायगड यांनी अनुमती दिलेली आहे. सदर शेत जमीन मिळकतीचे ७/१२ उताऱ्याप्रमाणे असलेले वर्णन खालीलप्रमाणे-

**शेत जमिन मिळकतीचे वर्णन -**

| गांव | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|
| रामराज | ४०/२ | २.४९.३० पो.ख. ०.१५.८० एकूण २.६५.१० | ५२.५३ |

वर वर्णन केलेली शेत जमिन मिळकत ही सामाईक शेत जमिन मिळकत असून सदरहू शेत जमिन मिळकतीमधील विद्यमान मालक श्री. तुलशीदास हरी पाटील यांच्या मालकी हक्काचे असलेले क्षेत्र ०.४७.१० हे.आर.चौ.मी, पोट खराबा ०.०३.०० हे.आर.चौ.मी. असे एकूण क्षेत्र ०.५०.१० हे.आर.चौ.मी. यापैकी ०.३०.०० हे.आर.चौ.मी. क्षेत्र हे खरेदी करणेकामी या जाहीर नोटीसचा विषय आहे.

वरील वर्णनाची संदर्भित शेत जमीन मिळकत पूर्णतः निर्वेध, बोजाविरहित व विनाजोखीम असल्याबाबतचा हवाला सदरहू शेत जमिन मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिलांस दिला आहे. याउपरही सदर शेत जमिन मिळकतीमध्ये अन्य कोणाचाही भाडेपट्टा, गहाण, बोजा, कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, खरेदीखत, विकसन करारनामा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, लिन अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल करण्यात याव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने १४ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे पोहचतील अशा रीतीने पाठवाव्यात.

याप्रमाणे वरील मुदतीत हरकत न आल्यास सदरहू शेत जमिन मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजण्यात येईल व आमचे अशिल वर वर्णन केलेल्या शेत जमिन मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही तक्रार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

पेण
दिनांक १२/१२/२०२४

खरेदीदाराचे वकील
**ॲड. श्री. जयंत घ. वैरागी**
ऑफिस :- 'वैरागी व्हिला',
पेण नगरपरिषद कार्यालय समोर, पेण,
चिंचपाडा रोड, पेण, ता. पेण,
जि. रायगड. मो.नं. ९८८१६७१४२४

# भारताने उडवला पाकिस्तानचा धुव्वा

**अवघ्या ४७ चेंडूत लक्ष्य गाठले**

**। क्वालालंपूर । वृत्तसंस्था ।**

**१९ वर्षांखालील महिला आशिया कप स्पर्धेला सुरुवात झाली असून भारताने आपल्या मोहिमेची दणक्यात सुरुवात केली आहे. भारतीय महिला संघाने रविवारी (दि.१५) पाकिस्तानच्या युवा महिला संघाला ७३ चेंडू आणि ९ गडी राखून पराभूत केले आहे. हा दोन्ही संघांचा चालू स्पर्धेतील पहिलाच सामना होता.**



क्वालालंपूर येथे झालेल्या या सामन्यात १९ वर्षांखालील पाकिस्तान संघाने भारतासमोर विजयासाठी अवघ्या ६८ धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग भारतीय संघाने अवघ्या ७.५ षटकात म्हणजेच ४७ चेंडूत पूर्ण केला आहे. भारताने ७.५ षटकात १ बाद ६८ धावा केल्या. दरम्यान, भारताकडून सुरुवात फारशी चांगली झाली नव्हती. गोंगाडी त्रिशा दुसऱ्याच चेंडूवर शुन्यावर बाद झाली होती. पण नंतर जी कामिलिनी आणि सानिका चाळके यांनी विकेट न गमावता विजयी लक्ष्य पूर्ण केले आहे. कामिलिनी २९ चेंडूत ४४ धावांवर नाबाद राहिली, तर सानिका १७ चेंडूत १९ धावांवर नाबाद राहिली. पाकिस्तानकडून एकमेव बळी फातिमा खानने घेतला.

तत्पुर्वी, या सामन्यात १९ वर्षांखालील पाकिस्तान संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. त्यामुळे भारतीय संघ प्रथम गोलंदाजीसाठी उतरला. भारतीय गोलंदाजांनी शानदार सुरुवात केली. दुसऱ्याच षटकात फिझा फियाध हिला जोशिथा व्हीजे हिने बाद केले. यानंतर पाकिस्तानची फलंदाजी धीम्या गतीने झाली. त्यांना ८ षटके संपली तरी ३० धावा करता आल्या नव्हत्या. त्यातच ८ व्या षटकात १४ चेंडूत ४ धावा करणाऱ्या माहम अनीसला सोनम यादवने पायचीत पकडले. पाठोपाठ पुढच्याच षटकात मिथिलाने कोमल खानला २४ धावांवर बाद केले. त्यानंतर रावेल फरहान (३), अरिशा अन्सारी (२), कर्णधार झुफिशान आय्याज (४) या धीम्या गतीने खेळत स्वस्तात बाद झाल्या. फातिमा खान हिने ११ धावा केल्या. फातिमा आणि कोमल यांनाच १० धावांचा आकडा पार करता आला. अखेरीस कुर्रातुलन (९) आणि माहनूर झेब (३) या नाबाद राहिल्या. पाकिस्तानने २० षटकात ७ बाद ६७ धावाच केल्या. यावेळी भारताकडून सोनम यादव हिने सर्वाधिक ४ बळी घेतले. तसेच जोशिता, पारुनिका सिलोदिया आणि मिथिला यांनी प्रत्येकी १ बळी घेतला.

आता भारताचा पुढील सामना मंगळवारी (दि.१७) नेपाळ संघाविरुद्ध होणार आहे, तर पाकिस्तानचा सामना सोमवारी (दि.१६) नेपाळविरुद्धच होणार आहे.

# मिहीरचे स्मार्ट हॅकेथॉनमध्ये यश

**। बोर्ली-पंचतन । वर्ताहर ।**

श्रीवर्धन तालुक्यातील वांजळे येथील मिहीर मंगेश काते या इंजीनियरिंगच्या विद्यार्थ्याने स्मार्ट हॅकेथॉन स्पर्धेत हॅकस्ट्रीट हसलर्स टिमच्या माध्यमातून आपल्या गुणवत्तेने उज्वल यश संपादन केले असून देशामध्ये या टीमचा प्रथम क्रमांक आला आहे.



सध्या देशासमोर असणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी संशोधनाला चालना देण्याचे काम स्मार्ट इंडिया हॅकेथॉन या स्पर्धेच्या माध्यमातून होत आहे. केंद्रीय शिक्षण मंत्रालयाकडून नुकत्याच देशभरातील ५१ केंद्रांमध्ये एकाच वेळेस सुरु झालेल्या या स्पर्धेमध्ये देशातील हजारो विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. मुंबईतील अंधेरी येथील राजीव गांधी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी कॉलेजचे विद्यार्थी मिहीर कातेसह नंदिनी कडवे, छायांगी मुजुमदार, ध्रुव लोहार, क्रिषय नायर, आदिष गोटेकर या विद्यार्थ्यांनी हॅकस्ट्रीट हसलर्स टीमच्या माध्यमातून आपला सहभाग नोंदवीला होता. सेंट जोसेफ इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी चेन्नई येथे झालेल्या या स्पर्धेत दिलेल्या ३६ तासाच्या मुदतीमध्ये सलग काम करून भारतीय डाक विभागाच्या तिकिटांचा संग्रह आणि अध्ययन याबाबत त्यांनी सॉफ्टवेअर आणि वेबसाईट बनवून दिली होती. त्यांच्या या कामगिरीला देशातून प्रथम क्रमांकाने गौरवण्यात आले आहे.

# मुंबईच्या सिमरनला मोठी बोली

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबई संघाकडून देशांतर्गत क्रिकेट खेळणाऱ्या सिमरन शेखवर २०२५ लिलावातील आत्तापर्यंतची सर्वाधिक मोठी बोली लावली गेली आहे. सिमरनला १ कोटी ९० लाख रूपयांत गुजरात जायंट्सने करारबद्ध केले आहे. युपी वॉरियर्स संघाकडून खेळणारी सिमरन आगामी डब्ल्यूपीएल हंगामात गुजरात जायंट्स संघाकडून खेळताना पाहायला मिळणार आहे. मधल्या फळीतील फलंदाज सिमरनने मागच्या हंगामात ९ सामन्यांमध्ये अवघ्या २९ धावा केल्या होत्या. गुजरात जायंट्सने या लिलावात आत्तापर्यंत दोन खेळाडूंवर मोठी बोली लावली आहे. लिलावाच्या पहिल्याच बोलीत गुजरातने वेस्ट इंडिजची अष्टपैलू खेळाडू डिएंड्रा डॉटिनला १ कोटी ७० लाखात व सिमरन शेखला १ कोटी ९० लाख रूपयांत करारबद्ध केले आहे.



# खो-खो क्षेत्रातील आधारस्तंभ हरपला

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

खो-खो क्षेत्रातील एक उज्वल तारा अनंत महादेव भाताडे यांचे शुक्रवारी (दि.१३) निधन झाले आहे. आठ दशके मैदानावर कार्यरत राहून खो-खो खेळाच्या विकासासाठी त्यांनी दिलेले योगदान अमूल्य आहे.



भाताडे यांनी महाराष्ट्राच्यावतीने बडोदा आणि हैदराबाद येथे झालेल्या राष्ट्रीय खो-खो स्पर्धेत विजेतेपद पटकावले होते. त्यांची कार्यक्षमता एवढी व्यापक होती की, भारत सरकारच्यावतीने राष्ट्रीय विजेते आणि उपविजेते संघाच्या दिल्ली येथील सदिच्छा दौऱ्याचा भाग होण्याचा मान त्यांना दोन वेळा मिळाला होता. या दौऱ्यांमध्ये पंतप्रधानांसह इतर मान्यवरांनीही सहभाग घेतला होता.

तसेच, भाताडे यांनी महाराष्ट्राच्या महिला, मुली, किशोरी आणि पुरुष संघाचे प्रशिक्षक म्हणून जबाबदारी सांभाळत या संघांना राष्ट्रीय स्तरावर अनेकदा विजेतेपद मिळवून दिले आहे. त्यांनी खो-खो आणि कबड्डीच्या क्षेत्रात प्रशिक्षक म्हणूनही भरीव योगदान दिले आहे. मुंबईच्या एसएनडीटी विद्यापीठाच्या संघांना त्यांनी आंतरविद्यापीठ पातळीवर विजेतेपद मिळवून दिले होते.

# ऑस्ट्रेलिया संघ ४०० पार

**स्मिथ, हेडची द्विशतकी भागीदारी**
**बुमराहचे ५ बळी पूर्ण**

**। ब्रिस्बेन । वृत्तसंस्था ।**

ब्रिस्बेनमधील द गॅबा येथे भारत आणि ऑस्ट्रेलिया संघात कसोटी मालिकेतील तिसरा सामना खेळवला जात आहे. या सामन्याच्या दुसऱ्या दिवशी रविवारी (दि.१५) ऑस्ट्रेलियन संघ वरचढ असल्याचे दिसून आले आहे. त्यातही हा दिवस ऑस्ट्रेलियाकडून स्टीव्ह स्मिथ आणि ट्रॅविस हेड यांनी गाजवला. त्यांनी शानदार शतके ठाकली आहेत. परंतु, दिवसाच्या शेवटी बुमराहने ५ बळी पूर्ण करत भारतीय चाहत्यांच्या दु:खावर फुंकर घातली आहे. दुसरा दिवस संपला तेव्हा ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात १०१ षटकात ७ बाद ४०५ धावा केल्या होत्या.



या सामन्यात भारताने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, पहिल्या दिवशी पावसामुळे १३.२ षटकांचाच खेळ झाला होता. पण ऑस्ट्रेलियाने पहिल्या दिवशी एकही गडी गमावला नव्हता. परंतु, दुसऱ्या दिवसाच्या सुरुवातीलाच ऑस्ट्रेलियाला मोठे धक्के बसले. १७ व्या षटकात जसप्रीत बुमारहने उस्मान ख्वाजा (२१) याला बाद केले. त्यापाठोपाठ १९ व्या षटकाच त्यानेच नॅथन मॅकस्विनीला (९) बाद केले. या नंतर मार्नस लॅबुशेन आणि स्टीव्ह स्मिथ यांनी संयमी खळ करत डाव सावरला. नितीश कुमार रेड्डीने ३३ व्या षटकात मार्नस लॅबुशेनला (१२) माघारी धाडले. यानंतर भारताची डोकेदुखी वाढविण्यासाठी ट्रॅव्हिस हेड उतरला. त्याने ११५ चेंडूतच त्याचे शतक पूर्ण केले. त्याच्यापाठोपाठ स्टीव्ह स्मिथनेही शतक पूर्ण केले.

दरम्यान, स्मिथ (१०१) शतक झाल्यानंतर लगेचच बाद झाला. बुमराहनेच त्याला बाद केले. लगेचच मिचेल मार्श (५) यालाही बुमराहने बाद केले. याच षटकात त्याने दीडशतकी खेळी केलेल्या हेड (१५२) याला यष्टीरक्षक ऋषभ पंतच्या हातून झेलबाद केले. त्याला बाद करत बुमराहने त्याच्या ५ बळी देखील पूर्ण केले. हेड बाद झाल्यानंतरही ॲलेक्स कॅरे आणि कर्णधार पॅट कमिन्स यांनी चांगली भागीदारी करत संघाला ३८० धावा पार करून दिल्या होत्या. अखेर त्यांची भागीदारी सिराजने तोडली. त्याने कमिन्सला २० धावांवर बाद केले. पण नंतर कॅरे (४५) आणि मिचेल स्टार्क (७) याने दुसऱ्या दिवस अखेपर्यंत संघाला ४०० धावा पार करून दिल्या.

# शुटिंग बॉल स्पर्धेत सोलापूर अजिंक्य

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राष्ट्रीय मिल मजदूर संघाच्यावतीने संघटनेचे आद्य संस्थापक कामगार महर्षी गं.द. आंबेकर यांच्या पुण्यस्मृती प्रित्यर्थ संघटनेचे अध्यक्ष आ. सचिन अहिर व सरचिटणीस गोविंदराव मोहिते यांच्या पुढाकाराने श्रमिक जिमखाना येथे राज्यस्तरीय शुटिंग बॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत सोलापूर जिल्हा युथ फाऊंडेशन मनोराजुरी संघाने अजिंक्यपद पटकावले आहे. अंतिम सामन्यात सोलापूरने पुण्याच्या कावेरी नगर संघाला सहजपणे २१-१० गुणांनी पराभूत केले आहे. यावेळी विजयी सोलापूर संघाला चषक व ११ हजार रु. रोख रक्कम, उपविजयी कावेरी नगर पुणे संघाला चषक व ८ हजार रु. आणि तिसऱ्या क्रमांकाच्या संघांना चषक आणि प्रत्येकी ५ हजार रु. देऊन सन्मानित करण्यात आले.



उपांत्यपूर्व फेरीत कावेरी नगरने शासकीय दूध डेअरीचा पराभव केला. संजय भोसले प्रतिष्ठानने सेल्यूट पुणेचा पराभव केला. सोलापूरने सातारा जिल्ह्याला पराभूत केले. तर, खानापूरने मालेगाव संघाचा पराभव केला. उपांत्य फेरीत कावेरी नगरने संजय भोसले प्रतिष्ठानचा पराभव केला आणि सोलापूरने खानापूर जिल्हा संघाचा पराभव केला. यानंतर अंतिम फेरीत सोलापूरने कावेरी नगरवर सहज २१-१० अशा गुणांनी विजय मिळवत अजिंक्यपद पटकावले आहे.

# विद्यार्थी रमले क्रीडा महोत्सवात

**। मांणगाव । प्रतिनिधी ।**

छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संचालित माध्यमिक विद्यामंदीर रातवड विद्यालयात शालेय वार्षिक क्रीडा महोत्सव १२ व १३ डिसेंबर रोजी संपन्न झाला. या क्रीडा महोत्सवाच्या निमित्ताने ४ सांघिक व ११ वैयक्तिक खेळांमध्ये १२५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.



या क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन मंगळवारी (दि.१२) माजी सैनिक एन.एस.जी. कमांडो श्रीराम वांदरे यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी कबड्डी, क्रिकेट व खो-खो या सांघिक खेळांच्या स्पर्धा संपन्न झाल्या. तयेच, बुधवारी (दि.१३)विविध मैदानी स्पर्धा खेळवण्यात आल्या होत्या. या क्रीडा महोत्सवाचे बक्षिस वितरण शनिवारी (दि.१४) सामाजिक कार्यकर्त्या सुवर्णा जाधव, मलिका चॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्षा निखात सय्यद, सरपंच दीपक जाधव, ॲड. परेश जाधव, पालक व माजी विद्यार्थी आदी मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी प्रमुख अतिथी ॲड. परेश जाधव, दीपक जाधव, सुवर्णा जाधव, निखत सय्यद यांनी विद्यार्थ्यांना खेळ व खेळांचे महत्व याविषयी मार्गदर्शन केले.

# क्रीडा, व्यक्तिमत्व विकास स्पर्धा



**। रसायनी । वार्ताहर ।**

खालापूर गटशिक्षणाधिकारी कैलास चोरमले, केंद्रप्रमुख गोविंद दरवडा यांच्या मार्गदर्शनाखाली वावर्ले केंद्राच्या केंद्रस्तरीय क्रीडा व व्यक्तिमत्व विकास स्पर्धा बोरगाव खुर्द येथील राजिप शाळेतआयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेचे उद्घाटन सरपंच प्रितेश मोरे यांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धेमध्ये वावर्ले केंद्रातील १९ शाळांमधील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला होता.

केंद्रस्तरीय स्पर्धेत इयत्ता पहीली ते चौथी छोटा गट व इयत्ता पाचवी ते सातवी मोठा गट अशी विभागणी करण्यात आली होती. वैयक्तिक व सांघिक खेळात लंगडी, लगोरी, बेचकीने नेम धरणे, दोरी उड्या, शिल्पकाम, पारंपारिक नृत्य, पथनाट्य व समूहगीत असे व्यक्तिगत विकासाच्या स्पर्धा घेण्यात आल्या.

या स्पर्धेसाठी वावर्ले केंद्रातील शिक्षकांनी पंच व गुण लेखकाचे काम पाहिले. योग्य नियोजन करून खेळीमेळीच्या वातावरणात स्पर्धा पार पडल्या. सर्व विजेत्या संघांना व स्पर्धकांना केंद्रप्रमुख गोविंद दरवडा, मुख्याध्यापक राठोड व संगीता जाधव, आंतरराष्ट्रीय वेट लिफ्टींग बबन झोरे या मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले.

**अर्जुन मढवी स्मृती महिला चषक क्रिकेट स्पर्धा**

# दिलीप वेंगसरकर फाऊंडेशन विजयी

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

डॉ. राजेश मढवी स्पोर्ट्स असो. आणि दैवेज्ञ क्रिकेट क्लब आयोजित पाचव्या अर्जुन मढवी स्मृती महिलांच्या ४० षटकांच्या एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेचे आयोजन शनिवारी (दि.१४) सेंट्रल मैदानावर करण्यात आले होते. या स्पर्धेत खुशी गिरीची भेदक गोलंदाजी, पूनम राऊत आणि श्वेता कलपथी या सलामीच्या जोडीने केलेल्या नाबाद शतकी भागीदारीमुळे दिलीप वेंगसरकर फाऊंडेशनने एमआयजी क्रिकेट क्लबचा १० फलंदाज राखून दणदणीत पराभव करत विजय संपादन केले आहे. यावेळी एमआयजी क्रिकेट क्लबला १३६ धावांवर गुंडाळल्यावर बिनबाद १३७ धावा करत दिलीप वेंगसरकर फाऊंडेशनने अर्जुन मढवी करंडकावर आपल्या नावाची मोहोर उमटवली आहे.





या निर्णायक लढतीत एमआयजी क्रिकेट क्लबच्या फलंदाजांना मोठी धावसंख्या उभारण्यात अपयश आले. महेक मिस्त्री, रिया दोषी, हिर कोठारी आणि मिताली म्हात्रेने छोट्या खेळीमुळे एमआयजी क्रिकेट क्लबला सव्वाशे धावांचा पल्ला पार करता आला. मेहेकने सर्वाधिक २४, मिताली आणि हिरने प्रत्येकी १६, रिया दोशीने १५ धावा केल्या. फलंदाजांना दडपणाखाली ठेवताना खुशी चार बळी मिळवले. अदिती सुर्वे आणि पूनम राऊतने प्रत्येकी दोन फलंदाज बाद केले. त्यानंतर पूनम आणि श्वेताने प्रतिस्पर्धी गोलंदाज निर्विवाद वर्चस्व गाजवत २० व्या षटकातील दुसऱ्या चेंडूवर विजय निश्चित केला. श्वेताने ५५ चेंडूत ७६ धावा करताना ११ चौकार आणि दोन षटकार ठोकले. पूनमने नाबाद ४५ धावा बनवल्या.

# पाकिस्तान क्रिकेटमध्ये मोठी खळबळ

**। लाहोर । वृत्तसंस्था ।**

मागच्या काही महिन्यात पाकिस्तान क्रिकटमध्ये भयंकर गोंधळ सुरू आहे. पाकिस्तान क्रिकेटच्या अनेक खेळाडूंनी व सदस्यांनी मागच्या काही दिवसात निवृत्ती घेतली व राजीमाने दिले आहेत. नुकताच बाबर आझमनेही आपल्या कर्णदार पदाचा राजीनामा दिला. त्यानंतर गेल्या दोन दिवसात पाकिस्तानच्या एक ऑलराऊंडर व २ गोलंदाज अशा एकूण ३ खेळाडूंनी आपला राजीनामा पाकिस्तान क्रिकेटकडे सोपवला आहे. याआधी पाकिस्तानचा अनुभवी अष्टपैलू खेळाडू इमाद वसीम व गोलंदाज मोहम्मद अमीरने दुसऱ्यांदा निवृत्ती जाहीर केली होती. त्यानंतर शनिवारी रात्री सोशल मिडीयावर पोस्ट करत ४२ वर्षिय वेगवान गोलंदाज मोहम्मद इरफान याने देखील आपली निवृत्ती जाहीर केली आहे.



कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)